


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २७ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १३८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


### आजचा आयपीएल सामना

लखनौ सुपर जायण्ट्स
वि. सनरायझर्स हैदराबाद
**स्थळ :** राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, हैदराबाद
**वेळ :** सायंकाळी ७.३० पासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

## महत्त्वाचे

### नफेखोरीमुळे सात दिवसांच्या तेजीला 'लगाम'

**मुंबई :** बँकिंग आणि माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या नफेखोरीने देशातील शेअर बाजारांत सात दिवसांच्या तेजीला लगाम घातला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ७२८ अंकांनी घसरून ७७,२८८ या पातळीवर बंद झाला. मुंबई शेअर बाजारातील २५ कंपन्यांच्या समभागांची आज घसरण झाली.



दिवसभराच्या सत्रादरम्यान निर्देशांकात ८२२ अंकांची घसरण झाली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १८१ अंकांनी घसरून २३,४८६ या पातळीवर बंद झाला. मागील सात दिवसांत निर्देशांक ४,१८८ अंकांनी, तर निफ्टी १,२७१ अंकांनी वधारला. आजच्या सत्रात एनटीपीसी, टेक महिंद्रा, झोमॅटो, ॲक्सिस बँक, बजाज फायनान्स, इन्फोसिस, मारुती, भारतीय स्टेट बँक, कोटक महिंद्रा बँकेला सर्वाधिक फायदा झाला.

# संविधानाला आता धोका नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा काँग्रेसवर जोरदार हल्ला

**मुंबई, २६ मार्च**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोच्च प्राधान्य द्यायचे ते मूलभूत अधिकार आणिबाणीच्या काळात हिरावले, अभिव्यक्ती स्वातंत्र्य समाप्त केले, माध्यमांवर निर्बंध लावले आणि राज्ये हे कायद्याने नव्हे, तर हुकमाने चालतील अशा प्रकाराची व्यवस्था करणाऱ्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींच्या काळात संविधानाला धोका होता, आज नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी काँग्रेस आणि 'संविधान खतरे में है' चा राग आळवणाऱ्यांवर जोरदार हल्ला चढवला.

भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री सहभागी



झाले होते. यावेळी फडणवीस म्हणाले, २०१४ मध्ये जेव्हा नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली, तेव्हा संसदेत पाऊल टाकताना त्यांनी संविधानाची पूजा केली. ते म्हणाले, माझ्यासाठी गीता, कुराण, बायबल या धर्मग्रंथांपेक्षा देश चालवणारे संविधान सर्वोच्च आहे. त्यामुळे मागच्या निवडणुकीत 'संविधान खतरे में'चा फेक नॅरेटिव्ह चालवला, तसा आता चालणार नाही. पुढच्या निवडणुकीसाठी काहीतरी नवीन शोधा, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला.

फडणवीस म्हणाले, १९६७ मध्ये गोलकनाथ विरुद्ध पंजाब सरकार असे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आले. या प्रकरणात न्यायालयाने संविधान संशोधनाचे संसदेचे अधिकार अनिर्बंध नाहीत, त्यावर निर्बंध आहेत, असा निर्णय दिला. मूलभूत हक्कावर गदा आणता येणार नाही. याप्रकरणात असे झाले असल्याने ही सुधारणा आम्ही रद्द करीत आहोत. त्यामुळे नाराज झालेल्या इंदिरा गांधी यांनी २४ वी घटनादुरुस्ती संसदेला अनिर्बंध अधिकार दिले आणि सांगितले की, न्यायपालिकेपेक्षा संसदेला अधिकार जास्त आहे. त्यापाठोपाठ २६ वी घटनादुरुस्ती केली. यावेळी संविधानात आम्हाला वाटेल तसे आणि वाटेल तेव्हा आम्ही दुरुस्ती करू शकतो अशी मुजोरी करण्यात आली. या घटना दुरुस्तीला केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार असे अपिल सर्वोच्च न्यायालयात चालले. त्यात १३ न्यायमूर्तींच्या घटनापीठाने निर्णय दिला की, संसदेला अधिकार आहेत; पण मूळ गाभ्याला धक्का न लावता बदल करता येतात, असे फडणवीस म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले

मुंबई येथील विधान भवन येथे ३ मार्चपासून सुरू झालेले महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे बुधवारी सूप वाजले. विधिमंडळाचे पुढील पावसाळी अधिवेशन येत्या ३० जून रोजी मुंबई येथे सुरू होणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केले.

### अण्णा बनसोडे विधानसभा उपाध्यक्षपदी



राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा सदस्य अण्णा बनसोडे यांची विधानसभा उपाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. बनसोडे यांच्या निवडीच्या प्रस्तावाला दोन्ही बाजुंच्या सदस्यांनी आवाजी मतदानाने समर्थन दिले.

# कामरा, अंधारेंविरुद्ध विधिमंडळात हक्कभंग

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवरील टीकेचे पडसाद

**मुंबई, २६ मार्च**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर सादर केलेले विनोदी गीत हा महत्वाच्या पदाचा आणि या सर्वोच्च सभागृहाचा अवमान असल्याचं कारण पुढे करत, विधान परिषदेत आणि विधानसभेत विनोदी कलाकार कुणाल कामरा आणि ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्या विरुद्ध हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.

कुणाल कामराने माफी मागणार नसल्याची भूमिका घेत पुन्हा एक गाणं प्रसारित करुन डिवचण्याचा प्रकार केला. शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पुन्हा एकदा तेच गाणं म्हटल्याचा व्हिडिओ समोर आला होता. या सर्व प्रकरणाचे तीव्र पडसाद विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात उमटले. विधान परिषदेत आमदार प्रविण दरेकर यांनी तर, विधानसभेत आमदार रमेश बोरनारे यांनी हक्कभंग प्रस्ताव आणला. सदर



हक्कभंग प्रस्ताव स्वीकारुन हक्कभंग समितीकडे पाठविण्यात आले.

**तर, परिस्थिती हाताबाहेर जाईल : मुनगंटीवार**

हक्कभंग आपण स्वीकारतो मात्र, निर्णय फार उशीरा होतात. त्यामुळे हे आयुधच बोथट झालं आहे. त्यामुळे या हक्कभंगासंदर्भात तातडीने कारवाई झाली पाहिजे. अन्यथा या सभागृहाची काडीचीही किंमत राहणार नाही. ही परिस्थिती हाताबाहेर जाईल असा निर्वाणीचा इशारा सभागृहातील ज्येष्ठ सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी दिला. (तभा वृत्तसेवा)

# कोलकाताने राजस्थानला हरविले

**गुवाहाटी :** गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएल-१८ मध्ये आपला पहिला विजय नोंदवला. बुधवारी त्यांनी राजस्थान रॉयल्सला ८ गडी राखून पराभूत केले. क्विंटन डी कॉकने सलग दोन षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला. परंतु त्याचे शतक केवळ तीन धावेने हुकले.

गुवाहाटीतील बारसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात कोलकाताने १७.३ षटकांत २ गडी गमावून १५२ धावांचे विजयी लक्ष्य गाठले. डी कॉकने ६१ चेंडूत ९७ फटकाविल्या. तो व अंगकृष रघुवंशी २२ धावांवर नाबाद राहिला.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या राजस्थानने २० षटकांत ८ गडी गमावून १५१ धावा केल्या. ध्रुव जुरेलने सर्वाधिक ३३ धावा केल्या. यशस्वी जैस्वालने २९ आणि कर्णधार रियान परागने २५ धावा केल्या. कोलकाताकडून हर्षित राणा, वैभव अरोरा, मोईन अली आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

## नयनरम्य नृत्याविष्कार





सोलापूर : ह.दे.प्रशालेच्या मैदानावर बुधवारी ऑक्टेव्ह २५ या सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत मणिपूरच्या कलाकारांनी बसंतरास हे अप्रतिम नृत्याविष्काराचे सादरीकरण केले. (छायाचित्र : केवल तिवारी)

# निकम यांनी केला पहिला युक्तिवाद

### संतोष देशमुख हत्या प्रकरण

**छत्रपती संभाजीनगर, २६ मार्च**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी बुधवारी बीड जिल्ह्यातील न्यायालयात प्राथमिक तथ्ये आणि हत्ये मागील हेतू न्यायालयाला सांगितला.

आरोप निश्चित करण्यासाठी १० एप्रिल रोजी अर्ज सादर केला जाणार आहे, अशी माहिती निकम यांनी दिली. संतोष देशमुख हत्या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाल्यानंतर ते पहिल्यांदाच येथील न्यायालयात आले. एका ऊर्जा कंपनीत मागितल्या जाणाऱ्या खंडणील विरोध करणारे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची मागील वर्षी ९ डिसेंबर रोजी छळ करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात वाल्मीक कराडसह आठ जणांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. अटक केलेल्या इतर आरोपींमध्ये सुदर्शन घुले, विष्णू चाटे, जयराम चाटे, महेश केदार, सुधीर सांगाळे, प्रतीक घुले आणि सिद्धार्थ सोनवणेचा समावेश आहे.

### पुढील सुनावणी १० एप्रिलला

या प्रकरणाची पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे. आज फिर्यादी पक्षाच्या वतीने युक्तिवाद सुरू केला. हा गुन्हा कसा घडला आणि त्याच्यासाठी रतलेल्या गुन्हेगारी कटाची माहिती मी न्यायालयाला दिली. हत्येगील हेतूची माहितीही न्यायालयाला दिली, असे निकम यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

# कचऱ्यातून ऊर्जा निर्माण झाली अन् 'शॉक' लागला

### शिंदेंचा ठाकरेंना थेट इशारा

**मुंबई, २६ मार्च**


काही मिस्टर बीनने डस्टबीनचा उल्लेख केला. सर्वसामान्य शिवसैनिकांना कचरा समजण्याची वृत्ती होती. त्याच कचऱ्यातून ऊर्जा निर्माण झाली आणि शॉक बसला. त्यातून अजून काहीजण सावरले नाहीत, असा घणाघात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केला. बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना काँग्रेसच्या डस्टबीनमध्ये टाकली होती. ती बाहेर काढण्याचा आम्ही प्रयत्न केला. डस्टबीनमध्ये कोण बसले होते, हे पाहिले नाही. मात्र, बाहेर आल्यावर कुणाला घाम फुटला? कोणी तीन-तीन ग्लास पाणी प्यायले? कोणी वाघ-बकरी चहा प्यायला? सगळं माहिती आहे. त्यामुळे मला जास्ती बोलायला लावू नका. 'बात निकलेगी तो दूर तक जायेगी', असा इशारा शिंदे यांनी ठाकरेंना दिला. विरोकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना शिंदे यांनी सदर वक्तव्य केले. एकनाथ शिंदे हे नरेंद्र मोदी



यांच्या डस्टबीनमध्ये होते, अशी टीका ठाकरे गट पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली होती. त्याचा खरपूस समाचार समाचार शिंदेंनी घेतला. कार्यकर्त्यांनो पेटवा मशाल आम्ही बंगल्यात झोपतो खुशाल. अशी मानसिकता असणारे रोज आरोप लावत फिरताना दिसतात. बाळासाहेब ठाकरे कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहायचे. त्यामुळे शिवसेना उभी राहिली. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत कोण काम करतेय्, हे लोकांना कळले आणि त्यांनी या निवडणुकीत दाखवून दिले असल्याचेही शिंदे यावेळी म्हणाले. मुंबईत सिंमेटचे रस्ते होत असताना अनेकांना जळफळाट होतोय. ७०१ किलोमीटर रस्त्यांचे काम सुरू आहे. आता मुंबईकरांची थोडी गैरसोय होतेय. पण, ३० वर्षे मुंबई खड्डेमुक्त होणार आहेत. गेली १० ते १५ वर्षे रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली तीन हजार कोटी रुपये लोकांचे वाया गेले. याला जबाबदार कोण? आता डांबरात हात काळे करण्याची संधी मिळणार नाही. राजाचा जीव पोपटात असतो, तसा काहींचा जीव मुंबईच्या रस्त्यात आहे. सिंमेंटच्या रस्त्याची चौकशी करावी, अशी काहीजण मागणी करतायेत. चौकशी तर झालीच पाहिजे. परंतु, १५ वर्षांत डांबरचे सांबर कुणी खाल्ले, आता सर्व पुढे येईल असेही एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

# लवकरच सुरू होणार कैलास-मानसरोवर यात्रा

**नवी दिल्ली :** लवकरच कैलास मानसरोवर यात्रा सुरू होण्याची शक्यता आहे. भारत आणि चीनच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष ताबा रेषेवर (एलएसी) आणि मानसरोवर यात्रेसह अनेक मुद्यांवर आढावा बैठक घेतली. या बैठकीत कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा लवकरात लवकर सुरू करण्यावर चर्चा झाली. २०२० मध्ये सीमेवर वाढलेल्या तणावामुळे यात्रेवर बंदी घालण्यात आली होती. या बैठकीचा मुख्य मुद्दा मानसरोवर यात्रा होता. अलीकडेच परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले होते की, यावर्षी कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्यावर एकमत झाले आहे, परंतु त्याची रुपरेषा ठरविणे बाकी आहे. भारत -चीन सीमा मुद्यांवरील सल्ला आणि समन्वयच्या ३३ व्या बैठकीदरम्यान ही चर्चा झाली.



भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयातील सहसचिव (पूर्व आशिया) गौरांगलाल दास यांनी केले, तर चीनच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या सीमा आणि महासागर व्यवहार विभागाचे महासंचालक हाँग लियांग यांनी केले.

# महाराष्ट्रात उष्माघाताचा पहिला बळी

### उन्हाच्या झळा




### संभाजीनगरात तरुणाचा मृत्यू

**छ. संभाजीनगर, २६ मार्च**

राज्यातील तापमानाचा पारा दिवसागणिक वाढत आहे. त्यातच छत्रपती संभाजीनगरच्या सोयगाव तालुक्यातील उष्माघाताचा पहिला बळी गेल्यामुळे चिंतेचे वातावरण पसरले आहे. येथील एका २५ वर्षीय तरुणाचा उष्माघातामुळे मृत्यू झाला. यामुळे उन्हाच्या झळा आता माणसांच्या जिवावर उठत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत आहे. सोयगाव तालुक्यात ३९ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले होते. परिणामी, अमोल दामोदर बावस्कर या २५ वर्षीय तरुणाचा उष्माघातामुळे मृत्यू झाला. तालुक्यातील बस थांब्यावरील ही घटना घडली. हा तरुण उन्हात बस थांब्यात विसावा घेत होता. तेव्हा तो अचानक कोसळला. या प्रकरणी सोयगाव पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे खडबडून जागे झालेल्या आरोग्य विभागाने जनतेला उन्हापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

राज्यात मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशावर पोहोचला आहे. यामुळे जिल्ह्यात सर्वत्र उकाडा वाढला आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिक मठ्ठा तसेच शीतपेयांच्या दुकानांवर गर्दी करत आहेत. सकाळी नऊ वाजेपासून उन्हाचे चटके बसत आहेत. त्यामुळे नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. आगामी काळात उष्णतेची लाट येणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे प्रशासन अलर्ट झाले आहे. प्रशासनाने यासंबंधी उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांसाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. तसेच सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये स्वतंत्र कक्ष व बेडचीही व्यवस्था करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे यंदा मार्चच्या पहिल्या आठवड्यापासूनच तापमानात वाढ नोंदविण्यात आली आहे. फेब्रुवारी महिन्याने मागील काही वर्षांचा अधिक तापमानाचा उच्चांक मोडला होता. (वृत्तसंस्था)




# भारतीय अर्थव्यवस्था जपान, जर्मनीला मागे टाकणार

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालातील माहिती



**नवी दिल्ली, २६ मार्च**

भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था असलेल्या जपानला मागे टाकण्याच्या जवळपास पोहोचला आहे. जपानचे सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात् जीडीपी सध्या ४.४ ट्रिलियन डॉलर्स इतका आहे. भारत २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत म्हणजेच दिवाळीत हा आकडा गाठू शकतो. जर भारताच्या विकासाची गती याचपद्धतीने कायम राहिल्यास २०२७ च्या पहिल्या तिमाहीपर्यंत जर्मनीलाही मागे टाकून जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालातून देण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार बाजारपेठेत वाढणारी मागणी आणि अर्थव्यवस्थेच्या वेगाला चालना देण्यासाठी सरकारी पातळीवर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे भारताची अर्थव्यवस्था याचवर्षी ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीत जपानला मागे टाकून चौथ्या क्रमांकार जाणार आहे. त्यानंतर २०२७ च्या पहिल्या तिमाहीत जर्मनीला मागे टाकून जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार आहे. जर्मनी सध्या जगातील तिसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था असेलला देश आहे. जर्मनीचा विद्यमान जीडीपी ४.९ ट्रिलियन डॉलर्स इतका आहे. जागतिक मंदी आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे जपान आणि जर्मनीच्या अर्थव्यवस्थेचा वेग मंदावला असून याचा फायदा भारताला होत आहे. मागील दहा वर्षांत भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन हा दुपटीने वाढले आहे. (वृत्तसंस्था)

### दहा वर्षांत १०५ टक्के वाढ

२०१५ साली २.१ ट्रिलियन डॉलर्स असलेला भारताचा जीडीपी दहा वर्षांत २०२५ साली ४.३ ट्रिलियन डॉलरवर पोहोचला आहे. दहा वर्षांत यात १०५ टक्के वाढ झाली. विकासाची गती वाढत असताना अमेरिका आणि चीनच्या तुलनेत भारतावरील कर्ज कमी आहे. मार्च २०२५ मध्ये अमेरिकेचे राष्टीय कर्ज ३६.२२ ट्रिलियन डॉलर, तर चीनचे राष्टीय कर्ज सप्टेंबर २०२४ पर्यंत २.५२ ट्रिलियन डॉलर्स इतके होते. तुलनेने सप्टेंबर २०२४ मध्ये भारतावरील एकूण कर्ज ७१२ अब्ज डॉलर्स इतके होते.

### अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे टप्पे

- **२००७ साली भारताच्या जीडीपीने १ ट्रिलियन डॉलर्स टप्पा गाठला होता. यासाठी तब्बल ६० वर्षांचा कालावधी लागला.**
- **२०१४ साली जीडीपी दुप्पट होऊन २ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला.**
- **कोरोनाचे संकट आणि अर्थव्यवस्थेची मंद गती असतानाही २०२१ साली ३ ट्रिलियनचा टप्पा ओलांडला.**
- **३ ट्रिलियनपासून ४ ट्रिलियनचा टप्पा गाठण्यासाठी भारताला केवळ चार वर्षांचा काळ लागला.**

## संक्षिप्त वृत्त



### अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या तीन तरापा महसूल प्रशासनाने केल्या नष्ट

**पंढरपूर, दि. २६ मार्च -**

उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि.२६ मार्च रोजी गोपाळपूर नजीकच्या चंद्रभागा नदी पात्रामध्ये गोपाळपूर आसबे मळा येथे असणाऱ्या ओढ्यामधील अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या तीन थर्माकोल तरापा नष्ट करण्यात आल्या आहेत. या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी पंकज राठोड, संतोष सुरवसे, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगटाळे, अनिल बागल, सरताज मुजावर, गणेश पिसे, रविकिरण लोखंडे, लोकरे, तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.



### महेदिया समाजाच्यावतीने बार्शी येथे रोजा इफ्तार पार्टी

**बार्शी, दि. २६ मार्च-**

बार्शी शहरातील मेहदीनगर येथे महेदिया समाजाच्यावतीने भव्य रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक महादिमिया लांडगे यांनी केले होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. या इफ्तार पार्टीसाठी आमदार दिलीप सोपल आणि पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे हे प्रमुख उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार समाजातर्फे शेहजादे मौलवी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष कृष्णाराज बारबोले, मनिष चव्हाण, नगरसेवक देवकर, राहुल कोंढारे, किरण देशमुख, विवेक गजाशिव, शोएब सय्यद, प्रशांत शेटे, पासाभाई शेख, बाबू काळे, लालू सौदागर, उस्मान अलीशाह उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महादिमिया लांडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम संपल्यानंतर उपस्थितांनी इफ्तार भोजनाचा आस्वाद घेत आपुलकीचे दर्शन घडवले.

### पिलीव येथील मौर्य मदनेची नवोदय विद्यालयात निवड



**पिलीव, दि.२६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील मौर्य राहुल मदने याची पोखरापुर येथील नवोदय विद्यालयात निवड झाली आहे. तो सध्या कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात इयत्ता सहावीमध्ये शिकत आहे. त्याने गेल्या वर्षी म्हणजेच २०२३-२४ मध्ये इयत्ता पाचवी मध्ये असताना नवोदयची परीक्षा दिली होती. यातून त्याची नुकतीच पोखरापुर येथील पी एम. नवोदय विद्यालयात निवड झाली आहे.

### राज्यात शिक्षक अभियोग्यता परीक्षा होणार; टीएआयटी परीक्षा मे-जूनमध्ये होण्याची शक्यता

**सोलापूर, दि. २६ मार्च,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने येत्या मे आणि जून महिन्यात शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टीएआयटी) आयोजित करण्यात आली आहे. पवित्र पोर्टलवर सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत उमेदवारांची निवड टीएआयटी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्यात येते. त्यामुळे शिक्षक होण्याची इच्छा असलेल्या पात्रताधारकांनी या परीक्षेची तयारी सुरू करावी, असे आवाहन परीक्षा परिषदेने केले आहे. सन २०१७ नंतर २०२२ साली शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी घेण्यात आली होती. त्यानंतर आता मे आणि जून महिन्यात टीएआयटी परीक्षा घेण्याची घोषणा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केली आहे. शिक्षक पात्रता परीक्षेचा पहिला आणि दुसरा पेपर उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची इयत्ता पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवीसाठी निवड केली जाते.

**उर्वरित सर्व जागा भरून भावी शिक्षकांना न्याय द्यावा**

सात-आठ वर्षांमध्ये शिक्षक अभियोग्यता परीक्षा तिसऱ्यांदा आयोजित करण्याचा विचार शासन विचारधीन आहे. मंजूर पदांची संख्या जास्त आहे. त्याप्रमाणे उर्वरित रिक्त पदांची भरती पूर्ण व्हावी. यावेळी उर्वरित सर्व जागा भरून भावी शिक्षकांना न्याय द्यावा. परीक्षा नोटिफिकेशन नंतर लगेच ४०-४५ दिवसाच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण करून त्याप्रमाणे निवड व नियुक्ती यादी लावण्यात यावे.

**- प्रशांत शिरगूर, राज्य उपाध्यक्ष, डी.एड बी.एड असो.तथा पवित्र पोर्टल संघटना महाराष्ट्र राज्य.**

Classifieds

**विकणे आहे**

**विजापूर रोड, अत्तार नगर येथील प्लॅट नं. १०१ अंबिका रेसिडेन्सी अपार्टमेंटमधील ३ BHK प्लॅट विकणे आहे.**
**- संपर्क -**
**प्रदीप चंद्रकांत ख्याडे**
**मो. ९८९०८६६४६४**
**८१७७९७८३८३**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# शासनाच्या सर्व सेवा नागरिकांना ऑनलाइन उपलब्ध करून द्या

### पुणे विभाग राज्य आयुक्त दिलीप शिंदे यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार लोकसेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यातील सर्व नागरिकांना सुलभ, तत्पर आणि कालबद्ध सेवा उपलब्ध करून देणे हा आयोगाचा मुख्य उद्देश आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांनी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करून आपल्या विभागांतर्गत च्या सर्व सेवा ऑनलाइन पद्धतीने सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध करून द्याव्यात. तसेच या सर्व सेवा आयोगाने निर्देशित केलेल्या विहित वेळेत उपलब्ध झाल्या पाहिजेत, असेही निर्देश पुणे विभाग राज्य हक्क आयोगाचे राज्य आयुक्त डॉ. दिलीप शिंदे यांनी दिले.



नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हा आढावा बैठकीत महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे राज्य आयुक्त दिलीप शिंदे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओम्बासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे प्रमुख, महसूल चे उपविभागीय अधिकारी तहसीलदार आदी उपस्थित होते.

राज्य आयुक्त श्री शिंदे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क आयोगाला दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. राज्य शासनाने सर्वसामान्य नागरिकांना विहित कालावधीत नागरिकांना सेवा उपलब्ध करून देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतलेला होता त्या अनुषंगाने सर्व शासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त सर्व सेवा व योजनांची माहिती ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून दिली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग अंतर्गत पुणे लोकसेवा हक्क आयोगाचे राज्य आयुक्त श्री दिलीप शिंदे यांनी सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत नागरिकांना देण्यात येत असलेल्या विविध सेवा विषयक काम काजाची तपासणी केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागांची तसेच सेवांची माहिती दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. तसेच यावेळी राज्य आयुक्त दिलीप शिंदे यांनी सोलापूर उत्तर तालुका पंचायत समितीची पाहणी व तपासणी केली.

शासनाच्या सर्व विभागांची सेवा आपले सेवा सरकार पोर्टलवर जोडण्याचे काम सुरू असून ते लवकरच पूर्ण होईल त्यामुळे शासनाच्या सर्व सेवा आपले सेवा सरकार पोर्टलवरच उपलब्ध होतील. सद्यस्थितीत राज्य शासनाच्या ९६९ सेवा पैकी ५३६ सेवा ऑनलाइन उपलब्ध झालेल्या आहेत तर उर्वरित सेवा ऑफलाइन पद्धतीने दिल्या जात आहेत. ऑफलाइन सेवा ही लवकरच ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे आयोगाचे प्रयत्न सुरू आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त विभागांनी त्यांच्या नागरिकांसाठी असलेल्या सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून द्याव्यात तसेच ऑनलाइन सेवा उपलब्ध केलेली असेल तर ऑफलाइन अर्ज स्वीकारू नयेत असेही राज्य आयुक्त श्री. शिंदे यांनी निर्देशित केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हास्तरीय यंत्रणे कडून राज्य लोकसेवा हक्क आयोगानुसार देण्यात येत असलेल्या सेवांची माहिती दिली. तर महापालिकेच्यावतीने देण्यात येत असलेल्या एकूण ६७ सेवांची माहिती आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी देऊन यातील ३८ सेवा सध्या ऑनलाईन देण्यात येत असून पुढील आठवड्यात आणखी नऊ सेवा ऑनलाईन उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर जिल्हा परिषद अंतर्गत देण्यात येत असलेल्या सेवांची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी महसूल प्रशासनाच्या वतीने लोकसेवा हक्क आयोगाच्या कामकाजाची माहिती दिली. उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी प्रस्ताविक केले. तहसीलदार शिल्पा ओसवाल यांनी सूत्रसंचालन केले.

# सीएसआर फंडातून इच्छुकांनी महापालिकेस सहकार्य करावे

### विविध कंपन्या, संस्थांच्या बैठकीत महापालिका आयुक्तांचे आवाहन

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

सोलापूर शहरातील पर्यावरण संवर्धन पाणी व इतर विकास काम ासंदर्भात सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंड ) विविध कंपन्या बँक आणि संस्थांनी महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

सामाजिक उत्तरदायित्व निधीतून संबंधित संस्थांनी या अंतर्गत असलेल्या विविध कामांसाठी मदत करावी याकरिता महापालिकेत बैठक आयोजित केली होती. त्या प्रसंगी ते बोलत होते. या बैठकीस याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त आशिष लोकरे, आयुक्तांचे स्वीय सहाय्यक राहुल कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्यासह विविध कंपन्या, बँका आणि संस्था - संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. ओम्बासे म्हणाले, संबंधित बैठकीला बँकांचे, विविध कंपन्यांचे आणि संस्था संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. चांगली चर्चा झाली. सर्वांनी सीएसआर फंडातून आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. सीएसआर फंडातून संबंधित इच्छुकांनी आर्थिक, सेवा व वस्तू स्वरूपात मदत करावी. त्यासाठी प्रस्ताव महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त किंवा आयुक्त यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

# माळशिरसमधील दलित वस्ती कामांची चौकशी करा

### सुनील ओवाळ यांची गटविकास अधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २६ मार्च -**

माळशिरस तालुक्याच्या पश्चिम भागातील नातेपुते विभागातील सर्व गावात दलितवस्ती सुधार योजनेच्या कामांमध्ये अनियमितता असून कामे अंदाजपत्रकाप्रमाणे इस्टिमेट प्रमाणे होत नाहीत. अनेक कामे एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी कोणतीही मंजुरी न घेता केली जातात त्यामुळे गावनिहाय चौकशीची मागणी माळशिरसचे सामाजिक कार्यकर्ते सुनील ओव्हाळ यांनी माळशिरस गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



अनेक जागांचे बक्षीस पत्र नसताना सुद्धा त्या ठिकाणी कामे केलेले आहेत. त्यामुळे शाखा अभियंत्याचे मनमनी कारभाराची व संबंधित ठेकेदार. स्थानिक ग्राम पंचायत प्रशासन, पदाधिकारी, ग्राम सेवक यांच्या आर्थिक लागेबंधाची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच कोणतीही कारणे न देता तांत्रिक मान्यता असलेली व सध्या सुरू असलेली सर्व कामे चौकशी होईपर्यंत थांबवण्यात यावीत. कारण,या भागात दलित वस्ती सुधार योजनेच्या अंतर्गत होणारी सर्व प्रकारची, बहुतांश कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असून,ही दर्जाहीन कामे ही काही महिन्यातच खराब होत आहेत.तर अनेक कामेही मागासवर्गीय व्यक्तीची संख्या नसताना सुद्धा त्या ठिकाणी दलितवस्ती स्थापन केल्यामुळे, सुवर्ण व्यक्तींच्या भागात सुद्धा केली जात आहेत. तर अनेक भागात अक्षरशः मागासवर्गीय व्यक्तीच्या ओट्यावरती, दरवाजासमोर फक्त निधी मिळवण्याच्या उद्देशाने इस्टिमेट विचारात न घेता कामे केली आहेत. त्यामुळे मी विनंती करतो की, आंम्ही मागणी केल्याप्रमाणे चौकशी होईपर्यंत, सध्या या भागात सुरू असलेली सर्व प्रकारची कामे (रस्त्यासह) त्यांना तात्काळ स्थगिती द्यावी ही कामे थांबवण्यात यावीत .

आपण कर्तव्यदक्ष अधिकारी आहात, त्यामुळे प्रामाणिक अभियंता/अधिकाऱ्यांची एक समिती नेमून त्यांच्या माध्यमातून ऑन कॅमेरा,विषयांकीत प्रत्येक गावातील दलित वस्तीतील काम निहाय ऑन कॅमेरा चौकशी होऊन सदर कामातील अनियमितता व कामांचा दर्जा तपासण्यात यावा तसेच अनेक ठिकाणी काही अभियंते स्वतःच, ठेकेदार अशी संगणमतकरून भागीदार होऊन कामे करत आहेत याबद्दल सध्या तरी आमच्याकडे पुरावा नाही. मात्र, ही वस्तुस्थिती नाकारता ही येत नाही. त्यामुळे सध्या या तक्रारीची गांभीर्यपूर्वक दखल घेऊन आपण उचित कार्यवाही करावी. येत्या दि. १० एप्रिलपर्यंत सदरची कारवाई व्हावीच, परंतू तत्पूर्वी, सध्या तांत्रिक मान्यतेसह सुरू असलेली, या भागातील,सर्व कामे तात्काळ थांबवण्याचा आदेश न दिल्यास झाल्यास, मी दि. १४ एप्रिल रोजी बेमुदत आमरण उपोषण करण्याकरिता आपल्या पंचायत समिती माळशिरससमोर बसणार आहे.

# श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या चरणी साडे सहा लाखांच्या किंमतीचे दागिने अर्पण

### चेन्नई येथील भाविकांकडून २ लाखांची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ मार्च -**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस दानशुर भाविकांकडून सोन्याचा चार पदरी हार पदकासह, ठुशी व चेन असे सहा लाख ५० हजार किंमतीचे दागिने व दोन लक्ष रूपयाची देणगी मिळाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.





राकेश परशुराम दलाल व रुपेश परशुराम दलाल रा.ठाणे यांनी कै. परशुराम गोविंद दलाल या आपल्या वडीलांच्या स्मरणार्थ सोन्याचा चार पदरी हार पदकासह व ठुशी असे सुमारे ७३.९५० ग्रॅम वजनाचे दागिने अर्पण केलेले आहेत. त्याची अंदाजे ५ लाख ८२ हजार इतकी किंमत होत आहे. त्याबद्दल देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कर्मचारी रमेश गोडसे यांच्या हस्ते श्रींचा फोटो, उपरणे, दिनदर्शिका व दैनंदिनी देऊन सन्मान करण्यात आला. याशिवाय, संकेत भास्कर पंडित रा. छत्रपती संभाजी नगर या भाविकाने ९.८०० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन अर्पण केली असून, त्याची ७७ हजार इतकी किंमत होत आहे. त्याबद्दल त्यांचा देखील मंदिर समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच पी एस कुमारगुरूतम, चेन्नई यांनी धनादेश स्वरूपास दोन लक्ष रूपयाची देणगी दिली. त्यांचा देखील मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते उपरणे व श्रींचा फोटो देऊन सन्मान करण्यात आला.

# भावसार समाजाची कुलदेवता : हिंगलाजमाता प्रकटदिन विशेष

हिंगुलांबिका देवीचे मूळ स्थान आदिशक्तीची ५१ शक्तीपीठे आहेत. त्यातील पहिले शक्तीपीठ हे हिंगुला देवीचे होय. भारत व पाकिस्तानातील हिंदू-मुस्लिमांचे श्रद्धास्थान असलेले हे शक्तीपीठ पाकिस्तानात असून कराचीपासून वायव्येस २२५-२५० कि.मी. अंतरावर लासबेला संस्थानात हिंगोल नदीच्या किनाऱ्यावर आहे. हिंगुलांबिका नावाची उत्पत्ती भगवान शंकराची पत्नी सती ही प्रजापती दक्ष राजाची मुलगी होती. प्रजापती दक्ष राजाने केलेल्या यज्ञात आपल्या न बोलवता आलेल्या मुलीचा व शंकराचा अपमान करून तो पार्वतीस यज्ञमंडपातून बाहेर काढतो. अपमानाने क्रोधित झालेल्या पार्वतीने त्या यज्ञातच स्वत:स जाळून घेते. त्यामुळे दक्षराजावर क्रोधित झालेल्या भगवान शंकराने ते पार्वतीचे शव घेऊन आसमंतात संचार करताना त्या शवाचे ५१ तुकडे होऊन वेगवेगळ्या ठिकाणी पडले. ज्या ज्या ठिकाणी ते तुकडे पडले ते सर्व शक्तीपीठे बनली. बलुचिस्तानातील डोंगरावर शिवपत्नीचे/पार्वतीचे ब्रम्हरंध्र (स्त्रिया आपल्या सौभाग्याचे कुंकू, सिंदूर लावतात तो भाग) पडले. सतीच्या मस्तकावर/ब्रम्हरंध्रावर कुंकू, सिंदूर असल्याने आणि कुंकूस संस्कृतमध्ये हिंगुल असे म्हणतात. म्हणून या भागास हिंगोल, हिंगुल, हिंगुलु असे म्हणतात. व अग्निपुराणातील अध्याय १२ नुसार व भागवत पुराणातील अध्याय ३ नुसार शिवपत्नी पार्वती/ दक्षराजाची कन्या सती हीच अंबिका आहे. अशा प्रकारे हिंगुलांबिका या शब्दाच्या एकत्रीकरणातून हिंगुलांबिका या शब्दाची उत्पत्ती झाली. भक्ताच्या हाकेला धावणारी सध्या हे ठिकाण पाकिस्तानात असून हिंदू धर्म ग्रंथ आणि संतांच्या कथेनुसार येथे विष्णूचे अवतार परशुराम यांचे वडील जमदग्नि यांनी घोर तपस्या केली होती. भगवान परशुरामाच्या २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करण्याच्या प्रतिज्ञेमुळे अनेक क्षत्रिय हिंगलाज देवीच्या आश्रयाला गेले. देवीने त्यांना ब्रम्हक्षत्रियत्व देऊन त्यांचे रक्षण केले. अनेक क्षत्रिय या देवीच्या आश्रयाने आपला व्यवसाय बदलून राहत होते. वेगवेगळे व्यवसाय करून जगत होते. ज्या देवीच्या आशीर्वादाने ते क्षत्रिय जिवंत राहीले ती देवी त्यांची कुलदेवता बनली. ब्रम्हवैवर्त्यपुराणानुसार बलुचिस्तानातील हिंगलाजमातेचे दर्शन केल्यास त्याला पूर्वजन्माच्या कर्माचे दंड मिळत नाही. प्रभू रामचंद्रसुद्धा रावणाचा वध केल्यानंतर ब्राम्हण हत्येपासून मुक्ती मिळविण्यासाठी देवीच्या दर्शनासाठी आले होते. त्याचबरोबर आध्यात्मिक संत गुरु नानक, दादा मखान, गोरखनाथ व भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांनीसुद्धा हिंगलाजमातेचे दर्शन घेतले होते. जेव्हा भारत व पाकिस्तानची फाळणी झाली तेव्हा या मंदिराचा उपयोग रिफ्युजी कॅम्पसारखा केला गेला होता. पाकिस्तानातील प्रति वैष्णवदेवी वैष्णवदेवीप्रमाणेच मातेचा निवास पर्वतीय गुहेत आहे. हजार फुटांचे उंच-उंच पर्वत, लांब-लांब पसरलेले निर्मनुष्य वाळवंट, जंगलातील जंगली श्वापदे, तीनशे फुट उंच ज्वालामुखी व पाकिस्तानातील दहशतवाद त्यामुळे ही यात्रा करणे हे एक चित्तथरारक अनुभव समजला जातो. हाच चित्तथरारक अनुभव तेलगू चित्रपट निर्माते चंद्रशेखर येलेटी यांनी आपल्या साहसम या चित्रपटात दाखविला आहे. हा चित्रपट हीट ठरल्यामुळे नंतर तो तमीळ व हिंदीत द रियल जॅकपॉट या नावाने प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटामध्ये अभिनेत्याचा भारत ते पाकिस्तानातील हिंगलाजमाता मंदिरातील खजिन्यापर्यंतचा चित्तथरारक प्रवास हाच चित्रपटाचा मुख्य गाभा आहे. अश्या या खजिन्याच्या लालसेपोटीच अनेक परकिय आक्रमकांनीदेखील या मंदिराला लक्ष्य केल्याचे दिसून येते. चीनी बौद्ध भिक्षुच्या मतानुसार भारतावर आक्रमण करणारा प्रथम मुस्लिम शासक मुहमद बिन कासिम व भारतावर १७ स्वार्या करणारा गजनीचा महमद यांनी हिंगलाज देवीचे मंदिर लुटण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर दहशतवादी व कट्टरपंथीयांनीसुद्धा अनेक वेळा मंदिर लुटण्याचा प्रयत्न केला. परंतु स्थानिक हिंदू व मुस्लिमांनी या मंदिराचे रक्षण केले. पाकिस्तानी मुस्लिमांमध्येही देवीचा मोठा भक्त वर्ग आहे. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, अमेरिका, ब्रिटन, इजिप्त, इराण इत्यादी देशातील लोक या स्थळाला भेट देतात. हे पाकिस्तानातील प्रसिद्ध धार्मिक पर्यटनस्थळ असून बलुचिस्तानमधील अवामी पार्टी चे सिनेटर दानेश पलानी यांनी पाकिस्तानातील सिनेटमध्ये भाषणात म्हटले आहे की, बलुचिस्तानमधील हिंगलाजमाता मंदिर धार्मिक दृष्टीने अधिक महत्वाचे आहे. या देवीच्या भक्तांमध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीसुद्धा आहेत. असे सांगून या स्थळाचा विकास करण्यास सुचविले होते. यावरून इस्लामिक पाकिस्तानमध्ये हिंदू मंदिराचे (हिंगलाजमाता) काय महत्व आहे? हे लक्ष्यात येईल. पाकिस्तानातील अनेक मुस्लिमही देवीची यात्रा करतात. देवीचे दर्शन घेणाऱ्या महिलेस पाकिस्तानमध्ये हाजियानी म्हटले जाते. त्यांना धार्मिक ठिकाणी सन्मानाने पाहिले जाते. हिंगलाजमाता पाकिस्तानात नानी माँ याच नावाने प्रसिद्ध आहे. सोलापुरातील भावसार समाज अनेक जात, धर्म, पंथ व भाषा बोलणारे लोक सोलापूरात कित्येक वर्षापासून गुण्यागोविंदाने राहतात. त्याचप्रमाणे भावसार क्षत्रिय समाजही संघटीतपणे राहात असल्याचे दिसून येते. तसेच या शहराच्या औद्योगिक जडणघडणीतही भावसार क्षत्रिय समाजाचा सिंहाचा वाटा आहे. या समाजास धार्मिक दृष्टीने एकत्र ठेवण्याचे कार्य गणेश पेठेतील श्री हिंगुलांबिका देवीच्या कृपेने होत आहे. श्री हिंगुलांबिका देवी ही भावसार क्षत्रिय समाजाची कुलदैवत आहे. २७ मार्च २०२५ रोजी देवीचा प्रकटदिन साजरा केला जाणार आहे.



**मूर्तीची प्रतिष्ठापना**

सोलापूरातील गणेश पेठेत हिंगुलांबिका देवीचे पुरातन मंदिर आहे. पूर्वी या मंदिरात हिंगुलांबिका देवीची पितळेची मूर्ती होती. इ.स. १८९८ साली देवीच्या काळ्या पाषाणाच्या मूर्तीची मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. १९४५ ज्येष्ठ कृष्णपक्ष नवमी या दिवशी (१२ जून २०२३) रोजी देवीच्या नवीन मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. देवीची जुनी मूर्ती धुळे येथील मूर्ती संग्रहालयात संशोधनाकरिता पाठविण्यात आलेली आहे.

**मंदिराचा जीर्णोद्धार**

मंदिराचे बांधकाम इ.स.१८९८ साली झालेले होते. इ.स. १९९२ साली मंदिराचे जिर्णोद्धार करण्यात आले. हिंगुलांबिका देवी मंदिर हे वास्तुशिल्पाचा आदर्श व उत्कृष्ठ नमुना म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो. ४० फूट रूंद व १२० फूट लांबीच्या जागेत प्रचंड मंदिर उभे असून पूर्ण बांधकाम हे गर्भगुडी काळ्या पाषाणाचे असून आतील भाग मार्बलने सुशोभित केलेला आहे. शिखराची उंची ६५ फूट असून त्यावर अनेक देवदेवतांचे सुंदर मनोहारी कोरीव मूर्ती बसविण्यात आलेल्या आहेत. मंदिराच्या पश्चिमेकडच्या बाजूस पूर्वाभिमुख देवीची मूर्ती आहे.

**- प्रमोद हंचाटे,**
**मुख्याध्यापक, हिंगुलांबिका प्राथमिक शाळा**

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# महिला सशक्तीकरणाचा मोदीमंत्र

'नारी अस्य समाजस्य कुशलवस्तुकार अस्ति' अर्थात स्त्री ही समाजाची आदर्श शिल्पकार आहे. भारतीय तत्त्वज्ञानातील हा उल्लेख महिलांमधील शक्ती आणि कला प्रकट करतो. भारतात, महिला नेहमीच अग्रणी, प्रथम राहिल्या आहेत. मातृशक्तीला आदिशक्ती मानले जाते. आपल्या परंपरा, संस्कृती आणि विचारसरणीत महिलांचा आदर केला जातो. त्याच महिलांची भारतातील आजची सुधारलेली स्थिती सर्वत्र कौतुकास पात्र ठरत आहे. कुणी म्हणेल एकीकडे महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ झालेली असताना, तुम्ही महिलांच्या प्रगतीचे, यशस्वितेचे गोडवे कसे गाऊ शकता? पण त्यालाही निरुत्तर केले जाऊ शकते. गेल्या काही वर्षांत महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांची पोलिसांमध्ये होणारी नोंद वाढली असल्याने त्यांच्याविरोधातील गुन्ह्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली दिसते आहे. पूर्वी महिलांविरुद्धचे गुन्हे थेट पोलिसांपर्यंत पोहोचण्यासारखी परिस्थितीच नव्हती. त्यामुळे महिलांच्या प्रगतीचा मुद्दा जिथे कुठे चर्चिला जाईल तेथे या बदललेल्या परिस्थितीचा उल्लेख देखील केलाच जायला हवा. सर्वच क्षेत्रांमध्ये आज पूर्वीची सरकारे आणि आताचे सरकार यांच्या कामगिरीची तुलना होऊ लागली आहे. संसदेतील आणि विभिन्न राज्य विधानसभांमधील लोकप्रतिनिधींच्या चर्चांमध्ये अशी तुलना होत असल्याची कितीतरी उदाहरणे देता येतील. या विषयावरून एकमेकांवर कुरघोडी करण्याचे राजकारणही सुरू असते. म्हणून काही मोदी सरकारने महिला उत्थानासाठी केलेल्या उपाययोजना दुर्लक्षित होतील असे नाही. सरकारच्या अर्थात सरकार कर्मचाऱ्यांच्या आणि सत्ताधारी पक्षाच्या कार्यक्षमतेचा मुद्दा उपस्थित होताच मोदी सरकारच्या आणि पूर्वीच्या काँग्रेस सरकारच्या कार्यशैलीची तुलना होतेच. रस्ते, पायाभूत सुविधा, विज्ञान तंत्रज्ञान, दळणवळण, पर्यटन, रेल्वे, संरक्षण, महसूल, अर्थ अशी कितीतरी खाती आहेत, ज्या क्षेत्रातील मोदी सरकारची प्रगती डोळे दीपवून टाकणारी म्हणावी लागेल. या सर्वांची आकडेवारीही उपलब्ध आहे. याच मालिकेत महिलांच्या कामगिरीचाही मुद्दा प्रकर्षाने चर्चिला जातो आहे. अशी कितीतरी क्षेत्रे महिलांनी गेल्या काही वर्षांत पादाक्रांत केली असून, सर्वच क्षेत्रांत महिलांचा टक्का वाढलेला दिसतो आहे. संरक्षण क्षेत्रात जिथे प्रत्यक्ष लढाईशी संबंध असलेल्या क्षेत्रात महिलांच्या भरतीचा विचारही होत नव्हता, अशी क्षेत्रे मोदींनी महिलांसाठी खुली करून दिली आहेत. मिळालेल्या संधीचा महिलांनीही योग्यरीत्या उपयोग करून, देशाचे नाव इतिहासात नोंदविले आहे. गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळातील महिलांच्या कामगिरीची झलक मोदी सरकारने नुकत्याच प्रसिद्धीस दिलेल्या एका जाहिरातीद्वारे करून दिली आहे. या योजनांमुळे देशातील महिलांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणला असून, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेल्या ठोस पावलांमुळे शिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि सामाजिक सुरक्षिततेसारख्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. उज्ज्वला योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ, मातृ वंदना योजना, मुद्रा योजना, महिला शक्ती केंद्र, सैनिकी शाळांमधील महिलांचे प्रवेश, सीआरपीएफ आणि सीआयएसएफमधील महिलांसाठीचे विशेष आरक्षण, महिलांच्या प्रसूती रजेतील वाढ यासारख्या उपक्रमांनी महिलांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य केले आहे. महिलांना संधी दिली तर त्यासुद्धा आपल्यातील गुणांचे प्रकटीकरण करून देशाच्या विकासात हातभार लावू शकतात, हेच या योजनांच्या अंमलबजावणीतून सिद्ध झाले आहे. या तुलनेत काँग्रेसच्या कार्यकाळात महिलांच्या प्रगतीसाठी विशेष पावले उचलली न गेल्याने त्या पिछाडीवरच राहिल्या. मोदी सरकार केवळ जाहिराती प्रसिद्ध करून जगाचे लक्ष वेधू इच्छित नाही. महिलांबाबतच्या विविध योजनांच्या आकड्यांचीही त्यांच्या कार्यकर्तृत्वाला जोड आहे. बेटी बचाओ बेटी पढाओ या अभियानाने लिंगभेदावर मात करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताच्या क्षेत्रांत महिला आणि मुलींची अत्यल्प उपस्थिती ही भारतातील धोरणकर्त्यांसाठी सतत चिंतेची बाब राहिली आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे या क्षेत्रातील महिलांचा सहभाग घटतो, ज्यामुळे त्यांच्या करीअरला ब्रेक मिळतो आणि त्यांची कामावरील गैरहजेरी वाढते. यासंदर्भात केलेल्या उपाययोजनांमुळे भारतातील संशोधन आणि विकास उपक्रमांमध्ये आज १८.६ टक्के महिला संशोधक बघायला मिळत आहेत. 'विमेन इन सायन्स अ‍ॅण्ड इंजिनीअरिंग-किरण' ही योजना महिलांना करीअरच्या विश्रांतीनंतर पुन्हा कामावर परत येण्यासाठी प्रोत्साहित करते. विज्ञान ज्योती कार्यक्रमांतर्गत, ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींवर लक्ष केंद्रित केले जाते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीने अलिकडच्या वर्षांत अतिरिक्त जागा सुरू करून महिलांचे प्रवेश वाढवले आहेत. संरक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी परीक्षेसाठी महिला अर्जदारांची वार्षिक वाढ १५ टक्के आहे. तीनही सेवांमध्ये महिलांचे २० टक्के प्रतिनिधित्व साध्य करण्याचे लक्ष्य २०३० पर्यंत निर्धारित करण्यात आले आहे. भारतीय सशस्त्र दलात महिला अधिकाऱ्यांची संख्या ११ हजारांहून अधिक आहे. निवड प्रक्रिया कठोर निकषांवर आधारित असूनही महिला उमेदवारांना समान संधी दिल्या जात आहेत. स्टार्टअप इकोसिस्टममध्ये लहान शहरांमधील नवउद्योजकतेच्या वाढीसोबतच महिलांचा सहभागही उल्लेखनीय ठरत आहे. 'नॅशनल स्टार्टअप अवॉर्ड्स' पुरस्कारासाठी नामांकन मिळालेल्या एकूण स्टार्टअप्सपैकी २० टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत.

२०२१-२०२२ मधील आर्थिक सर्वेक्षणानुसार, महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मोदी सरकारने मुद्रा योजनेंतर्गत २५ कोटींहून अधिक कर्ज वितरित केले होते, ज्यापैकी सुमारे ७० टक्के कर्ज महिला उद्योजकांना देण्यात आले आहे. यामुळे महिलांचे आर्थिक सशक्तीकरण अधिक मजबूत झाले आहे. एप्रिल २०२३ मधील केंद्र सरकारच्या अहवालानुसार ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील १० कोटी महिलांना महिला बचत गटांमध्ये समाविष्ट करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय मोहीम सुरू करण्यात आली. मोदी सरकारच्या कार्यकाळात महिलांची प्रसूती रजा १२ आठवड्यांवरून २६ आठवड्यांपर्यंत वाढवली गेली. प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात महिलांना हक्काची मालकी देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या टप्प्यात, लाभार्थींच्या कुटुंबातील महिला सदस्यांच्या नावावर घर असणे अनिवार्य करण्यात आले आहे. योजनेत 'स्त्री मालकी' आणि 'संयुक्त मालकी' असे पर्याय उपलब्ध केले गेले असून, सबसिडी असलेल्या घरांच्या निर्मितीत 'केवळ पुरुषांची' नोंदणी पूर्णपणे काढून टाकण्यात आली आहे. महिलांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे पीएम आवास योजनेअंतर्गत दिलेल्या घरांपैकी ७५ टक्के घरे केवळ महिलांच्या किंवा संयुक्त स्वरूपात त्यांच्या मालकीची असतील. तिसरे म्हणजे, या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात महिलांना १०० टक्के घरमालकी प्रदान केली जाणार आहे. केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे आज १० कोटींपेक्षा जास्त स्वयंपाकघरांमध्ये उज्ज्वला गॅस जोडणी पोहोचली असून, १५ कोटींपेक्षा जास्त घरांना नळाद्वारे पाण्याची जोडणी मिळाली आहे. आजवर सुमारे १२ कोटी शौचालये बांधण्यात आले आहेत. मोदी सरकारने २०१९ मध्ये तिहेरी तलाक पद्धत बेकायदेशीर ठरवली. आज मुस्लिम महिला एकट्याने हजला जाऊ शकतात, त्यासाठी मोदी सरकारनेच पुढाकार घेतला आहे. महिला सशक्तीकरणासाठी उचललेली मोदी सरकारची पावले म्हणून स्तुत्य, अनुकरणीय आणि कौतुकास्पद ठरत आहेत. एक महिला सुज्ञ झाली की परिवारातील १०० जणांना सुज्ञ करते, असे म्हणतात. त्यामुळे यापुढेही मोदी सरकारने महिलांच्या सशक्तीकरणाचा मंत्रजप करीत बलशाली राष्ट्राच्या उभारणीत सिंहाचा वाटा उचलावा.

## इतस्ततः

डॉ. विवेक राजे

# छद्मी धर्मनिरपेक्षता

भारत स्वतंत्र होतानाच या देशाची धार्मिक आधारावर फाळणी झाली. या देशाचे तीन तुकडे करण्यात आले. पाकिस्तान नावाचा एक देश या देशाच्या पूर्व आणि पश्चिमेला उदयाला आला. कालांतराने पूर्वेकडील भूप्रदेश हा बांगलादेश झाला. धार्मिक आधारावर फाळणी होऊनही तेव्हाच्या देशाच्या नेतृत्वाला मात्र धर्मनिरपेक्ष शासन पद्धती या संकल्पनेची भुरळ पडली होती. वास्तविक या हिंदू देशावर ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मांनी धर्म प्रसारासाठी धर्माच्याच आधारावर केलेले अत्याचार तेव्हाही या देशाला चांगल्या प्रकारे माहिती होते. पण या देशात इंग्रजी सत्तेने पेरलेल्या नेत्यांकडेच देशाचे नेतृत्व जावे, अशी तजवीज ब्रिटिशांनी केली. नेतेपद हे देश पुनरुत्थानाचे साधन असते. राष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक, सामाजिक संकल्पना सुधारून पुनर्स्थापित करणे हे डोळस नेतेपण असते, याची जाणीवच नेतेपदाची माळ गळ्यात मिरवणाऱ्यांना नव्हती. पुढे आणिबाणीच्या काळात संपूर्ण विरोधी पक्ष जेलमध्ये असतानाच संसदेत घटना दुरुस्ती करीत धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) हा शब्द घटनेत घुसवण्यात आला. आधीच सर्व हिंदू धर्म संकल्पना नाकारणारे दृष्टिहीन नेते विविध सत्ताकेंद्रांवर बसलेले असताना घटनेच्या उद्देशिकेत 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द आल्याने स्थिती अधिकच बिघडली. मग विविध विद्यापीठांमध्ये हिंदू तत्त्वज्ञान, हिंदू धर्म यांचा अभ्यास सोडून इतर धर्मांचा अभ्यास व्हावा म्हणून विभाग वा अध्यासने स्थापन केली गेली. म्हणजे ख्रिश्चन स्टडीज, इस्लामिक स्टडीज यांच्या जोडीला काही ठिकाणी बुद्धिस्ट फिलॉसॉफी चेअर, चेअर फॉर बुद्धिस्ट थॉट्स अशा प्रकारची अध्यासने, विभाग स्थापन झाले. दुर्दैवाने या हिंदुबहुल देशात हिंदू विचारधारेला, हिंदू तत्त्वज्ञानाला, हिंदू धर्म परंपरांचा इतिहास, संस्कृत भाषा वा वेदांच्या अभ्यास व प्रचारासाठी ना विभागांची निर्मिती झाली ना अध्यासनांची स्थापना करण्यात आली. विद्यापीठं जाऊ द्यात, हिंदुत्वाच्या विचारसरणीचा गड मानलेल्या प्रदेशांमध्येदेखील वेदांचा अभ्यास आणि प्रसार, सनातन वैदिक विचारांचा अभ्यास व प्रसार, स्वातंत्र्यवीर सावरकर वा डॉ. मुंजे यांच्या विचारांचा अभ्यास व प्रसार करण्यासाठी स्वतंत्र विभाग वा अध्यासन स्थापन केले गेले नाही. एक तर या विषयांवर विभाग वा अध्यासने निर्माण केली तर सरकारी अनुदाने मिळण्याची शक्यता शून्य होती. दुसरे म्हणजे दिशाभूल झालेला समाज या विषयांची उपेक्षाच करीत होता. अगदी बिर्ला इन्स्टिट्यूट पिलानीचे विद्यार्थी असलेल्या दीनदयाल उपाध्याय वा भारतरत्न नानाजी देशमुख विचार व कार्य, अध्यासनाची निर्मिती त्या संस्थेत आजही केली गेलेली नाही. एक-दोन विद्यापीठांत सनातन धर्म अध्ययन व अनुसंधान अध्यासने आहेत, पण ते अपवाद म्हणून. दक्षिणेकडील विद्यापीठांमध्ये ख्रिश्चन धर्म अध्ययन तर उत्तरेकडील विद्यापीठांमध्ये इस्लाम धर्म अध्ययन व अनुसंधान विभागांची स्थापना करण्यात आली. त्यातच धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा सर्वांगीण अभ्यास न होताच ती लोकप्रिय करण्यात साम्यवादी विचारसरणीला यश मिळाले. वास्तविक भारतातील संविधान आपल्या २५ व्या कलमाद्वारे धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हणते की, भारतातील कोणत्याही व्यक्तीला त्याला योग्य वाटणाऱ्या उपासनेचा, धर्मपालनाचा, पारलौकिक कल्याणाचा, आध्यात्मिक उन्नतीचा पूर्ण अधिकार आहे. या अधिकारात धर्माच्या नावावर सरकार हस्तक्षेप करणार नाही तसेच मदत व विरोधही करणार नाही. सामाजिक व राजकीय जीवनात व्यक्ती-व्यक्तीमध्ये धर्माच्या नावाने भेदभाव केला जाणार नाही. पुढे जाऊन याच घटनेचे कलम २३ अल्पसंख्यकांना आपली भाषा, संस्कृतीची जोपासना करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापण्याचा अधिकार प्रदान करते. कलम २९ आणि ३० मात्र बहुसंख्य असलेल्या हिंदूंच्या धर्मप्रसाराचा अधिकार नाकारतानाच अल्पसंख्यक समाजाला धर्मप्रसाराची संपूर्ण मुभा देताना दिसते. वास्तविक धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्थेमध्ये शासनाने धर्म वा संस्कृती या बाबतीत संपूर्ण तटस्थ असायला हवे. ही तटस्थता एकधर्मीय देशांमध्ये राखणे सहज शक्य असते. ही तटस्थता राखण्यासाठी बहुधर्मीय भारतात विशेष प्रयत्न आवश्यक होते. मात्र, पाश्चात्त्य व मध्यपूर्वेतील देशांमध्ये बहुसंख्य असलेल्या लोकांनी अल्पसंख्य लोकांवर अन्याय केल्याची अनेक उदाहरणे असल्याने, तोच प्रघात भारतातही चालेल, या अनाठायी भीतिपोटी धर्मनिरपेक्षतेची संकल्पना आणि तिचा प्रसार मुस्लिम व ख्रिश्चन या अल्पसंख्यक समाजांना अनुकूल राहील, असा करण्यात आला. आजही तामिळनाडू राज्य या प्रावधानांचा दुरुपयोग करून ख्रिश्चन अनुनयाचे धोरण राबविताना दिसते. या अनाकलनीय कलमांचे आणि धोरणाचे उदाहरण म्हणजे मद्रास विद्यापीठाच्या 'डिपार्टमेंट ऑफ ॲनसन्ट हिस्ट्री ॲण्ड आर्चियालॉजी' या विभागाने 'हाऊ टू स्प्रेड ख्रिश्चानिटी इन इंडिया आणि व्हाय नीड धीस मार्गम' या विषयांवर तीन तासांचे एक व्याख्यान आयोजित करणे होय. तेथील हिंदू संघटनांनी यावर आक्षेप नोंदवत आंदोलनाचा पवित्रा घेतल्याने हे व्याख्यान नंतर रद्द करण्यात आले.



हजारो वर्षे सर्व प्रकारचे अत्याचार करूनही या मातीत हिंदू धर्म वगळता इतर कोणत्याही धर्माला आपले पाय घट्ट रोवता आलेले नाहीत. दक्षिण भारतातील लाखो हिंदूंची अक्षरशः फसवणूक करूनही ख्रिश्चन धर्म अजूनही या देशात हवा तो जम बसवू शकलेला नाही.

आज युरोपातील अनेक देश स्वतःला ख्रिश्चन देश म्हणून घेतात, तर मध्य पूर्वेतील सर्व देश स्वतःला इस्लामिक देश म्हणवून घेत पौर्वात्य देशांवर शक्य त्या मार्गाने धार्मिक आक्रमण करताना दिसतात. अनेक शतकांपासून चालू असलेल्या या धर्म प्रसाराच्या किळसवाण्या प्रयत्नांना जोड मिळावी म्हणून या देशाच्या संविधानात धर्मनिरपेक्षता ही संकल्पना घुसवावी लागते आणि मग आधीच ख्रिस्ताळलेल्या या देशातील धर्मनिरपेक्ष शिक्षण पद्धतीला विविध अध्यासने व विभागांच्या द्वारे धर्मप्रसारासाठी जुंपावे लागते. तरीही हवे ते यश या देशात इस्लाम आणि ख्रिस्ती मिशनरींना मिळालेले नाही. याला कारण हिंदू धर्मात असलेली लवचीकता व स्वातंत्र्य, अत्यंत जीवनाभिमुख असलेले हिंदू तत्त्वज्ञान तसेच या धर्माने निर्माण केलेली येथील निसर्गाशी तादात्म्य पावणारी जीवनपद्धती होय. तसेच मागील किमान ५०-६० वर्षे विविध प्रदेशांत घट्ट पाय रोवून हिंदू धर्म संरक्षण करणाऱ्या हिंदू संघटना व जीवाची पर्वा न करता तेथे निरलस वृत्तीने कार्य करणारे कार्यकर्ते होत.

प्रशासन आणि अनेक लोकप्रतिनिधी मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मांचे बाजू घेताना दिसतात. याला कारण घटनेत आणिबाणीच्या काळात इंदिरा गांधी यांनी घुसडलेली धर्मनिरपेक्षता ही संकल्पना होय. या संकल्पनेचा पुन्हा विचार होऊन सध्या ती संकल्पना ज्या अर्थाने मांडली जाते, त्यात सुधारणा गरजेची आहे. याकरिता आपसातील सत्तास्पर्धा, वैचारिक, सामाजिक, आर्थिक, भाषीय असे सर्व मतभेद बाजूला ठेवून हिंदू समाजाने एकवटून प्रयत्न करणे आवश्यक आहे. वक्फ कायद्यात बदलाचे प्रस्तावित बिल आणि समान नागरी कायदा तातडीने लागू करण्यासाठी हिंदू समाजाने आज दबाव आणला पाहिजे तसेच विविध प्रकारे सामान्य नागरिकांचा बुद्धिभेद करण्याचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी प्रबुद्ध नागरिकांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजेत. हिंदू धर्म, हिंदू संस्कृती, हिंदू जीवनदृष्टी आणि तत्त्वज्ञान यांची जोपासना करायची असेल तर या छद्म आक्रमणाचा, छद्मी धर्मनिरपेक्षतेचा समाजाच्या सर्व स्तरांवर विरोध व्हायला हवा तरच हा देश ही संस्कृती भविष्यातही दृश्यमान राहील आणि 'समाज कुछ बात हैं की हस्ती, मिटती नहीं हमारी' असे अभिमानाने म्हणू शकेल.

९८८१२४२२२४

## वेध

नंदकिशोर काथवटे

# गडचिरोली पोलिसांचा महाराष्ट्रात डंका

जिथे 'पेन' असते तिथे 'गेन' असते असे म्हणतात. गडचिरोली जिल्ह्यात पूर्वी पोलिस विभागात नोकरी करणाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. जिवावर उदार होऊन अतिशय जिकरीने गडचिरोलीच्या पोलिसांनी नक्षल्यांविरुद्ध दंड थोपटले आणि आज याच गडचिरोली पोलिसांचा अख्ख्या महाराष्ट्रात डंका गाजू लागला आहे. नक्षल चळवळ खिळखिळी करून दुर्गम भागातील नक्षल्यांचे बस्तान मोडून काढण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. पोलिसांच्या आक्रमक मोहिमेमुळे दंडकारण्य झोनमधील नक्षली बॅकफूटवर गेले आहेत. या पृष्ठभूमीवर गडचिरोली पोलिस दलाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात गाजू लागले आहे. त्याला कारणही तसेच आहे. गडचिरोली पोलिसांनी केवळ नक्षल्यांविरोधात लढा उभारला नाही तर नक्षल्यांच्या दहशतीत असलेल्या लोकांमध्ये विश्वास निर्माण केला. सोशल पोलिसिंगच्या माध्यमातून आदिवासी आणि पोलिसांमध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले. त्यामुळेच नक्षल्यांचे आत्मसमर्पणसुद्धा वाढले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री वर्षाच्या पहिल्याच दिवशी गडचिरोलीत दाखल झाले. त्यांच्या उपस्थितीत तारक्का या जहाल महिला नक्षलीने पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. जवळपास ३२ वर्षे नक्षल चळवळीत घालविलेल्या तारक्काच्या आत्मसमर्पणामुळे नक्षल चळवळीचे कंबरडे मोडले. एका बाजूने नक्षल्यांविरोधात उघड मोहीम राबवीत पोलिसांनी नक्षल्यांना गडचिरोलीच्या जंगलातून हद्दपार केले. तर, दुसरीकडून आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी पोलिसांनी विविध उपक्रम राबविले. याच उपक्रमाचा एक भाग 'प्रोजेक्ट उडाण' असून, या उपक्रमाची दखल घेऊन नुकताच गडचिरोली पोलिसांना भारतीय वाणिज्य व उद्योग महासंघाच्या वतीने देण्यात येणारा 'फिक्की स्मार्ट' पोलिसिंग पुरस्कार प्राप्त झाला आहे. नवी दिल्ली येथील फिक्की फेडरेशन हाऊस येथे आयोजित करण्यात आलेल्या एका सोहळ्यात पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांना सन्मानित करण्यात आले आहे. यापूर्वीसुद्धा गडचिरोली पोलिसांना राज्य सरकारचे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सोशल पोलिसिंगचा उत्कृष्ट पुरस्कार याशिवाय तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी गडचिरोली पोलिसांची मान संपूर्ण राज्यात उंचावली आहे. 'कम्युनिटी पोलिस' या श्रेणीतून गडचिरोली पोलिस दलाची निवड पुरस्कारासाठी करण्यात आली असून 'प्रोजेक्ट उडाण' हा उपक्रम या पुरस्कारासाठी महत्त्वाचा ठरला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम-अतिदुर्गम भागांतील आदिवासी नागरिकांच्या सर्वंकष विकासासाठी गडचिरोली पोलिस दलाच्या वतीने ३ मार्च २०२३ रोजी 'प्रोजेक्ट उडाण' हा उपक्रम सुरू करण्यात आला. जिल्ह्यातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, शिक्षण, रोजगार, कृषी या सर्व आयामांचा विचार करून प्रोजेक्ट उडाणची आखणी करण्यात आली. शिक्षणाकरिता एक गाव एक वाचनालय, समर वॉटर कॅम्प, स्टुडंट पोलिस कॅडेट प्रोग्राम, ऑपरेशन रोशनी व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केंद्र अशा बहुआयामी कार्यक्रमांची सुरुवात या प्रोजेक्ट अंतर्गत गडचिरोली पोलिसांनी केली. याच उपक्रमाची दखल राज्यस्तरावर घेतली जात आहे. एकूण ११२ आश्रमशाळांमध्ये इयता ५ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील माहिती अवगत करून दिली. समर वॉटर कॅम्पमध्ये जवळपास जिल्ह्यातील १०८ विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले. विविध पर्यटन स्थळी विद्यार्थ्यांच्या सहली आयोजित केल्या. सोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयोगी पडतील यासाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजन केले. इयत्ता ८ वी व ९ वी मध्ये शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसांचे निवासी स्टुडंट पोलिस कॅडेट शिबिर अख्ख्या महाराष्ट्रात गाजले. कारण महाराष्ट्रात प्रथमच गडचिरोली पोलिसांकडून अशा शिबिराचा प्रयोग करण्यात आला. जिल्ह्यातील बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार मिळावा यासाठी रोजगार मेळावे, ब्युटी पार्लर, शिवणकाम, मॅकेनिक आदी व्यवसायांचे प्रशिक्षण पोलिस दलाने आखले. या संपूर्ण उपक्रमांमुळे गडचिरोलीचे पोलिस दल राज्यभरात प्रसिद्धीच्या झोतात आले आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनात गडचिरोलीची पोलिस भरती संपूर्ण राज्यात पारदर्शक म्हणून गाजली. या भरतीदरम्यान पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी कुठल्याही वशिल्यांना थारा न देता एकाही युवकावर अन्याय होऊ दिला नाही. या भरतीतही तांत्रिक उपक्रमांचा वापर करून कुठल्याही त्रुटी राहू नये यासाठी ते जातीने लक्ष ठेवून होते. त्यामुळेच गडचिरोली पोलिसाचा डंका अख्ख्या राज्यात गाजू लागला आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# संविधान बचावच्या मुद्यावरून काँग्रेस अडचणीत

लोकसभा निवडणुकीच्या आधी मोदी सरकार संविधान बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत काँग्रेसने देशभर रान उठवले होते. या मुद्यावरून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काश्मीर ते कन्याकुमारी अशी भारत जोडो यात्राही काढली होती. मोदी सरकार संविधान बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा बिनबुडाचा, खोडसाळ आणि धादांत खोटा आरोप राहुल गांधी सातत्याने करत होते. आता या मुद्यावरून काँग्रेसच अडचणीत आली आहे. संविधान बदलाच्या मुद्यावरून भाजपासाठी खोदलेल्या खड्ड्यात काँग्रेसच पडली आहे. काँग्रेसच्या एका नेत्याने आपल्या हाताने काँग्रेसला या खड्ड्यात ढकलले आहे. या खड्ड्यातून बाहेर पडणे काँग्रेससाठी आता सोपे नाही.

काँग्रेस संविधान बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप भाजपाने केला नाही, तर काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने तसे संकेत दिले आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी सरकारी ठेक्यात मुस्लिमांना चार टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली. धर्माच्या आधारावर कोणालाही आरक्षण देता येत नाही, याकडे पत्रकारांनी लक्ष वेधले असता, यासाठी जे जे आवश्यक आहे, ते ते बदल आम्ही करू, असे शिवकुमार यांनी म्हटले. मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी आम्ही संविधान बदलू, असे शिवकुमार यांनी स्पष्टपणे म्हटले नसले तरी त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ तोच आहे. मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याच्या मुद्यावर कर्नाटकातील काँग्रेसचे सरकार ठाम आहे आणि संविधानात बदल केल्याशिवाय मुस्लिमांना आरक्षण देता येणार नाही, हेही नक्की आहे. त्यामुळे राज्यातील मुस्लिमांना आरक्षण द्यायचे असेल तर काँग्रेसला संविधानात बदल करावाच लागेल, यात शंका नाही. विशेष म्हणजे गरजू लोकांना आरक्षण देण्यासाठी आतापर्यंत संविधानात डझनभरवेळा दुरुस्त्या करण्यात आल्या आहे. त्यामुळे शिवकुमार यांनी काँग्रेसचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे असल्याचे आपल्या विधानावरून दाखवून दिले आहे.

आतापर्यंत मोदी सरकार संविधान बदलण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप करत काँग्रेसने आकाशपाताळ एक करण्याचा प्रयत्न केला. या आरोपामुळे लोकसभा निवडणुकीत भाजपा काही प्रमाणात अडचणीत आली, हेही नाकारता येणार नाही. मात्र आता संविधान बदलण्याच्या मुद्यावरून भाजपाला अडचणीत आणणारी काँग्रेसच या मुद्यावरून अडचणीत आली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात या मुद्यावरून भाजपाने काँग्रेसला घेरले. संविधान बदलण्याचा काँग्रेसचा हा छुपा कार्यक्रम असल्याचा आरोपही भाजपाने केला. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी या मुद्यावरून काँग्रेसचा बचाव करण्याचा दुबळा प्रयत्न केला.

विशेष म्हणजे या मुद्यावर खडगे वगळता अन्य कोणी बोलल्याचे दिसले नाही. कोणीही संविधान बदलू शकत नाही, अगदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरही संविधान बदलू शकत नाही, असे खडगे म्हणाले. पण त्यावर लोकांचा विश्वास बसला नाही. कारण तोपर्यंत या मुद्यावरून काँग्रेसचे व्हायचे तेवढे नुकसान होऊन गेले होते. विशेष म्हणजे या मुद्यावर काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची प्रतिक्रिया समोर आली नाही.

काँग्रेसची सुरुवातीपासूनची भूमिका ही मुस्लिम तुष्टीकरणाचीच राहिली आहे. मुस्लिम तुष्टीकरणासाठी काँग्रेस कोणत्याही थराला जाऊ शकते, हे देशातील लोकांनी अनेक उदाहरणांवरून पाहिले आहे. त्यामुळे यावेळी कर्नाटकातील मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी काँग्रेस संविधानात बदल करणारच नाही, असे नाही. या मुद्यावर काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाची भूमिका शिवकुमार यांच्यापेक्षा वेगळी असती तर त्यांनी शिवकुमार यांच्यावर कारवाई केली असती, पण काँग्रेसच्या नेतृत्वाने आतापर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही, त्यामुळे त्यांच्या भूमिकेशी काँग्रेसचे नेतृत्व सहमत असल्याचा अर्थ काढता येऊ शकतो. माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला, असा खुलासाही शिवकुमार यांनी केला नाही, उलट मुस्लिमांना आरक्षण देण्याच्या आपल्या भूमिकेचा ते वारंवार पुनरुच्चार करत राहिले. याचाच अर्थ काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाला जे हवे तेच शिवकुमार बोलत आहे वा काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाची भूमिकाच ते मांडत आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

आपल्या देशात धर्माच्या आधारावर कोणालाच आरक्षण देता येत नाही. आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणाच्या मुद्यावर आरक्षण देता येते. देशात आताही मुस्लिम धर्मातील जवळपास ३६ जातींना सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर संविधानातील १६(४) च्या तरतुदीनुसार ओबीसी वर्गातून आरक्षण दिले जात आहे. एखादा समाज मागासलेला आहे, असे जर वाटत असेल तर सरकारी नोकरीत सरकार त्या वर्गाला आरक्षण देऊ शकते.

सरकारी ठेक्यात मुस्लिमांना आरक्षण देण्याचा प्रकार हा कर्नाटकात पहिल्यादांच घडला नाही. २०१३ ते १८ या कार्यकाळात सत्तेवर असताना सिद्धरामय्या सरकारने सरकारी निविदात अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांना ५० लाखापर्यंतची सूट देण्याचा निर्णय घेतला होता. २०२३ मध्ये सत्तेवर आल्यानंतर सिद्धरामय्या सरकारने ही मर्यादा २ कोटींपर्यंत वाढवली होती. त्यावेळी अनुसूचित जाती आणि जमातीतील आपल्या बांधवांच्या हितासाठी हा निर्णय घेतल्यामुळे त्यावेळी या निर्णयावर कोणी हरकत घेतली नव्हती. मात्र त्याच्याच आड लपत कर्नाटकातील काँग्रेसच्या सरकारने यावेळी सरकारी ठेक्यात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे त्याला विरोध होणे स्वाभाविक होते.

मुस्लिम धर्मातील काही जाती आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक बाबतीत मागासलेल्या असतील तर त्यांना आरक्षण द्यायला कोणाची हरकत राहणार नाही, पण फक्त तुष्टीकरण करणे या एकाच मुद्यावर त्यांना आरक्षण दिले जात असेल तर तो प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. आपल्या राजकीय फायद्यासाठी एका धर्माचा वापर करणे आणि दुसऱ्या धर्माच्या लोकांवर अन्याय करणे मान्य करता येणार नाही. काँग्रेसचा इतिहास हा असाच आहे. काँग्रेसने आपल्या राजकीय फायद्यासाठी मुस्लिमांचे तुष्टीकरण केले तर हिंदू धर्मावर सातत्याने अन्याय केला. ताजा प्रकारही काँग्रेसच्या त्याच मानसिकतेतचा परिचायक आहे. या मुद्यावर काँग्रेसला आताच रोखले नाही तर काँग्रेस अन्य राज्यांतही असा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही.

९८८१७१७८१७

### गुढीपाडव्याला औषधाचे सेवन करावे

चैत्र महिना उन्हाळ्यात येतो आणि गुढीपाडवा चैत्र महिन्यातच असतो. उन्हाळ्याचा त्रास होऊ नये यासाठी एक औषध सांगितले आहे. पाडव्याच्या दिवशी या औषधाचे सेवन केल्यास त्याचा विशेष लाभ होतो. पाडव्याच्या दिवशी औषधाचे सेवन करण्यास जमले नाही तर ज्यांना उन्हाळ्याचा त्रास होतो त्यांनी नंतर सुद्धा हे औषध घेतल्यास चालू शकते. या औषधाचे महत्त्व सांगणारा एक संस्कृतमध्ये श्लोक आहे. याचा मराठीमध्ये अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

कडुलिंबाची कोवळी पाने, फुले, मिरे, हिंग, मीठ, कैरी, साखर आणि चिंच हे सर्व साहित्य एकत्र करून ते चांगले वाटून त्याचे मिश्रण तयार करावे आणि औषध म्हणून सेवन करावे. हे औषध तयार करताना त्यामध्ये कडुलिंबाची जुनी पाने घालू नये कारण त्यामुळे त्यातील औषधी गुणधर्म कमी होतो. यासाठी कोवळी पाने घेऊनच औषध तयार करून त्याचे सेवन करावे.

**वैद्य संध्या देशपांडे**/ नागपूर

### श्रमदानातून गणेश कुंडांची निर्मिती

येथून सहा महिन्यांनी गणपती बाप्पा येणार. त्यासाठी गणेशभक्तांची लगबग सुरू होणार. त्यापूर्वी पावसाळा सुरू झालेला असतो. उत्सवांबाबतच्या चर्चेत एक छान विचार मांडण्यात आला. गणपती विसर्जन हा एक पूर्ण दिवसभर, मध्यरात्रीपर्यंत चालणारा आणि थकवणारा उत्सव असतो. यात कार्यकर्तेही थकून जातात. गावोगावी मोठे तलाव किंवा नद्या नसतात. अशावेळी गावकऱ्यांच्या श्रमदानामधून गणेश कुंडांची निर्मिती होऊ शकते. गावाबाहेर पावसाचे पाणी जिथे साठवू शकतो अशा ठिकाणी गणेश कुंडांची निर्मिती व्हावी आणि विसर्जनाच्या वेळी ज्या लांबच लांब रांगा लागतात त्यांच्यापासून सुटका होईल.



विसर्जनानंतर हे गणेश कुंड बुजवून टाकता येतील किंवा गावासाठी त्याचा छान तलाव तयार होईल. त्या सभोवताल झाडे आणि फुलझाडे लावून एक रम्य जागा गावासाठी उपलब्ध होईल. श्रमदानातून हे सारे सहज शक्य आहे. आतापासून कामाला लागलो तर गणपती विसर्जनाच्या वेळी गावासाठी गणेश कुंड मिळेल आणि ती त्या गावाची ओळख ठरेल.

**डॉ. शरद सालफळे**/९४२२१३६०६७

## वाचक पत्रे

### आज शुभ वारुणी योग

आज वारुणी हा अत्यंत शुभ योग चालून येत आहे. जेव्हा फाल्गुन मास, वद्य पक्ष, त्रयोदशी तिथीला शततारका नक्षत्र असते तेव्हाच हा वारुणी योग होतो. ही त्रयोदशी तिथी आज रात्री एक वाजून ४२ मिनिटांनी सुरू होत असून ती उद्या रात्री ११ वाजून ३ मिनिटापर्यंत असल्याने व त्याबरोबरच शततारका नक्षत्रसुद्धा आज रात्री २ वाजून २९ मिनिटांनी सुरू होऊन उद्या रात्री बारा वाजून ३३ मिनिटांपर्यंत असल्याने हा शुभयोग घडून येत आहे. या योगावर गंगास्नान, दान, धर्म, जप, तप साधना इत्यादी धर्मकार्य किंवा सत्कार्य केल्यास त्याचे फळ १०० सूर्यग्रहणात मिळणाऱ्या एकत्रित फलासारखे लाभते हे शास्त्रवचन आहे. आपल्या अनेक जन्मातील पापांचा नाश करण्याचे सामर्थ्य या एकाच योगामध्ये असल्याने याचा लाभ सर्वांनीच घ्यावा असे वाटते. हा योग जेव्हा शनिवारी घडून येतो तेव्हा तो महावारुणी योग असतो. कोटी कुळाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य या एकाच योगामध्ये आहे.

**मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

### शासकीय योजना आर्थिक दुर्बलांपर्यंत पोहोचवा

केंद्र व राज्य सरकारकडून आर्थिक दुर्बल नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात. शासनाच्या योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी असतात, परंतु या योजनांचा लाभ पात्र लाभार्थी घेऊ शकत नाहीत, ही वस्तुस्थिती धक्कादायक आहे. सरकारच्या योजना गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न व प्रसिद्धीसाठी हजारो कोटी रुपये खर्च केले जातात. पण ज्या घटकांसाठी योजना असतात, त्या घटकांना योजनांचा लाभ मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. शासकीय विकास योजनेच्या माध्यमातून विविध घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट सरकार समोर असते. अनेक योजनांना मात्र सरकारी अधिकारी आणि कर्मचारी यांचे अपयश आडवे येते. योजनेची माहिती लाभार्थींपर्यंत न पोहोचल्याने लाभापासून ते वंचित राहतात. काही योजना फक्त कागदावर राहतात, काही योजनांची अंमलबजावणी होत असते, मात्र योजना प्रत्यक्ष लाभार्थींपर्यंत पोहोचत नाहीत. शासनाने योजना आखून त्या प्रत्यक्षात राबविण्याची जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. योग्य माहिती नागरिकांना देणे गरजेचे आहे. सर्वसामान्य नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा यासाठी शासन, प्रशासनाकडून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### उपचार सुरू असलेल्या वृद्ध महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. २६ मार्च-**
धाराशिव येथे राहत्या घरी झोपलेल्या महिलेच्या अंगावर ज्वारीचे पोते पडले होते. यावेळी कोतुबबी गुलाब सय्यद (वय-६६,रा. देवकुरळी,ता.तुळजापूर,जि.धाराशिव) यांना उपचारासाठी सिव्हिल मध्ये २३ मार्चला दाखल केले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना मंगळवारी दुपारी एक वाजता त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### सर्पदंश झाल्याने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. २६ मार्च-**
मोहोळ तालुक्यातील शिरपूर येथे राहत्या घरी काम करताना विषारी सर्पदंश झाल्याने महिलेचा मृत्यू झाला. कोमल गोपाळ चाबुकस्वार (वय-३०,रा.शिरपूर,ता.मोहोळ) असे मृत महिलेचे नाव आहे.कोमल चाबुकस्वार नेहमीप्रमाणे घराच्या अंगणात काम करताना अचानक पाठीमागून विषारी सापाने दंश केल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबतची माहिती त्यांनी कुटुंबीयांना दिल्यानंतर त्यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ही घटना मंगळवार दि. २५ दुपारी एक वाजता घडली.

### तरुणीने प्राशन केले फिनेल

**सोलापूर, दि. २५ मार्च-**
शहरातील सेटलमेंट येथे अज्ञात कारणावरून फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केल्याने आसावरी किसन पवार (वय-१९,रा.सेटलमेंट फ्री कॉलनी) हिला त्रास होताना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### पूर्व वैमनस्यातून मारहाण

**सोलापूर, दि. २६ मार्च-**
बुधवार पेठ येथे दुपारी झालेल्या भांडणाच्या रागातून अथर्व तळमोहिते, गगन तळमोहिते व इतर चौघांनी चाकूने मारहाण केल्याने नागसेन सुनील आबुटे (वय-३५,रा.मिलिंद नगर,बुधवार पेठ) हा जखमी झाला.उपचारासाठी त्याला सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### पैशाच्या व्यवहारातून तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. २६ मार्च-**
अकलूज येथे पैशाचे व्यवहारातून अनिकेत कोळेकर, जया कोळेकर यांनी मारहाण केल्याने सोमलिंग रेवनसिद्ध माळी (वय-४८,रा.अकलूज) हे जखमी झाले. उपचारासाठी त्यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

## अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत
# शेतकरी प्रशिक्षणात ४५ शेतकरी सहभागी



**सोलापूर, दि. २६ मार्च-**
विभागीय कृषि संशोधन केंद्र सोलापूर अंतर्गत अखिल भारतीय कोरडवाहू संशोधन प्रकल्प आणि राष्ट्रीय संवेदनक्षम हवामान बदल आधारीत प्रकल्प यांच्यावतीने एक दिवसीय अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कृषक भवन येथे संपन्न झाले. या शेतकरी प्रशिक्षणाचे उदघाटन उपविभागीय कृषि अधिकारी रामचंद्र माळी, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे, डॉ. नितिनकुमार रणशूर यांच्या हस्ते दिप प्रज्वलन व महात्मा फुलेच्या प्रतिमा पूजनाने झाले. या प्रशिक्षणासाठी सोलापूर जिल्यातील ४५ अनुसूचित जातींच्या शेतक-यांनी सहभाग नोंदवला. सहभागी सर्व शेतकरी प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र तसेच बॅटरी ऑपरेटेड स्प्रेअर पंप, यूरिया, सिंगल सुपर फोस्फेट व म्युरेट ऑफ पोटॅश ही खते मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आली. या शेतकरी प्रशिक्षणात श्री म ळी यांनी आपल्या मनोगतात अनुसुचित जातीच्या शेतक-यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना बाबत मार्गदर्शन केले व या योजनांचा शेतक-यानी लाभघ्यावा असे आवाहन केले.

कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ अनिता शेळके यांनी ज्वारी प्रक्रियेतुन स्त्रियांनी रोजगार निर्मिती करावी आपले आर्थिक उन्नती कशी साधत येईल याबाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. तांबडे यांनी कृषि पुरक व्यवसायातुन स्वयंरोजगार निर्मिती या विषयी मार्गदर्शन केले शेतक-यांनी नोकरीवर अवलंबून न राहता छोट्या छोट्या कृषिपुरक व्यवसायातुन रोजगार निर्मिती करावी, समाजात नाव व स्तर कसा उंचवता येईल याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर शेतकरी शास्त्रज्ञ चर्चासत्र पार पडले. शेतकऱ्यांच्या अनेक शंकांचे समाधान शास्त्रज्ञानी केले.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सुभाष धाडगे, वरिष्ठ कृषिविद्यावेत्ता, डॉ. आदिनाथ ताकटे, वरिष्ठ मृदशास्त्रज्ञ, इंजि रामचंद्र सांगलीकर, वरिष्ठ मृद व जलसंधारण अभियंता यांनी केले. डॉ. सुभाष धाडगे, वरिष्ठ कृषिविद्यावेत्ता यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, गति-शक्ती युनिट, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर्स आमंत्रित करत आहेत. (दोन पॅकेट सिस्टम) निविदा क्रमांक SUR/GSU/TD/T/2024/02R कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात DD-SUR विभागातील इलेक्ट्रिक ट्रॅक्शन सिस्टमचे 1x25 kV वरून 2x25 ज्ञत ट्रॅक्शन सिस्टममध्ये अपग्रेडेशन करणे जेणेकरून 3000 मेट्रिक टन लोडिंग लक्ष्य पूर्ण होईल - OHE सुधारणा काम. (पुनर्निमंत्रण) अंदाजे खर्च: रु. 1,68,37,20,566.65 बोली सुरक्षा: रु. 85,68,600/- पूर्ण होण्याचा कालावधी: 24 महिने ऑफरची वैधता: 90 दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 21/04/2025 15.00 तास.
सीपीएम, सोलापूर 43
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

### तरुणीने विषारी द्रव प्राशन केले

**सोलापूर, दि. २६ मार्च-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील रामपूर येथे स्वतःच्या शेतात घरगुती वादातून गोचीड मारण्याचे विषारी द्रव प्राशन केल्याने अंबिका शंकर शिवशेट्टी (वय-१७,रा.रामपूर) हिला त्रास होताना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### पैशाच्या वादातून महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. २६ मार्च-**
पटवर्धन कुरोली शिवारात पैशाच्या वादातून विष्णू बाबुराव मोरे याने मारहाण केल्याने सुनिता औदुंबर डावरे (वय-४५,रा. पटवर्धन कुरोली,ता.पंढरपूर) या जखमी झाल्या. उपचारासाठी त्यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

**पंढरपूर नगर परिषद पंढरपूर**
**वार्षिक ई निविदा सूचना**
जा.नं पंनपं/पा.पु /१६०८/२०२५ २६ मार्च २०२५
नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभाग/ केंद्रा मार्फत न.पा. फंड अंतर्गत ११ कामाकरिता योग्य त्या वर्गातील म.जी.प्रा./सा.बां विभागाकडील नोंदणीकृत मक्तेदार यांचे कडून महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवर ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना, तांत्रिक तपशील, अटी व शर्ती इत्यादी शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळवर उपलब्ध आहे. यापुढील सर्व सूचना, शुद्धीपत्रके इत्यादी वरील संकेतस्थळ यावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- ई निविदा प्रणालीवर प्रपत्र उपलब्ध होण्याची तारीख :- २७/०३/२०२५
- निविदा भरण्याची अंतिम तारीख :- ०३/०४/२०२५
- निविदा उघडण्याची तारीख (शक्य असल्यास) :- ०४/०४/२०२५
सही/-
(प्रशांत जाधव)
मुख्याधिकारी
नगर परिषद, पंढरपूर

**जाहीर समन्स** हक्कनोंद चु. दु./एसआर/२३/२०२५
**पंढरपूर येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.**
श्री. परमेश्वर महादेव राजगुरू - अर्जदार
विरूध्द
१) श्रीमती शारदाबाई मच्छिंद्र बनसोडे - सामनेवाला
(मयत वारस), वगैरे
ज्याअर्थी अर्जदार यानी वर नमुद कोर्टात सामनेवाला यांचे विरूध्द ७/१२ दुरूस्ती करणेकरीता कलम १५५ अन्वये या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.
त्याआर्थी सामनेवाला १अ) अदिका जगन्नाथ बर्वे वय ६५, धंदा-घरकाम रा. चळे ता. पंढरपूर जि. सोलापूर, १ब) शांताबाई सिद्राम वाघमोडे वय ६०, धंदा-घरकाम रा. नजिक पिंपरी ता. मोहोळ जि. सोलापूर, १क) सुमन विठ्ठल वाघमोडे वय ५५, धंदा-घरकाम रा. नजिक पिंपरी ता. मोहोळ जि. सोलापूर, १ड) श्री. दत्तात्रय मच्छिंद्र बनसोडे (मयत वारस), १ड-१) श्रीमती नंदा दत्तात्रय बनसोडे वय ४५, धंदा-घरकाम रा. वडजी ता. द. सोलापूर जि. सोलापूर, १ड-२) गिरीष दत्तात्रय बनसोडे वय २५, धंदा-शेती रा. वडजी ता. द. सोलापूर जि. सोलापूर, १ड-३) प्रशांत दत्तात्रय बनसोडे वय २३, धंदा-शेती रा. वडजी ता. द. सोलापूर जि. सोलापूर, ६) श्री. सचिन परमेश्वर वाघमारे वय ३२ वर्षे, धंदा-शेती रा. चळे ता. पंढरपूर जि. सोलापूर यांना सदर ७/१२ दुरूस्ती करणेकरीता कलम १५५ अन्वयेचे अर्जाचे कामी नमुद पत्यावरती अर्जाचे समन्स में, कोर्टा तर्फे पाठविण्यात आले होते. समन्स पोहोच होवूनही जाणीवपुर्वक गैरहजर राहिलेत म्हणुन परत एकदा हजर राहणेकरीता अंतिम संधी द्यावी. त्याअर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, या प्रकरणामध्ये सदर सामनेवाले यांनी स्वतः अगर विधिज्ञामार्फत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांमध्ये किंवा नेमली तारीख २५/४/२०२५ या दिवशी हजर होवून आपले म्हणणे/कैफियत मांडावे, तुम्ही सदर मुदतीमध्ये हजर न राहिलेस तुम्हांला काही म्हणणे अथवा कैफियत मांडावयाची नाही असे गृहित धरून तुम्हांला समन्सची बजावणी झाली आहे असे समजून मे. कोर्ट तुमचे विरूध्द एकतर्फी आदेश पारीत करतील मागाहून कसलीही तक्रार चालणार नाही. सदरचे जाहीर समन्स नोटीसद्वारे समन्स माझे सहीनिशी व मे कोर्टाचे शिक्यानिशी दिले असे. येणेप्रमाणे जाहीर समन्स नोटीस असे ता २५/०३/२०२५
सही/-
तहसीलदार पंढरपूर

**जाहीर समन्स/नोटीस** आर.टी.एस अपील ९३/२०२२
**सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात.**
सौदागर तानाजी ठोंगे ---- अपेलंट
विरुध्द
शहाजी उत्रेश्वर ठोंगे ---- रिस्पॉंडट
रिस्पोंडट नं २ अ) मालन उत्रेश्वर ठोंगे, वय ७० वर्षे,
धंदा-घरकाम, रा उपळाई(ठों) ता. बार्शी, जि. सोलापूर
२ब) तानाजी उत्रेश्वर ठोंगे,
वय ५७ वर्षे, धंदा- शेती, रा उपळाई(ठों) ता. बार्शी, जि. सोलापूर
२क) कस्तुर नामदेव बारंगुळे, वय ४० वर्षे,
धंदा-घरकाम, रा. नागोबाची वाडी ता. बार्शी, जि. सोलापूर
२ड) मैना पांडुरंग बारंगुळे, वय ५२ वर्षे,
धंदा-घरकाम, रा खांडवी ता. बार्शी, जि. सोलापूर
२इ) शिवाजी उत्रेश्वर ठोंगे, वय सज्ञान
धंदा-शेती, रा उपळाई(ठों) ता. बार्शी, जि. सोलापूर
ज्या अर्थी यातील अपेलंटने तुमचे विरुध्द सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी साहेब यांचे न्यायालयात जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे अपील दाखल केलेले आहे आपणास वरील नमुद पत्यावर नोटीस काढून त्याची बजावणी होत नाही. तुमच्या वरील नमुद पत्याशिवाय दुसरा पत्ता अपेलंटकडे नाही.
त्याअर्थी आपणास या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, हे जाहीर प्रसिध्दीकरण झालेपासून ३० दिवसात अथवा नेमलेल्या दिनांक ९/४/२५ या तारेखस सदर अपीलात आपण आपले प्रतिनिधी अथवा आपण जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा. व आपला कायमचा पत्ता सदर अपीलात हजर करावा.
वरीलप्रमाणे आपण सदर अपीलात हजर न झाल्यास अपेलंटच्या मागणीप्रमाणे तुमच्या विरोधात हुकुम होईल. कळावे याची नोंद घ्यावी.
हे जाहिर समन्स/नोटीस आमच्या सही व शिक्कयानिशी दिले तारीख १५/०३/२०२५
कोर्टाचा शिक्का
सही/-
उपविभागीय अधिकारी
सोलापूर क्र. १, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण** सिव्हील किरकोळ अर्ज नं.७९/२०२५
**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिशसो ०१ यांचे कोर्टात**
१) ज्ञानेश्वर अर्जुन चौगुले
वयः३४ वर्षे, धंदा शेती, रा. गोटेवाडी, ता. मोहोळ जि. सोलापूर
२) आदित्य ज्ञानेश्वर चौगुले
वयः १३ वर्षे, धंदा-शिक्षण रा.गोटेवाडी, ता. मोहोळ जि. सोलापूर
३) अजित ज्ञानेश्वर चौगुले
वयः ११ वर्षे, धंदा-शिक्षण रा. गोटेवाडी, ता. मोहोळ जि. सोलापूर
अर्जदार नं. २ व ३ करीता अ.पा.क
म्हणुन अर्जदार नं. १ — अर्जदार
विरुध्द
जिल्हाधिकारीसो सोलापूर
(जिल्हाधिकारीसो सोलापूर यांचे वतीने अर्जाची नोटीस मा. जिल्हा सरकारी वकील यांचेवर बजावणेत यावी) — सामनेवाला
ज्याअर्थी, अर्जदार नं १ यांनी अर्जात नमुद अज्ञान अर्जदार नं २ व ३ याचे नांवे असलेली शेतजमिन मिळकत विक्रीस परवानगी मिळण्यासाठीचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला असून सदर मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब डि. ता. मोहोळ, पैकी मौजे मुंढेवाडी, येथील शेतजमीन गट नं. ११४/१/ब क्षेत्र १ हे. ६१ आर, आकार १ रु. ६१ पैसे यापैकी पश्चिमेची उमाकांत शेळके यांचे उत्तरेची क्षेत्र ० हे ४० आर, आकार व रु ३५ पैसे ही शेतजमिन अज्ञानाचे नांवे असून सदरची शेतजमिन पैकी ० हे ३५ आर शेतजमीन विक्री करण्यास परवानगी मिळण्याकामी अर्जदार नं १ (जनक पिता) यांनी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी या नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, वर नमूद शेतजमिनीच्या विक्रीबाबत कोणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याच्या आत किंवा नेमलेली १७/०४/२०२५ रोजी हजर राहून हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते आदेश करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. हि जाहिर नोटीस दिली ता.२४/०३/२०२५
सही/- लिपिक
कोर्टाचा शिक्का
हुकुमावरून
सही/-
अधिक्षक
जिल्हा न्यायाधिश सो, कोर्ट सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण** दि.कि. अर्ज ४०/२०१५ नि.५
**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात**
१) समर्थ बाळासाहेब यादव,
वय- १० वर्षे, (अज्ञान) धंदा- शिक्षण, रा.राजीव गांधी नगर, धाराशिव ता. जि. धाराशिव
२) सौ. शिला बाळासाहेब यादव,
वय-३८ वर्षे, धंदा- शेती व घरकाम रा.राजीव गांधी नगर, धाराशिव ता. जि. धाराशिव स्वतः करिता व
अर्जदार नं. १ चे अ.पा.क. आई म्हणुन — अर्जदार
विरुध्द
महाराष्ट्र शासन (यांचे समन्स/नोटीस सहाय्यक सरकारी अभियोक्ता बार्शी यांना बजावण्यात यावे) — सामनेवाला
ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी डि सोलापूर सब डि वैराग व ता. बार्शी पैकी मौजे हळदुगे येथील शेतजमिन गट नं. १९४ पैकी पश्चिमेकडील मधील बाजुचे क्षेत्र ०१ हे ६१ आर आकार ०१ रु. ९८ पैसे ही अज्ञानाची शेतजमिन विकणेकामी परवानगी मिळणेसाठीचा अर्ज मे. कोर्टात आणलेला असून सदर शेतजमिन विक्री करणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारचा हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी, बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हवक हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि.२५/४/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी.
त्याअर्थी, कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमिन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल, कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २४/३/२०२५
सही/- क. लिपिक
कोर्टाचा शिक्का
सही/-
सहा. अधिक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी

जा.क्र.न.पं./३१३/२०२५
दि.२६/०३/२०२५
**वैराग नगरपंचायत वैराग**
**निविदा प्रसिद्धीकरण सुचना पहिली वेळ**
१. प्रभाग क्र. १३ पवार घर ते काशिनाथ शिंगाडे घर पर्यंत पिण्याच्या पाण्याची (४ इंच) HDPE पाईप लाईन टाकणे.
२. प्रभाग क्र.१० सिद्धार्थ नगर महादेव ताटे घर ते संतोष खांडेकर घर पिण्याच्या पाण्याची (४ इंच) HDPE पाईप लाईन टाकणे.
**वैराग नगरपंचायत वैराग**
**निविदा प्रसिद्धीकरण सुचना दुसरी वेळ**
१. नगरपंचायतीच्या टेंडर फॉर्म मधील व तपशिल प्रमाणे फर्निचर साहित्य पुरवठा करणे
२. नगरपंचायत करिता जैवविविधता नोंदवही तयार करणे
३. नगरपंचायत करिता वैराग शहराचे हवेचे गुणवत्ता तपासणी करणे
४. नगरपंचायत करिता कापडी पिशवीचा पुरवठा करणे.
५. नगरपंचायत करिता हवेचे गुणवत्ता निरीक्षण केंद्र उभा करणे.
६. नगरपंचायत करिता शिल्पाकृती (Sculpture) पुरवठा करणे.
७. नगरपंचायत करिता पाणीपुरवठा जलयंत्रणेचे लेखापरीक्षण करणे.
वरील विषयांकित दरपत्रक/निविदेच्या अटी व सविस्तर निविदा सूचना **तसेच अटी व शर्ती नगरपंचायत कार्यालयाकडील संबंधित विभागाकडे दि.२७/०३/२०२५ ते दि.०२/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.**
शिक्का
सही/-
(चरण कोल्हे)
मुख्याधिकारी
वैराग नगरपंचायत वैराग

**जाहीर नोटीस** सिव्हील किरकोळ अर्ज नं.८०/२०२५
**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिशसो यांचे कोर्टात (डीटी-२)**
१) पृथ्वीराज श्रीधर कुंभार
वयः १६ वर्षे, पंदा शिक्षण, रा. मोरवंची, ता. मोहोळ जि. सोलापूर
२) श्रीधर तुकाराम कुंभार
वयः ४१ वर्षे, धंदा-शेती अर्जदार नं. १ करीता अ.पा.क
म्हणून अर्जदार नं. २ — अर्जदार
विरुध्द
जिल्हाधिकारीसो सोलापूर
(जिल्हाधिकारीसो सोलापूर यांचे वतीने अर्जाची नोटीस मा. जिल्हा सरकारी वकील यांचेवर बजावणेत यावी) — सामनेवाला
ज्याअर्थी, अर्जदार नं २ यांनी अर्जात नमुद अज्ञान अर्जदार नं १ याचे नांवे असलेली घरजागा मिळकत विक्रीस परवानगी मिळण्यासाठीचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला असून सदर मिळकतीचे वर्णन :- डि. सोलापूर सब डि. ता.मोहोळ, पैकी मौजे मोरंवची, येथील ग्रामपंचायत अ.क्र १७८ व मालमत्ता क्र. १६० क्षेत्र ५७२ चौ. फुट ही घरजागा अज्ञानाचे नांवे असून सदरची घरजागा विक्री करण्यास परवानगी मिळण्याकामी अर्जदार नं २ (जनक पिता) यांनी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
त्याअर्थी या नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, वर नमूद घरजागेच्या विक्रीबाबत कोणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याच्या आत किंवा नेमलेली ता.२५/०४/२०२५ रोजी हजर राहून हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते आदेश करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. हि जाहिर नोटीस दिली ता. १७/०३/२०२५
सही/- लिपिक
कोर्टाचा शिक्का
सही/-
अधिक्षक
जिल्हा न्यायाधिश सो, कोर्ट सोलापूर

**जाहीर नोटीस**
तमाम लोकांस विशेषतः मौजे सौंदरे व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे सौंदरे येथील शेतजमीन गट नं. २९०/१ पैकी श्रीमती अन्नपूर्णा साहेबराव बोंदरे यांचे नावे असलेली ०० हे ८० आर आकार ०० रु ७३ पैसे येणेप्रमाणे शेतजमिन आतील सर्व तदंगभुत वस्तुंसह व मालकी वहिवाटीच्या हक्कांसह.
वर नमुद केलेली मिळकत ही आमचे अशिल अलका हनुमंत करडे रा. बावी, ता. बार्शी जि. सोलापुर यांचे एकत्र हिंदु कुटुंबाची व प्रत्यक्ष कब्जेवहिटीची असुन सदर मिळकत आमचे अशिल यांचे आई श्रीमती अन्नपुर्णा साहेबराव बोंदरे यांचे नावे आमचे अशिलाचे वडिल कै. साहेबराव विश्वनाथ बोंदरे यांनी त्यांचे नावे केलेली होती. वर नमुद मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी पोकळ स्वरुपात अन्नपुर्णा बोंदरे यांच्या नावाची नोंद आहे. सदर नोंदीचा गैरआधार घेऊन आमचे अशिलाचे आई अन्नपुर्णा बोंदरे व आमचे अशिलाची बहिण विश्रांता संदिपान धुमाळ या संगणमताने आमचे अशिलाचे अपरोक्ष वर नमुद मिळकत त्रयस्त व्यक्तिस व्यवहाराची बोलणी करुण विक्री करण्याच्या तयारीत आहेत. वर नमुद मिळकतीमध्ये आमचे अशिल यांचा अविभक्त हक्क व हिस्सा आहे. त्यामुळे आमचे अशिलांची आई श्रीमती अन्नपुर्णा साहेबराव बोंदरे या वयोवृध्द आहेत त्यांच्या वृध्दापकाळाचा गैरुफायदा घेऊन आमचे अशिलाची बहिण विश्रांता धुमाळ वर नमुद मिळकत विक्री करुण मोबदला रक्कम हडप करण्याच्या तयारीत आहे. वर नमुद मिळकतीमध्ये आमचे अशिलाची अविभक्त हिस्स्याची कायदेशीर मालकी व सामाईक कब्जवहिवाअ आहे. असे असताना श्रीमती अन्नपुर्णा साहेबराव बोंदरे यांनी सदर मिळकतीबाबत बेकायदेशीर खरेदीखत, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, वारसा, फेडपत्र, टाच, कर्ज-बोजा, करार, नोटरी, अथवा अन्य हस्तांतरणाचा दस्त करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे श्रीमती अन्नपुर्णा साहेबराव बोंदरे यांचेशी कोणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. याऊपर हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास तो मुळीच आमचे अशिलांचे हक्क अधिकारांवर बंधनकारक राहणार नाही. आमचे अशिलांचे हक्काची माहिती व्हावी तसेच कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली असे. ता. २६/०३/२०२५
सही/-
ॲड रणजीत नेताजी गुंड
बी.एस.एल. एलएल.एम.
जिल्हा न्यायालय बार्शी
मो.९८६०००७१२३/९४२३५८७३२६
आमचे अशिल- सौ. अलका हनुमंत करडे
तर्फे ॲडव्होकेट

**जाहीर प्रसिध्दीकरण** दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४७/२०२५ नि.०६
**सोलापूर येथील मे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे समोर**
१) अनुराधा श्याम भोसले
वय ३९ धंदा घरकाम
२) हर्षवर्धन श्याम भोसले
वय १४ वर्षे धंदा शिक्षण
३) विश्वजीत श्याम भोसले
वय १० वर्षे धंदा शिक्षण
४) हिंदवी श्याम भोसले
वय सात वर्षे धंदा शिक्षण
सर्व राहणार ७९/८० पश्चिम मंगळवार पेठ सोलापूर
(अर्जदार नंबर २,३ आणि ४ यांचे करिता
अपक म्हणून अर्जदार नं. १ — अर्जदार
विरुद्ध
महाराष्ट्र शासन (जिल्हाधिकारी) सामने वाला - सामनेवाला
ज्या अर्थी, मिळकतीचे वर्णन :- डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे दोड्डी ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन भूमापन गट क्रमांक ६९/६ यासी क्षेत्र २.४० हेक्टर आर चौ. मी. आकार ५.०० रु.पै. दक्षिण दिशेचे क्षेत्र साठ आर यासीन चतु:सीमा खालील प्रमाणे : पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - शिवाजी मेघू राठोड यांची शेत जमीन, उत्तरेस - गट क्रमांक ६९/६ ची उर्वरित जमीन, दक्षिणेस - कुलकर्णी यांची शेत जमीन
वर नमुद शेत जमीन अर्जदार नंबर एक ते चार यांचे मालकीची असून अर्जदार क्रमांक एक यांनी स्वतःचेतर्फे व अज्ञान पालक म्हणून अर्जदार क्रमांक २,३,४ यांचे तर्फे नमूद शेतजमीन विक्री करण्याकरता मे. जिल्हा न्यायाधीश यांचे कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.
तरी तुम्हास या जाहीर या जाहीर प्रसिद्धीकरणाद्वारे कळविण्यात येते की हे जाहीर प्रसिद्धीकरण झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर पुढील नेमलेली तारीख ३०/०४/२०२५ रोजी स्वतः अगर नेमलेल्या विधिज्ञामार्फत हजर राहावे येणेप्रमाणे तुमच्याकडून घडून न आल्यास या अर्जाचे न्यायालयीन कामकाज तुमच्या विरुद्ध एकतर्फी चालवण्यात येईल याची नोंद घ्यावी व सदर अर्जाचा जो निकाल लागेल तो निकाल तुमचे वर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. हा जाहीरनामा केला तारीख २६/३/२०२५
सही/- लिपिक जिल्हा न्यायालय, सोलापूर
कोर्टाचा शिक्का
हुकूमावरून
सही/-
अधिक्षक
जिल्हा न्यायालय, सोलापूर

**मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उत्सव सोलापूर, यांचे समोर**
सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापूर
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर ४१३००३
जा.क्र./सनिसस/११५/२०२५ दि. २६/०३/२०२५
**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - अर्जदार**
विरूध्द
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. क्र | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ०१/२०२५ | १,३१,५६८/- | १<br>२<br>३ | **१. श्री. गोसकी दिपक जनार्दन** रा. घर नं ८५ स्वामी समर्थ विडी घरकुल सोलापूर<br>**२. श्री. कोनम सुरेश अंजय्या** रा. ६७२/२ क विडी घरकुल सोलापूर<br>**३ श्री. मिठ्ठापेल्ली रूपाली बालराज** रा. १५१ एस विडी घरकुल सोलापूर |
| २ | ०२/२०२५ | ४५,६२५/- | २ | **२. सौ. शेख सुग्रावी आनसर** मु. पो. रानमसले ता. उ. सोलापूर जि. सोलापुर |
| ३ | ०३/२०२५ | २,७५,३३०/- | १<br>२<br>३ | **१. सौ. स्वाती बाळू कोळी** रा. घर नं. ११६ शिवरत्न नगर जुळे सोलापूर जि. सोलापूर<br>**२. श्री. अजित भागवत पाटील** मु. पो. ब्रम्हपुरी ता. मंगळवेढा जि. सोलापूर<br>**३ श्री. उमाजी चंदू टोणपे** रा. ३८१/३६१ संजय गांधी झोपडपट्टी २ टोणपे पिठाची गिरणी जि. सोलापूर |
| ४ | ०४/२०२५ | १,१५,१९०/- | १ | **१. श्री. नागेश वसंत दाते** रा. २५३ भारतरत्न इंदिरा नगर जि. सोलापूर |
| ५ | ०५/२०२५ | ५०,३५१/- | १<br>२<br>३ | **१. अंबादास गोविंद श्रीराम** रा.१६२७ कुचन नगर गोविंदराज मार्केटिंग जवळ जि. सोलापूर<br>**२. श्री. राजू कृष्णाहरी चिलवेरी** रा. २५८/४४ गवई पेठ रविवार पेठ पेट्रोल पंप जवळ जि. सोलापूर<br>**३ श्री. मधुकर देविदास बिंगी** मु. गोदुताई विडी घरकुल पो. कुंभारी ता.द. सोलापूर जि. सोलापूर |
| ६ | ०६/२०२५ | १,१३,९६७/- | १<br>२<br>३ | **१. श्री. कविटकर नारायण विष्णु** रा. प्लॉट नं ६१ शिवगंगा नगर भाग ४ मजरेवाडी ता. उ. सोलापूर जि. सोलापूर<br>**२. श्री. लोंढे परशुराम भरत** रा.६३० विजापूर रोड सोनिया नगर चांदतारा मरिजद जवळ २ नं झोपडपट्टी इंदिरानगर जि. सोलापूर<br>**३ श्री. संगशेट्टी सागर कृष्णहरी** रा.अ १६९/१ गोदुताई विडी घरकुल कुंभारी ता.द. सोलापूर जि. सोलापूर |
| ७ | ०७/२०२५ | १,२९,६४६/- | १<br>३ | **१. श्री. सतीश तिपण्णा जोजन** रा.२४४/३ नीलम नगर आदर्श कन्नड शाळेच्या पाठीमागे मजरेवाडी जि. सोलापूर<br>**३ सौ. अंबिका नागेश कामुर्ती** मु. पो. कुंभारी ता.द. सोलापूर जि. सोलापूर |
| ८ | ०९/२०२५ | ९४,९४८/- | २ | **२. श्री. वायचळ सुरज रामचंद्र** मु. पो. डोके वस्ती मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर |
| ९ | १०/२०२५ | १,०६,९७१/- | १<br>२<br>३ | **१. श्री. अनवर हुसैन कामले** रा. ११५ शिवगंगा नगर १ नई जिंदगी जि. सोलापूर<br>**२. श्री. फिरोज निसार अहमद बेपारी** रा.२८३ भारत रत्न इंदिरा नगर ७० फुट रोड अग्रवाल स्वीट मार्ट जवळ जि. सोलापूर<br>**३ श्री. तबरेश इसाक मुल्ला** रा. २ विष्णु मिल चाळ रेशन दुकान जवळ जि. सोलापूर |
| १० | ११/२०२५ | ६९,३९३/- | १<br>३ | **१. श्री. निकम अमर मोहन** रा.४९/५८ हनुमान नगर भवानी पेठ टेलिफोन टॉवर जि. सोलापूर<br>**३ श्री. वाघमोडे प्रतिक दयानंद** रा. ४९/६९ हनुमान नगर भवानी पेठ जि. सोलापूर |
| ११ | १२/२०२५ | ४१,५३७/- | १ | **१. श्री. राकेश विष्णु शिंदे** रा.२६७/१८९ रविवार पेठ कुचन प्रशाला जवळ जि. सोलापूर |
| १२ | १३/२०२५ | २,५८,५६४/- | १<br>२<br>३ | **१. श्री. सागर अंजय्या कोनम** रा.सी ६७२/२ गोदुताई विडी घरकुल जि. सोलापूर<br>**२. श्री. उध्दव सुखदेव सोनवणे** रा. ११२ रेवण सिध्देश्वर मंदिर जवळ विजापूर रोड जि. सोलापूर<br>**३ श्री. प्रसाद नंदकुमार क्षीरसागर** रा. ४/२८ तुळजापूर रोड जि. सोलापूर |
| १३ | १४/२०२५ | | १<br>२ | **१. श्री. गणेश भगवान चिद्रे** रा. १८९ थोबडे नगर मजरेवाडी पी नं ७७२ जि. सोलापूर<br>**२. सौ. नीलोफर सत्तार शेख** रा.३७८/३ क गोदुताई विडी घरकुल कुंभारी ता.द. सोलापूर जि. सोलापूर |
| १४ | १५/२०२५ | ७९,२६०/- | १<br>३ | **१. श्री. रोहित मोहन बाडेकर** रा. घर नं २५२० आय ग्रुप विडी घरकुल पंचमूर्ती मंदिर जवळ जि. सोलापूर<br>**३ श्री. सुरेश अंजय्या कोनम** रा. सी/६७२/२ गोदुताई विडी घरकुल कुंभारी रोड जि. सोलापूर |
| १५ | १६/२०२५ | १,५२,८७६/- | २<br>३ | **२. श्री. कदम तानाजी चंद्रहार** मु.पो. बी. बी. दारफळ ता.उ. सोलापूर जि. सोलापूर<br>**३. श्री. साठे किशोर बळवंत** मु.पो. बी. बी. दारफळ ता.उ. सोलापूर जि. सोलापूर |
| १६ | १८/२०२५ | ५,८५,१५२/- | ३ | **३. श्री. वाघमारे रावसाहेब ईश्वरा** मु. पो. फळवणी ता. माळशिरस जि. सोलापूर |
| १७ | १९/२०२५ | ३५७८५३/- | ३ | **३. श्री. पाटील संजय हरि** मु. पो. विरवडे खुर्द मारूती मंदिर जवळ ता. मोहोळ जि. सोलापूर |
| १८ | २०/२०२५ | ९००७१५/- | २<br>३ | **२. सौ. ढोणे रेश्मा लक्ष्मण** मु. पो. पुळूज ता. पंढरपूर जि. सोलापूर<br>**३. श्री. जानकर भाऊसाहेब बळीराम** मु. पो. रोपळे ता. पंढरपूर जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने/अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.
**प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वताः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक- ०९/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**
प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.
आज दि.२६/०३/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.
**स्थळ - सोलापूर**
**दि. - २६/०३/२०२५**
शिक्का
सही/-
(श्री. डी. एस. भंवर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, उत्तर सोलापूर .

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### युएई फुटबॉल संघाचे मुख्य प्रशिक्षक बेंटो यांना काढले

**दुबई** : मंगळवारी उत्तर कोरियावर २-१ असा विजय मिळवल्यानंतर काही तासांतच संयुक्त अरब अमिरातीच्या फुटबॉल संघाचे मुख्य प्रशिक्षक पाउलो बेंटो यांना काढून टाकण्यात आले आहे. या विजयामुळे २०२६ च्या विश्वचषकासाठी पात्रता मिळवण्याच्या त्यांच्या कमकुवत आशा जिवंत राहिल्या आहेत. ९८ व्या मिनिटाला झालेल्या या विजयामुळे युएई गट अ मध्ये दुसऱ्या स्थानावर असलेल्या उझबेकिस्तानपेक्षा चार गुणांनी मागे आहे आणि त्याचे दोन सामने शिल्लक आहेत. पुढील वर्षी अमेरिका, कॅनडा आणि मेकिसको येथे होणाऱ्या स्पर्धेत तीन आशियाई गटांपैकी प्रत्येकी दोन अव्वल संघांना स्थान निश्चित आहे. युएई फुटबॉल संघटनेने राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक पाऊलो बेंटो यांना त्यांच्या प्रशिक्षकांसह काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे, असे युएई फुटबॉल संघटनेने समाज माध्यमावर पोस्ट केले आहे. ५५ वर्षीय पोर्तुगीज प्रशिक्षकाने पोर्तुगालला युरोपियन चॅम्पियनशिपच्या अंतिम चारमध्ये नेल्यानंतर १० वर्षांनी दक्षिण कोरियाला २०२२ च्या विश्वचषकाच्या बाद फेरीत नेले. जुलै २०२३ मध्ये रोडोल्फो अरुआबारेनाच्या जागी त्यांची नियुक्ती करण्यात आली.

# लखनौला हैदराबादच्या आक्रमक फलंदाजीची धास्ती

◆ **हैदराबाद, २६ मार्च**

सलामीच्या सामन्यात पराभव पत्करल्यानंतर ऋषभ पंतच्या लखनौ सुपर जायंट्सला गुरुवारी येथे इंडियन प्रीमियर लीगमध्य सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात खेळावे लागणार आहे. लखनौला हैदराबादच्या अति-आक्रमक फलंदाजी पद्धतीबद्दल सावधगिरी बाळगावी लागेल.

गत वर्षीच्या उपविजेत्या सनरायझर्स हैदराबादने पहिल्या सामन्यात आपल्या कामगिरीत सुधारणा केली आणि ते आयपीएलमधील सर्वाधिक धावसंख्येच्या वितक्रमाच्या समीप पोहोचले होते. या पहिल्या सामन्यात त्यांनी राजस्थान रॉयल्सवर ४४ धावांनी विजय नोंदविला.

या मोठ्या विजयामुळे हैदराबाद सर्वोत्तम नेट रन रेटसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचल. आता पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील हैदराबाद संघ स्पर्धेत आपले वर्चस्व कायम ठेवू इच्छित असेल.

हैदराबादने राजस्थानविरुद्ध जोरदार खेळ केला. आपल्या नवीन संघाचे-हैदराबादचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या ईशान किशनने शतक झळकावले व इतर मोठ्या खेळाडूंनी नेहमीप्रमाणे जोरदार खेळ करत उप्पल येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर ६ बाद २८६ धावा उभारल्या.

अशा फलंदाजीचा दृष्टिकोन प्रतिस्पर्ध्यांसाठी भयानक ठरू शकतो. हैदराबादची सातत्यपूर्ण कामगिरी त्यांना आयपीएल सर्किटमधील सर्वात मजबूत फलंदाजी गट करते.

अभिषेक शर्मा, ट्रॅव्हिस हेड आणि हेनरिक कलासेन या हैदराबादच्या प्रमुख शस्त्रांच्या मिश्रणात ईशान किशनची भर पडणे ही संघासाठी आणखी एक जमेची बाजू आहे.

> **आजचा आयपीएल सामना**
>
> **लखनौ सुपर जायण्ट्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
> **स्थळ** : राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, हैदराबाद
> **वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
> **थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

याशिवाय, नितीश कुमार रेड्डीनेही राजस्थान रॉयल्सविरुद्ध जबरदस्त कामगिरी केली.

मुंबई इंडियन्सने सोडल्यानंतर ईशान किशनने आयपीएलमध्ये आपले पहिले शतक पूर्ण केले. त्याने ४७ चेंडूत नाबाद १०६ धावा करताना सहा षट्कार आणि ११ चौकार ठोकले.

अशा परिस्थितीत लखनौ सुपर जायण्ट्स संघालाा स्पष्ट गोलंदाजी योजना आखण्याची आवश्यकता असेल, कारण आयपीएलमध्ये सर्वात लहान चूक महागात पडते.

आधीच एक नवीन विक्रम झाला आहे. पहिल्या पाच सामन्यांमध्ये ११९ षट्कार हाणले आहेत.

गत रोमांचक सामन्यात दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध एका गड्याने पराभव पत्करणाऱ्या लखनौ संघाने आक्रमक दृष्टिकोन दाखवला, पण मधल्या षटकांमध्ये त्यांनी चुका केल्या व ती चूक महागडी ठरली. लखनौने शेवटच्या आठ षटकांमध्ये सहा फलंदाज गमावले व केवळ ७६ धावांची भर घातली. आशुतोष शर्माने नाबाद ६६ धावा करून दिल्ली संघाला विजय मिळवून दिला. लखनौचा नवीन कर्णधार पंत खेळ विसरला की काय असे वाटत होते, कारण तो सहा चेंडूत शून्य धावांवर बाद झाला. आता हैदराबादविरुद्ध खेळताना पंतला सावधगिरीने खेळावे लागणार आहे.

लखनौला वरिष्ठ फिरकी गोलंदाज रवी बिश्नोईशिवाय मणिमारन सिद्धार्थ व दिग्वेश राठी यांच्याकडून प्रभावी कामगिरीची अपेक्षा असेल. (वृत्तसंस्था)

# मेस्सी ऑक्टोबरमध्ये भारतात

### केरळमध्ये खेळणार प्रदर्शनी सामना

◆ **नवी दिल्ली, २६ मार्च**

स्टार फुटबॉलपटू व विश्वविजेता अर्जेंटिना संघ ऑक्टोबर महिन्यात भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. भारतातील फुटबॉल चाहत्यांना केरळमध्ये होणाऱ्या प्रदर्शनीय सामन्यात लियोनेल मेस्सी आणि त्याच्या अर्जेंटिना संघाची आणखी एक झलक पाहायला मिळणार आहे. विश्वचषक जिंकल्यानंतर १४ वर्षांनी विश्वचषक विजेत्या कर्णधार पहिल्यांदा भारताला भेट देत आहे.

मेस्सी आणि त्याचा विश्वविजेता अर्जेंटिना संघ दक्षिण भारतातील राज्यांना भेट देणार आहे आणि कोचीमध्ये दोन मैत्रीपूर्ण फुटबॉल सामने खेळणार आहे. हा सामना ऑक्टोबरमध्ये होणार असल्याची माहिती केरळचे क्रीडा मंत्री व्ही. अब्दुरहिमान यांनी बुधवारी दिली.

एचएसबीसी इंडिया भारतात फुटबॉलला सहकार्य व प्रोत्साहन देण्यासाठी अर्जेंटिना संघाचे अधिकृत भागीदार झाले. या भागीदारीअंतर्गत महान खेळाडू लियोनेल मेस्सीसह अर्जेंटिना राष्ट्रीय फुटबॉल संघ ऑक्टोबर २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय प्रदर्शनीय सामन्यासाठी भारताला भेट देणार आहे, असे एचएसबीसी इंडियाने म्हटले आहे.

अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशन (एएफए) आणि एचएसबीसी यांनी आज भारत आणि सिंगापूरसाठी एक वर्षाच्या नवीन भागीदारीवर स्वाक्षरी केल्याची घोषणा केली आहे. यात २०२६ च्या विश्वचषक पात्रता अंतिम सामन्यांपूर्वी २०२५ मधील स्पर्धात्मक हंगामाचा समावेश आहे.



मेस्सीचा पहिला भारत दौरा सप्टेंबर २०११ मध्ये कोलकाता येथे व्हेनेझुएला विरुद्धच्या विश्वचषक पात्रता फेरीच्या सामन्यासाठी होता. अर्जेंटिनाने साल्ट लेक स्टेडियमवर तो सामना १-० असा जिंकला.

आम्ही फुटबॉल जगातील सर्वात आदरणीय संघांपैकी एकाशी नाते जोडताना चाहते व ग्राहकांसाठी अविस्मरणीय अनुभव निर्माण करण्यास व २०२६ च्या विश्वचषकाच्या प्रवासात अर्जेंटिना संघाला पाठिंबा देण्यास उत्सुक आहोत, असे इंटरनॅशनल वेल्थ ॲण्ड प्रीमियर बँकिंग एचएसबीसी इंडियाचे प्रमुख संदीप बत्रा म्हणाले.

एएफएच्या आंतरराष्ट्रीय विस्तारासाठी एक नवीन टप्पा गाठला गेला आहे. यामुळे भारत व सिंगापूरमध्ये एचएसबीसीसोबत नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. हा करार आमच्या संघाची काळजी घेता. २०२५ व २०२६ मध्ये प्रगती करत असताना आम्ही आमचा करार मजबूत करण्यास व अनेक क्षेत्रांमध्ये विस्तार करण्यास उत्सुक आहोत. अर्जेंटिना राष्ट्रीय संघाचा नवीन भागीदार म्हणून आम्ही एचएसबीसीचे स्वागत करतो, असे अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष क्लॉडिओ फॅबियन तापिया म्हणाले. (वृत्तसंस्था)

# युवा भारतीय खेळाडूंची निर्भयता बघून खूप आनंद : मार्कस स्टोइनिस

◆ **नवी दिल्ली, २६ मार्च**

पंजाब किंग्ज संघातील युवा खेळाडूंचा निर्भयपणे व गुणवत्तापूर्ण खेळ बघून खूप आनंदित झाला तसेच आयपीएलच्या पृष्ठपृभूमीवर भारतीय टी-२० संघाने खूप भावित झाला आहे, असे ऑस्ट्रेलियन दिग्गज अष्टपैलू मार्कस स्टोइनिस म्हणाला.

रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांच्या निवृत्तीनंतर भारतीय क्रिकेटचे यश तिलक वर्मा व अभिषेक शर्मा यांच्यासारख्या खेळाडूंच्या दमदार कामिगरीवर अवलंबून आहे.

पंजाब किंग्जच्या तंबूमध्ये सलामीवीर प्रियांश आर्य सारख्या नवोदित खेळाडूंनी आयपीएलच्या सुरुवातीच्या काळातही आधीच छाप पाडली आहे.

भारतीय क्रिकेटमध्ये) खूप खोली आहे. त्यांना जागतिक स्तरावर आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळत आहे, असे तो म्हणाला.

ते खूप आत्मविश्वासू आहेत. आयपीएलमध्ये खेळण्याचा त्यांना फायदा झाला आहे. विशेषतःते भारतीय क्रिकेट संघासाठी खेळताना किती निर्भय आहेत हे पाहणे आश्चर्यकारक आहे. पंजाब किंग्ज कॅम्पमधील काही तरुण खेळाडूंनी कधीही आयपीएल खेळले नाही, पण ते खूप प्रभावी आहेत, असे ३५ वर्षीय खेळाडू म्हणाला. (वृत्तसंस्था)

# विदर्भाच्या रणजी संघाचे मुख्यमंत्र्यांनी केले अभिनंदन

◆ **मुंबई, २६ मार्च**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावल्यामुळे, या ऐतिहासिक विजयाबद्दल विदर्भ संघाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात निवेदनाच्या माध्यमातून अभिनंदन केले.

रणजी करंडक ही देशातील सर्वात प्रतिष्ठेची आणि मोठी क्रिकेट स्पर्धा मानली जाते. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, जिथे मुंबई, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र अशा तीन वेगवेगळ्या संघांचा समावेश असून, यंदा विदर्भ संघाने मोठी कामगिरी केली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आपल्या निवेदनात म्हटले.





क्रिकेट विश्वचषक जिंकणारा आपला संघ असो, किंवा देशासाठी पदके जिंकणारे खेळाडू असोत त्यांचा उचित सन्मान करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. खेळाडूंना योग्य सन्मान व पुरस्कार देण्याचे काम राज्य शासन करेल. राज्य शासनाकडून खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अधिकाधिक सहकार्य केले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या निवेदनाद्वारे स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

# धाराशिव, सांगली, कोल्हापूर व पुण्याचे तीन संघ उपांत्य फेरीत

### कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो : ठाणे, सातारा व मुंबई उपनगर यांचीही बाजी

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**इचलकरंजी, दि. २६ मार्च-**

कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो स्पर्धेत धाराशिव, सांगली, कोल्हापूर व पुणे यांनी प्रत्येकी तीन गटात उपांत्य फेरी गाठली. ठाणे, सातारा व मुंबई उपनगरने प्रत्येकी एका गटात उपांत्य फेरीत प्रवेश केला.

राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या



वतीने इंचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील विठ्ठल राम जी शिंदे शाळा क्रमांक २१च्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत किशोर गटात सांगली, सातारा, धाराशिव व कोल्हापूर तर किशोरी गटात पुणे, धाराशिव, ठाणे व सांगली यांनी उपांत्य फेरी गाठली.

पुरुष गटात पुणे, कोल्हापूर, मुंबई उपनगर व सांगली तर महिला गटात धाराशिव, कोल्हापूर, ठाणे व पुणे यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. या स्पर्धेचा समारोप उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते गुरुवारी (दि.२७) सायंकाळी अंतिम सामने संपल्यानंतर होईल.

### सांगलीने मुंबईला जादा डावात नमविले

महिला गटात पुण्याने नाशिकला १६-१५ असे एका गुणाने नमविले. मध्यंतरास नाशिकने १०-९ अशी आघाडी घेतली होती. नंतर मात्र पुण्याच्या प्रियांका इंगळे हिने (१.४०, २.३० व ६ गुण) हिने अष्टपैलू कामगिरी करत विजय खेचून आणला. नाशिककडून प्रगती भोपे हिने (७ गुण) हिने लढत दिली.

पुरुष गटात मुंबई उपनगरने ठाण्यास १६-१५ असे एका गुणाने हरविले. मुंबई उपनगरकडून ओंकार सोनवणे (२.१०,१.३० मि. व ५ गुण) तर ठाणेकडून राज संकपाळ (१.३० मि. व ३ गुण) यांनी कामगिरी केली. निर्धारित वेळेत १६-१६ अशी बरोबरी झाल्यानंतर जादा डावात सांगलीने मुंबईवर २८-२६ अशी दोन गुणांनी मात केली. मुंबईकडून वेंदात देसाई (६ गुण व तीन डावात प्रत्येकी १ मिनिटे संरक्षण) व सांगलीकडून अभिषेक केरीपाळे (१.१०, १ मि. व ७ गुण) यांनी अष्टपैलू कामगिरी केली.

### अन्य निकाल

**पुरुष** : कोल्हापूर वि. वि. सोलापूर २१-१८ ३ गुणांनी, पुणे वि. वि. अहिल्यानगर १४-११ एक डाव ३ गुणांनी.

**महिला** : धाराशिव वि.वि. सांगली १०-७ एक डाव ३ गुणांनी, कोल्हापूर वि. वि. सोलापूर १८-९ नऊ गुणांनी, ठाणे वि.वि. मुंबई १९-१३ एक डाव ६ गुणांनी

### असे होणार उपांत्य सामने

**किशोर** : सांगली विरुद्ध सातारा, धाराशिव विरुद्ध कोल्हापूर

**किशोरी** : पुणे विरुद्ध धाराशिव, ठाणे विरुद्ध सांगली

**पुरुष** : पुणे विरुद्ध कोल्हापूर, मुंबई उपनगर विरुद्ध सांगली

**महिला** : धाराशिव विरुद्ध कोल्हापूर, ठाणे विरुद्ध पुणे

# क्रीडा भारती क्लबला विजेतेपद

### १५ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत पुण्यास हरविले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

डोणगाव रोड येथील पुष्प जिम खाना मैदानावर खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामन्यात क्रीडा भारती क्लबने १५ वर्षाखालील वयोगटाचे विजेतेपद पटकावले.

क्रीडा भरती क्लबने जीकेसीआय पुणे क्लबचा ४ - २ असा पराभव केला. अंतिम सामन्यात १२ धावांनी सामना जिंकला.

प्रथम फलंदाजी करताना क्रीडा क्लबने २० षटकात १२३ धावा केल्या. मोहिनी मोरे २७, समृद्धी चट्टे १९ व कबीर कीर्तीकर यांनी १८ धावा केल्या. जीकेसीआय पुणे कडून परिणाझ हिने १६ धावा देत १



गडी बाद केला तर कायरा तिडके, सुप्रभा यांनी प्रत्येकी १ गडी बाद केले. जीकेसीआय पुणे संघाने २० षटकात ५ गडी बाद १११ धावांवर रोखून क्रीडा भारतीने सामना जिंकला.

भाव्या ३८, विश्वजीत मोजे १९, संपदा मोजे १७ यांनी धावा केल्या. आदित्य चटके ने ९ धावा देत २ गडी बाद केले. रुचिता मोरे, विराज सलगर व रिदम कचरे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केले. विजयी क्रीडा भारती संघास मुख्य मार्गदर्शक अनिल सांब्राणी व सचिव गणेश चट्टे यांच्या मार्गदर्शन लाभले.

**सर्वोत्कृष्ट खेळाडू**

मालिकावीर : देवांश राठी. गोलंदाज : रुचिता मोरे, फलंदाज : रिदम कचरे. क्षेत्ररक्षक : कबीर कीर्तीकर.

# शहर गटातून शिवनेरी संघ उपांत्य फेरीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

मराठा प्रीमियर लीग २०२५च्या साखळी फेरीतील तिन्ही सामने जिंकून शिवनेरी (विक्रांत वानकर) संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. दिवसाच्या शेवटच्या सामन्यात सौरभ जाधव (शिवनेरी संघ) कडून पहिले अर्धशतक लगावले. नितीन गायकवाडने ३ सामन्यात ५ व राहुल सुरवसेने एकूण ६ बळी घेतले.

येथील विजापूर रोडवरील नेहरूनगर शासकीय मैदानावर मराठा प्रीमियर लीग २०२५ (सीजन २) चे दिमाखदार उद्घाटन पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे व्हाइस चेअरमन श्रीकांत मोरे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते महेश गादेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे यांच्या हस्ते मैदानाचे पूजनाने करण्यात आले. यावेळी विजापूर नाका पोलिस स्टेशन पोलिस निरीक्षक दादाराव गायकवाड,



मराठा प्रीमियर लीग २०२५ चे दिमाखदार उद्घाटन

बिल्डर संघटनेचे दत्तामामा मुळे, राम काका साठे, विजय कोकाटे, रणजीत चवरे, सचिन चवरे, नामदेव पवार, रवी भोपळे, सुनील चव्हाण, चंद्रकांत पवार, सुनील जाधव, कुबेर पवार आदी मान्यवर यांच्यासोबत स्पर्धा आयोजक प्रशांत बाबर यांचे वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याचे पुष्पहार घालून जय जिजाऊ जय शिवराय जय शंभूराजे, छत्रपती शिवाजी महाराज की जय अश्या स्फुरण देणाऱ्या घोषणा देऊन शिववंदन करण्यात आले. स्पर्धा समिती सदस्य सागर गव्हाणे, आमोघ जगताप, राजा जाधव, शंकर पवार आदी उपस्थित होते. शुभारंभाचा सामना सिंहगड विरुद्ध शिवनेरी संघात मान्यवरांच्या हस्ते नाणेफेक झाल्यावर खेळविण्यात आला आणि त्यात शिवनेरी संघाने दमदार विजय मिळवला. स्पर्धा शुभारंभाच्या पहिल्या दिवशी एकूण ६ सामने खेळविण्यात आले असून शहरी भागातील अ गटातील ४ संघ साखळी पद्धतीने प्रत्येकी ६ षटकांचे हे सामने पार पडले. स्पर्धेत प्रत्येक सामन्यात ॲड. गौरव जाधव यांचेकडून सामनावीर पुरस्कार आणि सन्मानचिन्ह नमेंद्र साखरे व बालाजी जाधव यांच्याकडून असून स्पर्धेत पहिले पारितोषक १ लाख ३९५ आणि कै.विजयराव मुळीक यांच्या स्मरणार्थ चषक देण्यात येणार असून चषक विक्रांत पवार यांचेकडून देण्यात आले आहेत.या स्पर्धेस सोलापूर जिल्हा क्रिकेट अंपायर्स असोसिएशनचे पंच यांचे सहकार्य लाभत आहे.

### सहा सामन्यांचा संक्षिप्त धावफलक

**सिंहगड** : ९०/३ (६)
बालाजी शिंदे ३५, दीपक भोसले १८, सचिन लोंढे नाबाद १३
निरंजन कदम व मनोज पवार एकेक बळी **पराभूत विरुद्ध**
**शिवनेरी** : ९१/३ (६) निरंजन कदम नाबाद ३७, किरण पवार ३० धनंजय भाऊ २ बळी, नरेंद्र साखरे १ बळी.

**तोरणा** : ६१/५ (६)
महेंद्र धवन नाबाद ३६
विजय पवार धनंजय भाऊ आशिष जाधव प्रत्येकी १ बळी
**पराभूत विरुद्ध**
**सिंहगड** : ६२/२ (५.२)
बालाजी शिंदे नाबाद ४४, दीपक भोसले ११
सनी पोळ विशाल पोपळे प्रत्येकी १ बळी.

**सिंहगड** : ३९/७ (६)
बालाजी शिंदे १३
संदीप मगर १०/३ बळी, राहुल सुरवसे १७/२ बळी, अक्षय भोसले १ बळी. **पराभूत विरुद्ध**
**पन्हाळगड** : ४३/१ (२.४)
राकेश नवले नाबाद १९, नितीन काशीद नाबाद १३
विजय पवार १ बळी.

**पन्हाळगड** : ४३/७ (५)
गणेश चव्हाण २० रामा भिंगारे १०
नितीन गायकवाड व मनोज पवार प्रत्येकी २ बळी, सौरभ जाधव १ बळी **पराभूत विरुद्ध**
**शिवनेरी** : ४५/१ (२.५)
सौरभ जाधव नाबाद ३२, राम लखन नवगिरे ११
अक्षय भोसले १ बळी

**पन्हाळगड** : ६९/६ (६)
नितीन काशीद २८, गणेश चव्हाण १२. एस. के. १३
सनी पोळ १५/३ बळी, धनंजय जाधव २ बळी.
**विजयी विरुद्ध**
**तोरणा** : ३३/९ (६) अक्षय भोसले १ धावेत ३ बळी
संदीप मगर राहुल सुरवसे गुंड प्रत्येकी २ बळी.

### उपांत्यपूर्व सामना

**शिवनेरी** : ८६/६ (६)
सौरभ जाधव ५५, सचिन चव्हाण १४,
राहुल सुरवसे गणेश चव्हाण प्रत्येकी २ बळी **विजयी**
**विरुद्ध पन्हाळगड** : ८२/६ (६)
गणेश चव्हाण १७, विकास सावंत नाबाद १६, राकेश नवले १५. नितीन गायकवाड ३ बळी निरंजन कदम व सौरभ जाधव प्रत्येकी १ बळी

## संक्षिप्त वृत्त



### राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सचिन उकिरडे यांचा तृतीय क्रमांक

**बार्शी, दि. २६ मार्च-**

भारतीय डाक विभागामार्फत राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत सचिन उकिरडे यांनी लिहिलेल्या निबंधाचा राज्यात तृतीय क्रमांक आल्याने मुंबई येथे त्यांना चीफ पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंग आणि पोस्ट मास्टर जनरल सुचिता जोशी यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि आणि पाच हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी फायनान्स जनरल मॅनेजर जयंती समादार, प्राचार्या नलिनी मोहनदास, प्राचार्या साक्षी भाटिया उपस्थित होते. भारतीय डाक विभागामार्फत संपूर्ण देशभरात इनलँड आणि एनवलप अशा दोन्ही भागात डिजिटल युगात पत्र लेखनाचे महत्त्व या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्यांच्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी.टी. पाटील, जॉईंट सेक्रेटरी ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शालेय समिती चेअरमन डी.एम. मोहिते, नरेंद्र प्रवर, सुरेश काकडे, राहुल जाधव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रफुल्ल ओमन, उपाध्यक्ष सागर गरड, सरपंच पुतळा गरड, उपसरपंच वैभव उकिरडे यांनी अभिनंदन केले.

### अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत स्वरा काळे केंद्रात प्रथम



**पिलीव, दि.२६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पठाणवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेवस्ती येथील इयत्ता दुसरीमध्ये शिकत असणाऱ्या स्वरा काळे हिने अभिरप शिष्यवृत्ती परीक्षेत १३० गुण मिळवित केंद्र गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळविला. तिला नितीन शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल स्वराचे गटशिक्षणाधिकारी करडे, शिक्षण विस्तार अधिकारी महामुनी, केंद्र प्रमुख गोरवे यांच्याकडून अभिनंदन होत आहे.

### आरोह ननवरेची नवोदय विद्यालयासाठी निवड



**अकलूज, दि. २६ मार्च-**

येथील शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी आरोह गणेश ननवरे याची नवोदय विद्यालय, पोखरापूर येथे निवड झाली आहे. १८ जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या या परीक्षेत आरोहने हे यश मिळवले. इयत्ता सहावीसाठी त्याची निवड झाली आहे पुढील शिक्षणासाठी नवोदय विद्यालय पोखरापूर येथे त्याला इयत्ता सहावी ते बारावी पर्यंत शिक्षण मोफत मिळणार आहे नवोदय विद्यालय केंद्र सरकार मार्फत सीबीएससी शिक्षण पद्धतीने अभ्यासक्रम राबविला जातो. त्याच्या या यशाबद्दल शिवरत्न शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील, गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार करडे, सचिव धर्मराज दगडे, स्कूलचे चेअरमन रामकृष्ण काटकर, मुख्याध्यापक जितेंद्र माने-देशमुख यांनी कौतुक केले.

### पर्यावरण संवर्धन, शाश्वत उपक्रम कटिबद्धता

**सोलापूर, दि.२६ मार्च -**

मार्च-संपूर्ण जग 'जागतिक वन दिन' आणि 'जागतिक जल दिन' साजरा करत असताना, टोयोटा किर्लोस्कर मोटर म्हणजेच टीकेएमने पर्यावरण संवर्धनासाठी आपली कटिबद्धता पुन्हा एकदा दृढ केली आहे. टोयोटाच्या 'ग्लोबल टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५०' (टीईसी २०५०) या दृष्टीकोनात, 'शून्य पर्यावरणीय परिणामाच्या पुढे जाऊन, निव्वळ सकारात्मक परिणाम साध्य करण्याच्या' सहा महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांचा समावेश आहे. यात पाण्याचा वापर कमी करणे आणि पाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करणे, भविष्यात निसर्गाशी सुसंगत समाज निर्माण करण्याचा समावेश आहे.हा उपक्रम २०१५ मध्ये सुरु झाला आणि तेव्हापासून टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० ही संकल्पना कंपनीच्या शाश्वत उपक्रमांना दिशा देत आहे.

## निधन वृत्त...

### कांचनताई परुळेकर



**कोल्हापूर, दि. २६ मार्च -**

शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्या आणि महिला सबलीकरणासाठी कार्यरत स्वंयसिध्दा संस्थेच्या संस्थापिका कांचनताई परुळेकर यांचे निधन झाले . त्या ७४ वर्षाचे होत्या . बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये अधिकारी पदावर कार्यरत असताना त्यांनी स्वच्छे चा सेवानिवृत्ती घेऊन सन १९९२ साली त्यांनी स्वयंसिद्धा संस्थेची स्थापना केली होती. महिलां वर्गाचे सक्षमीकरणासह त्यांना आर्थिक दृष्ट्या बलशाली करणे त्यांच्यात मार्केटिंगची कला कौशल्य वाढवणे तसेच ग्रामीण भागात स्वयंपूर्ण सबलीकरण करणे या त्रिसूत्रीवर त्यांनी काम केले होते.

### म. रफीक बागवान



**सोलापूर,दि. २६ मार्च-**

कौंतम चौक येथील न्यू सुपर प्लॉस्टिकचे मालक म. रफीक हाजी शादुल्ला बागवान (वय ५४) यांचे हृदयविकाराने बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी व सुना नातवंडे असा परिवार आहे. सिध्देश्वर पेठ येथील गोल्डन ग्लास वेअरचे मालक हाजी शादुल्ला बागवान यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव होत.

### भूदेवी जक्कन



**सोलापूर,दि. २६ मार्च-**

हैद्राबाद रोड, शेळगी परिसरातील जयलक्ष्मी सोसायटी येथील भूदेवी सत्यनारायण जक्कन (वय ६८) यांचे बुधवारी २६ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात पती,तीन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर पद्मशाली स्मशानभूमी येथे संध्याकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते अनिल जक्कन यांच्या त्या मातोश्री होत.

---

### प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत

# नवीन घरकुलांचे पुन्हा होणार सर्वेक्षण

**पात्र लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आमदार आवताडे यांचे आवाहन**




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२६ मार्च -**

येत्या एक एप्रिल पासून राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ सुरू होणार असून मतदारसंघातील प्रत्येक पात्र लाभार्थ्याने या योजनेमध्ये आपली नोंदणी करावी ग्रामपंचायत, पंचायत समिती यांच्यामार्फत ही नोंदणी होणार असून यामध्ये काही अडचणी आल्यास किंवा जाणून-बुजून कुणी कोणाच्या सांगण्यावरून राजकीय दबावातून एखाद्या पात्र लाभार्थ्याला वगळण्याचा प्रयत्न केल्यास त्यांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील जनतेला केले आहे .पहिल्या टप्प्यातील प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये वंचित राहिलेल्या पात्र कुटुंबांच्या सर्वेक्षणाची प्रक्रिया येत्या १ एप्रिल २०२५ पासून ग्रामपंचायतीच्या मदतीने सुरु होत आहे. या योजनेपासून मतदार संघातील एकही पात्र लाभार्थी वंचित राहता कामा नये, यासाठी लाभार्थ्यांनी संबंधित ग्रामपंचायतीशी तात्काळ संपर्क साधावा आणि या योजनेचा लाभ घ्यावा. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट न झालेले, प्रक्रियेद्वारे अपात्र ठरलेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेल्या कुटुंबांचे योजनेच्या या दुसऱ्या टप्प्यात नव्याने सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने राज्य सरकारला दिल्या आहेत. हे सर्वेक्षण मोबाईल ॲपमध्ये करण्यासाठी सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, सर्वेक्षक यांच्यावर जबाबदारी देण्यात आलेली आहे. मतदार संघातील पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळविण्याची पुन्हा एकदा संधी मिळाली असून येत्या १ एप्रिलपासून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या मदतीने सर्वेक्षणाची प्रक्रिया सुरु होणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पहिल्या टप्प्यात वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांसह नवीन लाभार्थ्यांनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा लाभ घ्यावा, यातून काही अडीअडचणी आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आमदार अवताडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले .

---

## शिक्षणासह उद्योग, व्यापार क्षेत्राने एकत्र यावे

**पंढरपूरच्या कर्मवीर कॉलेजमधे 'इंडस्ट्री-अकॅडेमिया २०२५' कार्यक्रम संपन्न**

**शंभरहून जास्त कंपन्यांचा सहभाग**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२६ मार्च -**

'विकसित भारत' हे स्वप्न साकारण्यासाठी शिक्षण, उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राने एकत्र येणे अत्यावश्यक आहे. त्यातूनच भारताच्या प्रगतीला गती मिळू शकते असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या इंव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसचे संचालक प्रा. डॉ. सागर डेळेकर यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रिसर्च डेव्हलपमेंट सेल, इंटरनल क्वॉलिटी इशूरन्स सेल आणि इंटरप्रेनरशिप सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंडस्ट्री-अकॅडेमिया २०२५' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या इंव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसचे संचालक प्रा. डॉ. सागर डेळेकर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. डॉ. डेळेकर म्हणाले, देशाच्या विकासासाठी उद्योग आणि शिक्षण क्षेत्राने एकत्र येणे काळाची गरज आहे. भारतात सध्या एक हजाराहून अधिक विद्यापीठे आणि ६५ हजाराहून अधिक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या शिक्षण व्यवस्थेमध्ये ४ कोटी तीन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु बेरोजगारीचा दर ४६ टक्केपेक्षा अधिक आहे. त्यामुळे शिक्षणातून केवळ नोकरी मिळवणाऱ्या मानसिकतेतून बाहेर पडले पाहिजे. नवीन संधी निर्माण करण्यावर भर द्यावा लागेल. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाल्याने बेरोजगारीच्या प्रश्नावर प्रभावी उपाययोजना करता येतील असेही त्यांनी सांगितले. 'इंडस्ट्री-अकॅडेमिया २०२५' मध्ये शंभरहून अधिक कंपन्यांचा सहभाग होता. यामधे कृषी, बँकिंग, आयटी, दुग्ध व्यवसाय, बेकरी यांसारख्या विविध क्षेत्रांतील कंपन्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी लोकसंख्यावाढ आणि कृषी क्षेत्राचे महत्त्व सांगितले. प्रास्ताविक व स्वागत प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. धनंजय साठे यांनी करून दिला. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. राजेंद्र कवडे, डॉ. तुकाराम अनंतकवळस, डॉ. अनिल चोपडे, डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. नेहा देसाई, डॉ. मधुकर अनंतकवळस आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनेक कंपन्यानी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी इंटरनशीप व ऑन दि जॉब ट्रेनिंग देण्याचे कबूल केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी केले. डॉ. बाळासाहेब बळवंत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## करकंब ग्रामीण रुग्णालयात २२५ रुग्णांची मोफत तपासणी

**क्षयरोग दिनाचे औचित्य साधून विविध आजारांवर मार्गदर्शन**

**त.भा.वृत्तसेवा.**
**करकंब, दि.२६ मार्च.-**

क्षयरोग दिनानिमीत्त करकंब (ता. पंढरपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात विविध आजारांवर मोफत मार्गदर्शन व तपासणी शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये २२५ रूग्णांची तपासणी करण्यात आली.




> सदर शिबिरामध्ये ओरल स्क्रिनिंग ४८, ब्रेस्ट कॅन्सर स्क्रिनिंग ५२, सीएक्स स्क्रिनिंग १८, उच्च रक्तदाब ४६, मधुमेह ५१, हृदयरोग (कार्डियाक) १० अशा प्रकारे एकूण २२५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलकर्णी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर झाले. यामध्ये कर्करोग तपासणी, संसर्गजन्य आजार निदान तपासणी व उपचार पद्धत याबाबत ग्रामीण रुग्णालय व काणेज गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पंढरपूर यांचे संयुक्त विद्यमाने हे शिबिराचे घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन सरपंच प्रतिनिधी डॉ.शरदचंद्र पांढरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पुजन करण्यात आले. काणेज हॉस्पिटलच्या संचालिका लेप्रोस्कोपीक व जनरल सर्जन डॉ. वर्षा काणे यांनी स्त्रियांमध्ये असणाऱ्या विविध प्रकारचे कर्करोग त्यांची लक्षणे, प्रकार, प्रतिबंधात्मक तपासण्या, शस्त्रक्रिया याबाबत सखोल माहिती दिली. स्त्रीरोगतज्ञ डॉ.स्वाती बोधले यांनी स्त्रियांमधील आजार व कर्करोग याविषयी माहिती दिली. स्तन व गर्भाशय कर्करोग रुग्णांची तपासणी करण्यात आली. २४ मार्च जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक अभय शिंदे यांनी क्षयरोग प्रतिबंध व उपचार याबाबत रुग्णांचे समुपदेशन केले. गायत्री हॉस्पिटलचे फिजिशियन डॉ.सागर शिंदे यांनी मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग याबाबतची तपासणी केली. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी रुग्णालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

## रामेश्वरम येथे भारतमाता समितीतर्फे शहिद दिन

**ओम हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्य**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.२६ मार्च-**

> देश सेवा हेच इश सेवा आहे. आज प्रत्येकासाठी देश आणि राष्ट्रधर्म हा सर्वोच्च असला पाहिजे. देशाची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा ठेवणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. सर्वांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन देशाच्या भल्यासाठी झटले पाहिजे
>
> **- राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज, राष्ट्रीय अध्यक्ष, जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली**

> राष्ट्रीय संत श्री हवा मल्लिनाथ महाराज देशांची एकात्मता मजबूत होण्यासाठी, संविधानिक कर्तव्याची जाणीव प्रत्येक नागरिकांना करून देण्यासाठी नेहमी देशभक्तीपर कार्यक्रमाचे आयाजन करतात. ते देशभर फिरून सशक्त देश व समाज घडविण्याचे काम करत आहेत.एक संन्याशी जय भारत माता सेवा समितीची स्थापना करून हातात तिरंगा झेंडा घेऊन भारत देशात देश भक्ती निर्माण करणारे दुर्मिळ देशभक्त राष्ट्रीय संत आहेत.
>
> **- दासराव हंबर्डे, राष्ट्रीय सचिव, जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली.**

शहीद भगतसिंह, राजगुरु, सुखदेव अमर रहे अमर रहे! इनक्लाब झिंदाबाद! बोलो भारत माता की जय ! वंदे मातरम् ! चा जय घोष करीत तामिळनाडू राज्यातील रामेश्वरम येथे जय भारत माता सेवा समितीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ओम हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात अमर बलिदान दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

गोस्वामी मॅडम सत्संग हॉलमध्ये नांदेडचे सुप्रसिध्द गायक शाम गायकवाड, कर्नाटकातील सुप्रसिध्द गायक साक्षी व प्रीती या बहिणीने देशभक्तीपर गीते गायली. प्रथम हवा मल्लिनाथ महाराजांनी माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रीय स्मारकाला भेट देऊन पुष्पहार अर्पण केले. तसेच भारत श्रीलंका सीमेवरील अशोका सर्कल धनुषकोटी येथे भेट देऊन राष्ट्रध्वजाला वंदन केले. यावेळी सैनिकांच्या कुटुंबीयांचा, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. सिंदगीच्या बाल कलाकारांनी अप्रतिम नृत्याचा कार्यक्रम सादर केला. महाराष्ट्र, राजस्थान, उत्तरप्रदेश, कर्नाटक, तेलंगण, आंध्रप्रदेश सह भारतातून हजारो देशभक्त अमर बलिदान कार्यक्रमासाठी रामेश्वरम येथे दाखल झाले होते. समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते वैजनाथ झळकी आणि समितीचे लातूर जिल्हाध्यक्ष बालाजी बिराजदार यांनी सुत्रसंचलन केले.

---

## दूध भेसळ करणाऱ्यांवर मकोका लावावा

**आ.अभिजीत पाटलांनी सभागृहात उठवला आवाज**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ मार्च-**

> माझ्या मतदारसंघातील भोसे येथील दुध भेसळ करणाऱ्यांवर मकोका कारवाई करावी. लोकांच्या आरोग्याशी जीवाशी खेळणाऱ्यांवर कारवाई व्हावी म्हणून मी अधिवेशनात आवाज उठवला त्यास उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्री नरहरी झीरवळ यांनी तातडीने त्यावर बैठक लावून कारवाई करण्याचे आदेश केले आहेत. परंतु राज्यामध्ये सर्वत्र दूध भेसळ प्रकरण मोठ्या प्रमाणात चालत आहेत त्यावर देखील कारवाईची मागणी केली आहे.
>
> **- अभिजीत पाटील, आमदार**

आ. अभिजीत पाटील यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने विधानभवन सभागृहामध्ये पंढरपूर तालुक्यातील भोसे येथील दुध भेसळ प्रकरण सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले असता त्यावर आमदार अभिजीत पाटील यांनी आवाज उठवला. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने बैठक घेण्यात आली.

दूध आणि तस्सम अन्नपदार्थातील भेसळ मानवी आरोग्याला घातक आहे त्यामुळे अशी भेसळ करणारा मकोका अंतर्गत कारवाई करण्यासाठी सध्याच्या कायद्यात आवश्यकता सुधारणा करण्यात येतील त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी बैठकीत दिले.

राज्यामध्ये भेसळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे नालॉग चीज हा पदार्थ अनेक ठिकाणी नालॉग पनीर या नावाने विक्री होत असल्याची तक्रार आहेत. पंढरपूर तालुक्यातील भोसे येथील दुध भेसळ प्रकरण उघडकिस आले त्या अनुषंगाने आज बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, आ. सुधीर मुनगंटीवार, आ. अभिजीत पाटील, आ. कैलास पाटील, आ. विक्रम पाचपुते उपस्थित होते.

---

## मजूर महिलेच्या मदतीला धावून आली 'आपुलकी'

**डॉ. अमर शेंडे यांनी केली गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी**



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२६ मार्च-**

> डॉ.अमर शेंडे यांनी शासनाच्या सवलतीत न बसणाऱ्या व अवघड असलेल्या शस्त्रक्रियेच्या खर्चात मोठी सवलत देऊन गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी केली. त्याचबरोबर तीन महिन्यासाठी फेरतपासणी व औषधोपचार नि:शुल्क करणार असल्याचे तसेच यापुढे या महिलेला असा त्रास पुन्हा कधीही होणार नाही असे डॉ.शेंडे यांनी यावेळी सांगितले. बेबाबाई पवार यांना डिस्चार्ज मिळाल्यानंतर मंगळवारी त्यांनी आपल्या भावना व्यक्त करतेवेळी डॉक्टर टीम व आपुलकीचे आभार मानताना त्यांना अश्रू अनावर झाले. सांगोल्यातील आपुलकीची माणसं व डॉक्टर टीमने केलेली मदत कुठेही गेलो तरी कायम आठवणीत राहील असे त्या म्हणाल्या.

जिथे काम मिळेल तिथे जायचे, रोजंदारी करून पोट भरायचे, त्यातच दहा वर्षापासून शारीरिक त्रास, परंतु घरी सांगायचे कसे ? या विवंचनेत असतानाच जास्त त्रास होऊ लागल्यानंतर मात्र हॉस्पिटलला जावेच लागले. आणि डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर ऑपरेशन करावे लागेल असे सांगितल्यानंतर पायाखालची वाळू सरकली. मात्र मोलमजुरी करणाऱ्या या महिलेच्या मदतीला सांगोल्यातील आपुलकी धावून आली, त्याचबरोबर डॉ.अमर शेंडे यांनी गुंतागुंतीची यशस्वी शस्त्रक्रिया केल्यामुळे तिचे जगणे आता सुकर होणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, मूळचे हिंगोली जिल्ह्यातील रहिवासी असलेले पवार कुटुंबीय गेल्या दोन वर्षापासून मिळेल ते काम करून उदरनिर्वाह करण्यासाठी सांगोला तालुक्यात आले आहेत. गेल्या दहा दिवसांपूर्वी बामणी येथे काम चालू असताना बेबाबाई नामदेव पवार यांना जास्तच त्रास होऊ लागल्याने त्यांनी डॉ. शिवराज भोसले व डॉ. अश्विनी केदार यांच्याकडे जाऊन तपासणी केली असता ऑपरेशन शिवाय पर्याय नाही असे सुचवले. परंतु मोलमजुरी करणारे व हातावर पोट असणाऱ्या या कुटुंबाला ऑपरेशन साठी पैसे आणायचे कुठून ? असा प्रश्न पडला. याची माहिती आपुलकी प्रतिष्ठानला मिळाल्यानंतर आपुलकी प्रतिष्ठानने मदतीचे आवाहन केले व बघता बघता आपुलकी सदस्य व समाजातील दानशूर व्यक्तींकडून २४ तासात ३५ हजार रुपये जमा करून डॉक्टरांकडे सुपूर्द केले.

---

## खुपसंगी येथे पत्नीस पतीकडून बेदम मारहाण; पतीविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२६ मार्च**

खुपसंगी येथे एका २९ वर्षीय पत्नीने आपल्या पतीला तुमच्या मोबाईलवर महिलेचे व दोन मुलीचे आलेले फोटो कोणाचे आहेत असे विचारल्याच्या कारणावरून पतीने पत्नीस शिवीगाळ करीत वेळूच्या काठीने पाठीवर व डोकीवर मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी पती संभाजी लक्ष्मण लवटे याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील पत्नी फिर्यादी हि दि.२६ रोजी सकाळी ७.३० वा. घरकाम करीत असताना आरोपी तथा पती यांच्या मोबाईल व्हॅटसअपवर राहुल कसबे याने एका महिलेचा व दोन मुलीचे फोटो पाठविले होते. ते फोटो फिर्यादीने बघितल्यानंतर हे फोटो कोणाचे आहेत असे विचारले असता आरोपी पतीने शिवीगाळ करून तेथेच पडलेली वेळूची काठी घेवून पाठीवर मारहाण करू लागला. यावेळी सासूने हातातील काठी हिसकावून घेतल्यानंतर पतीने जवळच पडलेला विटेचा तुकडा घेवून डोकीत मारून गंभीर जखमी केले. त्यामुळे डोकीतून रक्त येवू लागले. मारहाण केल्याचे कोणास सांगितले तर तुला जीवे मारून टाकीन अशी धमकी देवून कामावर निघून गेल्याचे पत्नीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. घटनेनंतर फिर्यादीची आई व मेव्हणा यांनी पोलिस ठाण्यास घेवून आल्यानंतर उपचाराकरीता पोलिसांनी यादी दिल्यावर ग्रामीण रुग्णालयात उपचार करून तक्रार दाखल केली असल्याचे म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



सोलापूर : जुने जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी सकाळी निराधार योजनेच्या लाभार्थींनी गर्दी केली होती.

## संक्षिप्त वृत्त

### देवांशी जव्हेरी यांना उत्कृष्ट पेपर प्रेझेंटरचा सन्मान

**सोलापूर, दि.२६ मार्च-**

मेवात इंजिनिअरिंग कॉलेज, हरियाणा आयोजित इंटरनॅशनल कॉन्फरन्स मध्ये सोलापूर येथील देवांशी अक्षय जव्हेरी यांना उत्कृष्ट पेपर प्रेझेंटर म्हणून सन्मानित करण्यात आले. त्या मेकॅनिकल इंजिनिअर असून सोलापूर विद्यापीठातून त्यांनी पोस्ट ग्रॅज्युएशन एम . इ (मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस) पूर्ण केले आहे. त्यांनी विद्यापीठातून प्रथम येण्याचा मान पटकाविला होता. ते सध्या पी.एच.डी करत असून त्यांचा विषय बायोचार प्रोडक्शन फ्रॉम बायोमास इन सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट रिसायकलिंग आहे. त्यांनी सोलापूरच्या झोनमध्ये असलेल्या कचरा साठवण केंद्रात भेट देऊन त्याची माहिती घेऊन विडी मधून राहिलेले तेंदू पत्ते आणि ज्वारी चे उरलेले धोंडेवर ते रिसर्च करत आहेत. त्या ए. जी. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. त्यांना अनेक विविध महिला संघटनांकडून आतापर्यंत स्त्री शक्ती, उत्कृष्ट मल्टी टास्कर, बेस्ट सारखे अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आले आहेत. आत्तापर्यंत त्यांचे २४ पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय पेपर पब्लिकेशन झाले असून त्यांना दोन वेळा राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट पेपर प्रेझेंटेशन चा अवॉर्ड मिळाला आहे. सहा इंटरनॅशनल कॉन्फरन्स सुद्धा अटेंड केलेले आहेत. महिलांसाठी आयुष्यातील अनेक संधी व करियर बद्दल मार्गदर्शन सुद्धा केले आहेत.



### श्री हिंगुलांबिका देवी प्रकट दिनानिमित्त आज शोभायात्रा

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

५१ शक्तीपीठातील प्रथम शक्तीपीठ म्हणून इतिहासात नोंद असलेल्या भावसार समाजाची कुलस्वामीनी श्री हिंगुलांबिका देवी मातेच्या गुरूवार दि.२७ मार्च रोजीच्या प्रकट दिनाप्रित्यर्थ शोभा यात्रा काढण्यात येणार आहे, अशी माहिती ट्रस्टी अध्यक्ष राजकुमार हंचाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. गुरूवारी पहाटे ५ वाजता श्री हिंगुलांबिका मातेच्या मुर्तीस २१ ते ५१ फळांचा अमृतरसाने महा अभिषेक हा अमित देवळे, मुंबई यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. महाभिषेकानंतर श्री देवीस वस्त्र, सुवर्णालंकार अर्पण करून मंत्रोपचारानंतर महाआरती करण्यात येणार आहे. सायंकाळी ४ वाजता शिवस्मारक, सोलापूर येथून शोभायात्रा निघणार आहे. ही शोभा यात्रा मान्यवरांच्या हस्ते पूजनाने मार्गस्थ होणार आहे. शिवस्मारक, पारस इस्टेट, नवी पेठ, राजवाडे चौक, दत्त चौक, सोन्या मारूती, माणिक चौक, समाचार चौक, भावसार रोडवरून गुरूवार पेठ, संयुक्त चौक मार्गे मंदिरात महाआरती होणार आहे. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून विसर्जन होणार आहे.या पत्रकार परिषदेस श्रीकांत अंबुरे, जगदीश दंतकाळे, विजय पुकाळे आदी उपस्थित होते.





### थकबाकी वसुलीबद्दल महावितरणच्या सुनिल काळे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

महावितरणचा कणा मानल्या जाणाऱ्या मार्च २०२५ मधील थकबाकी वसुलीमध्ये शाखा कार्यालय औद्योगिक वसाहतचे वरिष्ठ तंत्रज्ञ सुनिल काळे यांनी घरगुती, वाणिज्य व औद्योगिक ग्राहकांची शंभर रुपये वरील यादी निरंक केल्याबद्दल महावितरण सोलापूर शहर ई उपविभाग अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे यांनी पुष्पगुच्छ व सुरक्षा साधने देऊन अभिनंदन केले. यावेळी औद्योगिक वसाहत कार्यालयाचे शाखा अधिकारी अजय चव्हाण, धुळाप्पा टेळे, प्रदीप मुलादे, निलकंठ कांबळे, अनिलकुमार बनसोडे, नितीन कोळी, अपेक्षा बहादुरे, हिना बागवान उपस्थित होते. थकबाकी यादी निरंक करण्याम ध्ये महावितरण सोलापूर शहर विभाग कार्यकारी अभियंता आशिष मेहता, सोलापूर शहर ई उपविभाग अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, औद्योगिक वसाहत कार्यालय शाखा अभियंता अजय चव्हाण, महावितरण सोलापूर शहर ई उपविभाग मधील बिलिंग विभाग कर्मचारी वर्ग, विशेष आभार सतिश बिराजदार व दिनेश जक्का, महावितरण वीज ग्राहक, मीटर रीडर, शुभचिंतक, हितचिंतक, सहकारी मित्र, सर्व कॅश काउंटर कर्मचारी वर्गांनी सहकार्य केले आहे.

# एसटी महामंडळाच्या नियमात कराल कसुरी तर होईल कारवाई



### चालक वाहकांना खाकी गणवेश गरजेचा अन्यथा सोसावा लागणार दंड

**गणवेश व नेमप्लेट नसल्यास दंडात्मक कारवाई**

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना गणवेश दिले जातात. सर्व चालक-वाहकांना गणवेशातच येण्याच्या सूचना केल्या आहेत. शिवाय कर्मचाऱ्यांना नेमप्लेट लावण्यासंदर्भात सूचना केल्या आहेत. नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे. नियम तोडल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**-अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग.**

**एसटी चालक वाहक ओळखण्यासाठी गणवेश गरजेचा**

एसटी महामंडळाचे कर्मचारी असल्याची ओळख त्यांच्या गणवेशावरून होते. त्याचबरोबर खाकी पॅन्ट शर्ट, नेमप्लेट, बिल्ला ही चालक वाहकांची ओळख आहे. त्यामुळे सेवेवर रूजू होण्यापूर्वी कर्मचाऱ्यांनी हा गणवेश परिधान करूनच सेवा बजवावी, असे आदेश एसटी महामंडळाचे आहेत. अनेक चालक-वाहक गणवेशाची अंमलबजावणी करताना दिसतात. मात्र काही कर्मचारी गणवेशाकडे कानाडोळा करतात.

**- प्रदीप काळे, प्रवासी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ मार्च-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) चालक-वाहकांसाठी गणवेश, नेम प्लेट व बॅच-बिल्ला बंधनकारक केला आहे. मात्र, याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे चालक आणि वाहक कोण, हे कळणे प्रवाशांनाही कठीण जाते. परंतु, तपासणी दरम्यान कर्मचारी गणवेशविना आढळले तर त्यांच्यावर दंडाची कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान, एसटी महामंडळाच्या चालक व वाहकांनी कर्तव्यावर असताना मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार गणवेश धारण करूनच कामगिरी करणे आवश्यक आहे. परंतु, काही कर्मचारी कामगिरीवर असताना देखील मोटारवाहन कायद्यातील तरतुदीप्रमाणे विहीत गणवेश परिधान करून कामगिरी न करता अन्य कोणत्याही प्रकारची वेशभूषा परिधान करून कामगिरी करतात. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाने कर्मचाऱ्यांना गणवेश घालणे बंधनकारक केले आहे. तसे न केल्यास संबंधित चालक वाहकांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. असा इशारा देखील यावेळी वरिष्ठ कार्यालयाकडून देण्यात आला आहे.

# कुटुंब निवृत्ती वेतन प्रस्तावाचा जि.प.ला पडला विसर

### मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी आमरण उपोषणाचा घेतला निर्णय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

२०१४ सालात मयत झालेले २ शिक्षक आणि २०२१-२२ मध्ये मयत झालेले ३ शिक्षक असे एकूण ५ शिक्षकांचे कुटुंब निवृत्ती वेतन प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्रलंबित आहेत. शिक्षण आणि अर्थ विभाग फक्त टोलवाटोलवी करण्यापलीकडे काहीच करत नाही असा आरोप संबंधित मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी केला आहे.मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी मिळणारी वागणूक , जिल्हा परिषदेची अनास्था हा चर्चे चा विषय बनला आहे.

कै. हरी गोपीनाथ काळे हे जिल्हा परिषद सोलापूर मध्ये उपशिक्षक म्हणून कार्यरत होते. म ागील तीन वर्षांपूर्वी त्यांचे अकाली निधन झाले. त्यांच्या पश्चात सर्व कुटुंबाची जबाबदारी माझ्यावर आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने आम्ही पूर्णपणे रस्त्यावर आलो आहोत. रोजच्या उदरनिर्वाहासाठी अडचण निर्माण झाली आहे. अशा स्थितीत आपल्याकडे माझ्या कुटुंब निवृत्ती वेतनाचा प्रस्ताव एक - दोन वर्षे झाली प्रलंबित आहेत. सातत्याने पाठपुरावा करून सुद्धा प्रस्ताव मंजूर होत नाही. नवनवीन त्रुटी लावल्या जातात. नाईलाजाने मी माझ्या लहान मुलांना घेऊन १ एप्रिल पासून जिल्हा परिषद सोलापूर येथे आमरण उपोषणाला बसणार आहे. माझ्या आंदोलनाने काही बरे वाईट झाले तर सर्व जबाबदारी आपली राहील, अशा आशयाचे निवेदन सुप्रिया काळे यांनी दिले आहे.



# ज्ञान प्रबोधिनीच्या प्रकल्पातून महिलांनी केली चक्क एक कोटीची उलाढाल

### गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप केले

### विडी काम सोडून ४५ महिला रमल्या शिवणकामात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

ज्ञान प्रबोधिनीच्या महिला सक्षम ीकरण उपक्रमातील पिशवी निर्मिती प्रकल्पात यंदा ४५ महिलांनी विडी काम सोडून पिशवी शिवण्याचे काम स्वीकारले अन चक्क एक कोटी रूपयांची उलाढाल केली. यातील प्रशिक्षित ३० महिलांचे एकत्रीकरण व त्यातील पाच अत्यंत गरजू म हिलांना नुकतेच शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम मंगळवारी दि. २५ मार्च रोजी प्रिसिजन कॅम्पशाफ्टच्या संचालिका डॉ. सुहासिनी शहा व माधवराव देशपांडे, ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीशराव बापट यांच्या हस्ते झाला. सन २०२४-२५ मध्ये ज्ञान प्रबोधिनीने सामाजिक उद्योजकता अंतर्गत 'विडी कामगार महिलांना तंबाखू पासून होणाऱ्ा त्रास' या प्रश्नावर उत्तर शोधत या महिलांना आरोग्यदायी व आत्मसन्मानजनक व्यवसाय उपलब्ध करून दिला. संस्थेने पिशवी निर्मिती प्रकल्प व प्रबोधन वूमन्स इम्पॉवरमेंट ही फर्म सुरू केली. प्रशिक्षणातून सक्षमता अंतर्गत प्रिसिजन कॅम्पशाफ्ट लिमि टेड सोलापूरतर्फे १ एप्रिल २०२४ पासून शिलाई प्रशिक्षण सुरू झाले. वर्षभरात दोन महिन्याच्या एकूण ५ तुकड्या झाल्या. प्रत्येक तुकडीत ५ महिला सहभागी होत्या. सुजाता मडूर यांच्या मार्गदर्शनाने विविध प्रकारच्या पिशव्या, छोट्यांचे व मोठ्यांचे कपडे, ब्लाउज, परकर इत्यादी शिवण्याचे कौशल्य अवगत केले. वर्षभरात ३० महिला या प्रशिक्षणाने सक्षम झाल्या. त्यातील महिला स्वतः ऑर्डर मिळवून तसेच पिशव्या शिवून चांगल्या प्रकारे कमवत आहेत. प्रिसिजन कॅम्पशाफ्टचे सहकार्य मोलाचे ठरले. सहकार्यवाह डॉ.अमोल गांगजी यांनी सूत्रसंचालन केले.

# श्री विष्णू महादेव यात्रा समिती अध्यक्षपदी शाहीर गायकवाड

### सचिवपदी ज्ञानेश्वर माळी







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा व अखंड हरिनाम सप्ताहासाठी एक समिती गठण करण्यात आली असून, या समिती अध्यक्षपदी शाहीर गायकवाड, उपाध्यक्षपदी इंद्रजित घोटकर, सचिवपदी ज्ञानेश्वर माळी, तर सहसचिवपदी सुधाकर लोंढे यांची निवड करण्यात आली.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात ग्रामस्थांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यामध्ये प्रथमतः मागील वर्षीचा जमा खर्चाचा तपशील सुधाकर लोंढे यांनी वाचून दाखवला व पुढे कळसारोहणासाठी येणारा अंदाजे खर्च तपशील सांगितला. यानंतर विविध विषयांवर चर्चा करुन सर्वानुमते अखंड हरीनाम सप्ताह व ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा समिती करण्यात आली. या समितीच्या इतर कार्यकारिणीमध्ये सदस्यपदी शिवदास पाटील, सर्जेराव गायकवाड, सचिन शिंदे, ओम जगताप, नागनाथ मसुते, नामदेव पाटील, विठ्ठल घोटकर, सुधीर पाटील, कृष्णा घोटकर, सुधीर गायकवाड, राम कांबळे, रवी पाटील, सिताराम भाकरे, स्वप्निल पाटील, कृष्णा शिंदे, ज्ञानेश्वर जगताप, प्रशांत राऊत, संभाजी माळी यांच्याही निवडी जाहीर केल्या.

यानंतर सर्व ग्रामस्थांनी मिळून अखंड हरीनाम सप्ताह व ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा मोठ्या उत्साहात पार पाडावी, असे सांगून सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. या बैठकीस जेष्ठ नागरिक बलभीम गायकवाड, भास्कर पाटील, गंगाधर घोटकर, मुकुंद गायकवाड, नागनाथ पाटील, सुनील पाटील, गोरख माळी, प्रभाकर गायकवाड, हणमंत गवळी, सतीश माळी, तानाजी घोटकर, उत्तम माळी, नागनाथ शिंदे, संतोष घोटकर, श्रीकांत गायकवाड, शुभम पाटील, गोपाळ गायकवाड, अरुण म्हेत्रे, महादेव गुंड, भुजंग करंडे, महादेव मसुते, विजय फंड, साहेबराव घोटकर, सुनील नवगिरे, संतोष पाटील, नागेश घोटकर, निरंजन करंडे, शंभु पाटील, आकाश पाटील, आकाश कोष्टी, समाधान गायकवाड, अनंत घोटकर आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कस्तुरबा नगरातील प्लास्टिक कारखान्यास भीषण आग

### कोणतीही जीवितहानी नाही

### तीन तासानंतर आग आटोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च -**

सोलापूर : मजरेवाडी परिसरातील शांतीनगर भागातील कस्तुरबा नगर येथील प्लास्टिकच्या एका कारखान्यास मंगळवारी मध्यरात्री भीषण आग लागली. या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. तब्बल तीन तासानंतर महापालिका अग्निशामक दलाने ही आग आटोक्यात आणली.

मजरेवाडी परिसरातील कस्तुरबा नगर येथील अनस ट्रेडर्स या प्लास्टिकच्या कारखान्यास मंगळवारी रात्री ११:४५ च्या सुमारास भीषण आग लागली. कारखान्याच्या सर्वच बाजूने आग भडकत होती. आगीची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशाम क दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी सहाय्यक अधीक्षक अच्युत दुधाळ यांच्यासह पथकाने युद्ध पातळीवर आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. तब्बल तीन तासानंतर अग्निशामक दलाच्या पाच गाड्यांनी ही आग आटोक्यात आणली. या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. कारखान्यातील स्क्रॅप, प्लास्टिक आणि इतर साहित्य जळून खाक झाले. आगीचे कारण समजू शकले नाही. भीषण आग लागल्याने परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पोलीस पथकही दाखल झाले होते.

# २० मे रोजी सामुदायिक विवाह सोहळा

**सोलापूर :** शिव-बसव डॉ. बी. आर. आंबेडकर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे दि. २० मे रोजी अक्कलकोट येथे सामुदायिक विवाह सोहळा आयोजिल्याची माहिती संस्थापक संदीप मडीखांबे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सात वर्षापासून संस्थेतर्फे हा सोहळा आयोजिला जातो. आतापर्यंत १२९ जोडप्यांचा विवाह झाला. याअंतर्गतच प्रथम करण्यात आल्यास संस्थेकडून मुलीच्या नावे वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत तीन हजार रुपये फिक्स डिपॉझिट ठेवण्यात येणार आहे. तसेच एक वर्षाचा तीन लाख रुपयांचा अपघात विमा उतरवण्यात येणार आहे. इच्छुकांनी नोंदणीसाठी संदीप मडीखांबे ९८५०७८६५८, विकास गायकवाड ९०२१३३०५ ५२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस विकास गायकवाड, महेश नडगम, बंटी नडगम, महादेव थोरे उपस्थित होते.




**डिझायनर ब्रायडल शालू आणि घागरा खरेदी करण्यासाठी**

# व्हि.आर. पवार शोरूममध्ये महिलांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**



घरातील प्रत्येक व्यक्तीला चैतन्याचा स्पर्श करणारा हा लग्न सोहळा आणि याची खरेदी महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या साडी शोरूम मध्येच व्हायला पाहिजे असा वधूचा आग्रह असल्याचे मत व्हि. आर. पवार सारीजचे प्रमुख व्यवस्थापक राजेश पवार यांनी सांगितले.

चाटी गल्ली येथील व्ही आर पवार सारीज शोरूम मध्ये ब्रायडल शालू आणि घागरा तसेच लग्नबस्ता खरेदी करण्याकरिता महिला मोठ्या प्रमाणात गर्दी करताना दिसत आहेत यात प्रामुख्याने सोलापूर सह लातूर उस्मानाबाद आणि बीड येथील देखील ग्राहक खरेदीला येताना दिसत आहेत.

महिला आपली आवडती साडी निवडण्याकरिता उत्साही असतात त्यामुळे हा स्वभाव ओळखून व्हि. आर. पवार यांच्याकडे साड्यांच रेंज अगदी मोठ्या प्रम ाणात असल्याचे दिसून येते. यात प्रामुख्याने डिझायनर ब्रायडल शालू, डिझायनर वर्क सारीज, डिझायनर लाचा, ब्रँडेड सिंथेटिक साड्या, डिझायनर ब्रायडलकंची अँड पैठणी, चोळखण साडी व इरकली अशा विविध उत्कृष्ट दर्जाच्या साड्या पहावयास मिळतात. लग्न बस्ता खरेदी करताना येथे सुटिंग - शर्टींग देखील उपलब्ध आहे. तसेच फॅन्सी ड्रेस मटेरियल जसे लिनन, कॅज्युअल ड्रेस, पार्टीवेअर, टॉप, लेगिन, स्ट्रेट पँट, प्लाजो सेट, रेडी वेअर ड्रेस, स्ट्रेट लाँग आणि वन पीस देखील व्हि. आर. पवार मध्ये उपलब्ध आहेत. खरेदीसाठी येताना महिलांनी सकाळी ११ ते ७ पर्यंत यावेत जेणेकरून आपल्याला मनापासून साड्या अगदी मनसोक्त बघता येईल. आणि खरेदी करता येईल असे आवाहन अमर पवार, महेश पवार आणि गिरीश पवार यांनी केले आहे.

महावितरण - २६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : बेलाटी येथे श्रीसंत बाळुमामा व सत्यव्वा देवी मंदीर ट्रस्ट कार्यालयात मुर्ती उभारण्यात येणार आहे. मुर्तीकाम अंतिम टप्प्यात असून मूर्तीकार प्रकाश माने शेवटचा हात फिरवताना.

(छायाचित्र - केवल तिवारी)



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### संत हरळय्या जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी सचिन मग्रुमखाने

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

श्री संत हरळय्या महाराज जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी सचिन मग्रुमखाने यांची निवड करण्यात आली आहे. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष सिद्राम भुतनाळे, बंधू कबाडे. खजिनदार महेश मग्रुमखाने, सचिव रजाक भुतनाळे. सहसचिव ज्योतिबा मस्के. पूजा प्रमुख सुभाष मग्रुमखाने, श्रीकांत सनके, महाप्रसाद वाटप प्रमुख काशिनाथ मग्रुमखाने, शांतेश मग्रुमखाने. सल्लागार इरेश मब्रुमखाने, परशुराम मब्रुखाने, परशुराम कांबळे, रजाक मब्रुमखाने, रजाक सातपुते, मल्लिकार्जुन मग्रुमखाने, चंद्रकांत मग्रुमखाने, गणेश कबाडे, अर्जुन कंजारे, पांडुरंग मग्रुमखाने, मल्लेशी भुतनाळे यांची निवड करण्यात आली.



### मिळकतीबाबत भूमापन कार्यालयात उद्या कार्यशाळा

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

शासनाने ठरवून दिलेल्या १०० दिवसांतील उपक्रमांतर्गत सोलापूर शहर नगर भूमापन अधिकारी, सोलापूर यांचेकडील हद्दीतील मिळकतींकरीता शंका समाधान व माहिती देणे हा कार्यक्रम दि.२८ मार्च रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ६च्या दरम्यान नगर भूमापन कार्यालयामध्ये राबविण्यात येणार आहे. या करीता लष्कर, निमलष्कर, सी.आर.पी.एफ, पोलीस व होमगार्ड इत्यादी सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे शंका समाधान व माहिती देणे हा उपक्रमक राबविण्यात येणार असल्याची माहिती भूमापन अधिकारी गजानन पोळ यांनी दिली आहे. शहर भूमापन हद्दीतील उपरोक्त विभागातील संबंधीतांनी कार्यालयामध्ये येवून सदर उपक्रमाचा लाभ घेण्यात यावा. यावेळी येत असताना संबंधीतांनी आपले ओळखपत्र सोबत आणावे व या उपक्रमांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे वैयक्तीक व स्वत:चे मिळकतीच्या माहितीबाबत स्वत: उपस्थित रहावे, असे आवाहन पोळ यांनी केले आहे.

### मैत्रिणीस का बोलतो म्हणत केली कोयत्याने मारहाण

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

रेल्वे स्टेशन येथील गँगमन ऑफिससमोर माझ्या मैत्रिणीस का बोलतो असे म्हणत जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने मारहाण केल्याची घटना (दि.२५) सकाळी साडेदहा ते साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी सुरेखा रंगसिद्ध राऊतराव (वय-४५,रा. फॉरेस्ट,रेल्वे लाईन) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून शंकर वाडकर (रा. बाळे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादी यांचा मुलास त्याचा मित्र संशयित आरोपी शंकर वाडकर याने बोलावून घेतले.संशयित आरोपीने त्याची मैत्रीनिशी का बोलतो यावरून त्याच्याकडे असलेल्या कोयत्याने जीवे ठार मारण्याचे उद्देशाने फिर्यादी सुरेखा राऊतराव यांचा मुलगा आकाश याच्या डोक्यावर,मानेवर,खांद्यावर,हातावर व पाठीवर वार करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळविली

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

होटगी रोड येथील सावरकर हॉस्पिटल येथून चोरट्याने दुचाकी (क्रमांक एम एच १३ ई जे ३०५३) चोरून नेली. याप्रकरणी महेश नवनाथ कांबळे (वय ३५, रा. मु. पो. वडाळा, ता. उत्तर सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना (दि.२२) फेब्रुवारीला घडली.

### नेहरु युवा केंद्रात शहिद दिन साजरा

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

नेहरु युवा केंद्र संचलित व्यसनमुक्ती केंद्रात शहिद दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून नौदल अधिकारी सूर्यकांत पुजारी व अरूण कुलकर्णी उपस्थित होते. केंद्राचे प्रकल्प संचालक अनिल हिंगे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविक केले. व्यसनमुक्ती केंद्रातील दिंगबर रणसुभे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास केंद्राचे सल्लागार बापू वारे यांनी आभार मानले. मधुकर चव्हाण, सुनिल पाटील, संतोषी जाधव, बाजीराव गाठाळ, अमोल गायकवाड उपस्थित होते.

# पंचकट्टा ते राणी लक्ष्मीबाई मार्केट रस्ता अतिक्रमणाच्या विळख्यात

### महापालिका आयुक्त डॉ. ओंबासे लक्ष देणार का?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ मार्च**

सोलापूर स्मार्ट सिटीच्या स्मार्ट रस्त्यांवर वाढलेले अतिक्रमण शहरवासीयांना डोकेदुखी ठरत आहे. अशातच कहर म्हणून की,काय शहरातील बेशिस्त वाहतुकीमुळे अपघाताचा सिलसिला प्रमाणाबाहेर जात आहे. याकडे महापालिका आणि पोलीस प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज निर्माण झालेली आहे. शहरातील प्रमुख रस्त्यापैकी एक असणारा पंचकट्टा ते लक्ष्मीबाई मार्केट रस्ता वाढलेल्या अतिक्रमणाच्या विळख्यात पार अडकून पडला आहे. शहरातील वाहनधारकांना तारेवरची कसरत करत ये-जा करावी लागत आहे. याची महापालिका आणि वाहतूक शाखेच्या पोलिसांनी गांभीर्याने दखल घेणे गरजेचे बनले आहे.

सोलापूर शहरातील महत्वाच्या बाजारपेठातील एक बाजारपेठ असणारी राणी लक्ष्मीबाई मार्केट रस्ता आणि मार्केट परिसर अतिक्रमणग्रस्त होत आहे. पंचकट्टा ते राणी लक्ष्मीबाई मार्केट रस्ता येथे विक्रेत्यांचे अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. रस्त्याच्या एका बाजूला माठ आणि इतर विक्रेत्यांनी आपला पसारा प्रमुख रस्त्यावरचं मांडलेला आहे. तर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला भांगार दुकानदारांनी रस्त्यावर कब्जा करत आपला व्यापार सुरू ठेवला आहे. दिवसभर येथे वाहनधारकांना




वाहतुकी कोंडीचा वारंवार सामना करावा लागत आहे. भंगार बाजारात ट्रक आणि टेम्पोची जडवाहतूक वाढत आहे. रस्त्यांवर मोठ-मोठी वाहने उभी करून साहित्याची खरेदी विक्री केली जाते. पंचकट्टा परिसरात थाटण्यात आलेल्या अवैध अतिक्रमणावर महापालिका प्रशासनाच्या अतिक्रमण प्रतिबंधात्मक विभागाच्या कारवाईची गरज आहे. त्यामुळेच महापालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओंबासे हे याकडे लक्ष देणार का? असा सवाल आता सर्व सामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, लोखंड-प्लास्टिक भंगार दुकाने, माठ विक्रेत्यांची दुकाने, दुचाकी गॅरेज आणि इतर किरकोळ भाजी व फळ विक्रेते या रस्त्यावर ठाण मांडून बसलेले आढळून येतात. ज्या प्रमाणे अनाधिकृत बांधकामावर हातोडा फिरवण्याचा निर्वाणीचा ईशारा आयुक्तांनी दिला आहे. अगदी त्याचप्रमाणे शहरातील विविध भागातील रस्त्यांवर वाढत असलेल्या अतिक्रमणावर देखील हातोडा फिरवण्याची गरज निर्माण झालेली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात नेहमी वाहतुकीचे तीन तेरा वाजलेले दिसतात. त्यासाठी वाढलेले अतिक्रमण कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे अवैधरित्या वाढत असलेले अतिक्रमण थोपविण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधी महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे कोणती भूमिका घेतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### येथे सुद्धा प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

शहराच्या अनेक भागात अतिक्रमणाचा फास वाढ आहे. ७० फूट रोड भाजी मार्केट, मधला मारुती, टिळक चौक, नवीपेठ, चाटी गल्ली, येथे देखील अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत आहे. सोलापूर शहरातून तसेच आसपासच्या गावातून ग्राहक मोठ्या प्रमाणात खरेदीसाठी बाजारपेठेत येतात. तेव्हा वाढलेले हातगाडे, खोके, फेरीवाले यांची रस्त्यावर वाढलेली संख्या वाहनधारकांसाठी तापदायक ठरते. मार्केट तसेच गजबजलेल्या भागात रिक्षा, दुचाकी, टेम्पो, कार, अशा विविध वाहनांसाठी रस्ताच उपलब्ध नसल्याने रस्त्यांवर तासंतास कोंडी निर्माण होते. याकडे देखील प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. दुकानदार तसेच किरकोळ विक्रेते खोक्याधारक यांचे देखील रस्त्याच्या बाजूला विविध साहित्यांचे अतिक्रमण वाढत आहे. यावर देखील कारवाई करणे गरजेचे आणि क्रमप्राप्त ठरत आहे.

### अतिक्रमणावर कारवाईची आवश्यकता

सध्या उन्हाळ्याचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना माठ विक्रेत्यांची आठवण येत आहे. थंडगार पाण्यासाठी नवीन माठ खरेदी करण्यासाठी ग्राहकांची येथे मोठी गर्दी होत आहे. आपली वाहने रस्त्यांच्या दुतर्फा उभी करून ग्राहक माठ तसेच भाजीपाला अशा विविध वस्तूंची खरेदी करताना दिसून येतात. अशावेळी वाहतूक कोंडीच्या समस्या वाढतात. शहरातील प्रमुख मार्ग अतिक्रमणाच्या विळख्यात अडकत असल्याने वाहतुकीचे नियोजन ही कोलमडते. या समस्यकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

### नव्या आयुक्तांचे योग्य निर्णय



सोलापूर शहरातील वाढत असलेले अतिक्रमण जुनेच दुखणे आहे. महापालिका प्रशासनातील अधिकारी याकडे डोळे झाक करतात. झोन कार्यालयाने व अतिक्रमण प्रतिबंधात्मक विभागाने कारवाई करणे गरजेचे आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. आता आलेले नवीन आयुक्त डॉ सचिन ओंबासे यांनी विजापूर रोडची पाहणी केली. त्याच पद्धतीने शहरातील इतर रस्त्यांची देखील पाहणी करून शहरात वाढत असलेल्या अतिक्रमणावर प्रतिबंधात्मक उपाय योजना करावी.

**- नागनाथ शिवसिंगवाले, माजी परिवहन समिती सदस्य**

# दिलीप माने, बाळासाहेब शेळके, अविनाश मार्तंडे, सिद्धाराम हेले यांचे अर्ज दाखल



### कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक

### तिसऱ्या दिवशी १९४ अर्जांची विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीसाठी तिसऱ्या दिवशी ९९४ तर आतापर्यंत एकूण ४४४ अर्जांची विक्री झाली आहे. माजी आ. दिलीप माने, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, माजी संचालक अविनाश मार्तंडे, भाजपाचे सिद्धाराम हेले यांच्यासह मातब्बरांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

सहकारी संस्था सर्वसाधारणमध्ये राजेंद्र सुपाते (चार अर्ज), बाळासाहेब पाटील, केदारलिंग विभुते, बाबुराव विभुते, गणपत बचुटे, शिवाजी तोडकरी, धनेश आचलारे, गरीष पाटील, भीमशा पाटील, बाळासाहेब शेळके, अविनाश मार्तंडे, हणमंत पाटील, माजी आ. दिलीप माने, पृथ्वीराज माने, संतोष पवार, बाळासाहेब शेळके, सहकारी संस्था महिला राखीवमध्ये अनिता विभुते, ज्योती मार्तंडे, सहकारी संस्था इतर मागासवर्ग धनेश आचलारे, अविनाश मार्तंडे, श्रीशैल पाटील, सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती गटासाठी बाळासाहेब पाटील, अणप्पा सतुबर, ग्रामपंचायत सर्वसाधारणसाठी शिवानंद आंदोडगी, अनिता विभुते, श्रीशैल भुसणगी, इंद्रजित लांडगे, बाबुराव विभुते, महेश पाटील, केदारलिंग विभुते, धनेश आचलारे, सिद्धाराम हेले, ग्रामपंचायत अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती निरंक, ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटकासाठी सिद्धाराम हेले, व्यापारी प्रतिनिधीसाठी










अमोल बिराजदार (दोन अर्ज), श्रीशैल अंबारे (दोन अर्ज), सोमनाथ रगबले, मल्लिकार्जुन रमणशेट्टी (दोन अर्ज), म. कलीम बागवान-तुळजापुरे, सोमनाथ रगबले, हमाल-तोलार प्रतिनिधीसाठी दीपक गदगे (दोन अर्ज), सिद्धाराम रामशेट्टी, विठ्ठल पुजारी, शिवानंद पुजारी हे बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

### बाजार समितीवर पुन्हा कमळ फुलवणार

सोलापूर बाजार समितीवर कमळ फुलवण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी तयारी सुरू केली आहे. यासाठी पोषक वातावरण तयार करून प्रसंगी राजकीय खेळी खेळत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती दुसऱ्यांदा ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न भाजप करत आहे. यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. सुभाष देशमुख यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कामाला लागले आहेत.

# निवडणूक बाजार समितीची; रणनीती अक्कलकोटची..

### आ. कल्याणशेट्टी यांच्या निवासस्थानी खलबते

### विरोधी गटातील मातबरांची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रियेला मंगळवारपासून सुरुवात झाली. सुरुवातीपासूनच वेगवेगळे राजकीय समीकरणे पुढे येत आहेत. अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या निवासस्थानी याबाबत खलबते झाले. याला विरोधी गटासह विरोधी विविध पक्षांतील मातब्बर नेते उपस्थित असल्याने सगळ्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूरसाठी असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर आतापर्यंत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. गेल्या पंचवार्षिकमध्ये मोठे जुगाड करून भाजपचे आ. विजयकुमार देशमुख हे चेअरमन पदावर राहिले. त्यावेळी निवडणुकीतही अशाच पद्धतीने रणनीती आखण्यात आली होती. विशेष म्हणजे गत पंचवार्षिकमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा हक्क असतानाही आणि सहकार मंत्री असताना आ. सुभाष देशमुख यांच्या गटाचा पराभव झाला होता. त्यावेळी रामाप्पा चिवडशेट्टी व आप्पासाहेब पाटील हे दोनच तत्कालीन सहकार मंत्री सुभाष देशमुख गटाचे संचालक विजयी झाले होते. यंदा तीच रणनीती भाजप आखात आहे. गत पंचवार्षिकमध्ये ही रणनीती आखण्याची जबाबदारी आ. विजयकुमार देशमुख यांच्याकडे होती. त्यांनी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांना गळाला लावून आपले मनसुबे पूर्ण केले होते. यंदा मात्र भाजपने आपला पॅटर्न, रणनीती बदलत ही जबाबदारी अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर सोपवली आहे. सुरुवातीपासूनच रणनीती आखण्यास सुरुवात झाली आहे. त्यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला सर्वाधिक सोसायटी असलेले आणि बाजार समितीचे माजी उपसभापती सुरेश हसापुरे, शरद पवार राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष बळीरामकाका साठे, माजी संचालक आप्पासाहेब पाटील, माजी उपसभापती श्रीशैल नरोळे, माजी सभापती राजशेखर शिवदारे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके यांच्यासह विरोधी गट आणि विरोधी विविध पक्षांचे मातब्बर नेते उपस्थित होते. या बैठकीमध्ये माजी आमदार दिलीप माने यांच्या विरोधात पॅनल उभा करून त्यांच्याकडे सर्वाधिक मतदार असणाऱ्या नेत्यांना आपल्याकडे खेचून आणण्यासाठी रणनीती आखण्यात आली.

# जिल्हा दूध संघावरील प्रशासक हटणार?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

सोलापूर जिल्हा दूध संघाच्या गैरकारभारामुळे तक्रारीनुसार प्रशासक मंडळ नेमण्यात आले. दरम्यान संचालक शंभूराजे मोरे यांनी मुंबई येथील सहनिबंधक शहाजी पाटील यांच्याकडे अपील दाखल केले होते. यावर सोमवारी सुनावणी झाली. त्या सुनावणीदरम्यान पाटील यांनी संचालक मंडळाच्या बरखास्तीच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली. यावर पुढील सुनावणी ७ एप्रिल रोजी होणार आहे. आता या निकालाकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा दूध संघाच्या संचालक मंडळ बरखास्तीच्या निर्णयाला मुंबई येथील सहनिबंधकांनी स्थगिती दिली आहे. ५ मार्च रोजी पुणे येथील उपनिबंकांनी संघाच्या गैरकारभाराला जबाबदार धरून रणजीतसिंह शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील संचालक मंडळ बरखास्त केले होते. त्यानंतर संघावर प्रशासक म्हणून विशेष लेखा परीक्षक श्रीनिवास पांढरे यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय

### संचालक मंडळाबाबत ७ एप्रिलला सुनावणी

### मुंबईच्या सहनिबंधकाकडे दाखल होते अपील

प्रशासक मंडळ स्थापन केले होते. मात्र सहनिबंधकांनी कारवाईला स्थगिती दिल्यामुळे संघाचा ताबा परत एकदा सत्ताधाऱ्यांकडे येणार असल्याच्या अशा पल्लवित झाल्या आहेत. पुणे विभागाचे उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी पी. आर. शिंदे समितीच्या अहवालावरून दूध संघाचे



विद्यमान संचालक मंडळ बरखास्त केले होते. जिल्हा दूध संघ बचाव समितीने संघाच्या गैरकारभाराबाबत पुराव्याशी उपनिबंधक कार्यालयाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर विशेष लेखा परीक्षक पी. आर. शिंदे यांची समिती नेमण्यात आली. त्यानंतर संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक मंडळ नेमण्यात आले. या निर्णयाला संचालक शंभूराजे मोरे यांनी आक्षेप घेतला होता. जिल्हा दूध संघाच्या अवस्थेला जबाबदार धरून कलम ८८ अन्वये चौकशी सुरू करण्यात आली होती. निवृत्त सहनिबंध गणपत कदम यांच्यामार्फत ही चौकशी सुरू करण्यात आली होती. मात्र या चौकशीला सहनिबंधक शहाजी पाटील यांनी गेल्या वर्षी स्थगिती दिली होती. ही चौकशी शहाजी पाटील यांनी रद्द केले आहे. विशेष म्हणजे चौकशी रद्द करण्याचा निर्णय त्यांनी संबंधितांना कळवला नाही. विधानसभेत आमदार अभिजीत पाटील यांनी हा प्रश्न विचारताच त्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

### संघावर ६० कोटींपेक्षा जास्त कर्ज

सोलापूरच्या जिल्हा दूध संघावर सध्या ६० कोटींपेक्षा जास्त कर्ज असून पंधरा वर्षांपूर्वी या संघाकडे ४० कोटींच्या ठेवी होत्या. एकेकाळी प्रतिदिन साडेचार लाख लिटर दूध संकलित करणाऱ्या या संस्थेत सध्या फक्त आणि फक्त चार हजार लिटर दुधाचे संकलन होत आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांचे एक महिन्याचे दुधाचे बिल थकले आहे तर कामगारांच्या पगारही प्रलंबित आहेत. यामुळे दूध संघासमोरील अडचणी काही कमी होईनात हे सिद्ध होत आहे.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६८

**काय केला योगधर्म ।**
**नाही अंतरी निष्काम ।।**

ईश्वरभक्ती करणाऱ्यांपैकी अनेकांना ईश्वराची भेट व्हावी, त्याचा कृपाप्रसाद लाभावा असे वाटत असते. कोणी पूजापाठ, कोणी ध्यानधारणा, कोणी उपवास, तप, कोणी योग, कोणी नामजप तर कोणी अन्य काही मार्गाचा अवलंब करीत असतात. मार्ग वेगवेगळे असले तरीही ध्येय मात्र एकच असते. कोणत्याही मार्गावरून जात असतांना मन पवित्र व शुद्ध असले पाहिजे. बाह्यांगाने शुद्ध व पवित्र होणे ईश्वर मार्गात पुरेशे नाही. खरे म्हणजे पवित्रता व शुद्धत्व हे सर्व मार्गावर आवश्यक आहे. ईश्वराचे अस्तित्व सर्व जडजीवात, अणूरेणूत आहे.



ही बाब विचारात घेतल्यास शुद्धत्वाची आवश्यकता नाही असे काहीही शिल्लक राहत नाही. त्यामुळे ईश्वरप्राप्तीच्या मार्गावर जायचे म्हणजे जीवनात शुद्धत्वाला न्याय द्यावा लागेल. शुद्धत्व हा आनंदाचा आधारस्तंभ होय. ईश्वर हे आनंदाचे मूळस्वरूप असल्याने त्याला शुद्धत्वाशिवाय इतर कशाची गरज पडत नाही. ही बाब विचारात घेऊन भक्तिमार्गावर मार्गक्रमण करणाऱ्यांनी निष्काम झाले पाहिजे. वाट्याला आलेले कर्म नितीनियमाला धरून, फलेच्छारहित होऊन केली पाहिजेत. जे पेरले, तेच उगवणार असल्याप्रमाणे कर्म केल्यानंतर फलनिष्पत्ती ही होतच असते. मनात आशा, अपेक्षेचे थोंब असेल तर आत्मज्ञान प्राप्तीसाठीचा योगधर्मही उचितरित्या फलित होत नाही. या अनुषंगाने बोलतांना मुक्ताई,

**काय केला योगधर्म ।**
**नाही अंतरी निष्काम ।।**

असे म्हणतात. कामना ही योगमार्गात अडसर ठरू शकते. निरिच्छ भावनेने कर्म करणे अवघड नसते. निरीच्छ भाव, फल हेतुरहित कर्म हा तर गीतेचा सार आहे. हा सार अनेकजण त्यांच्या जीवनात अवलंबवत असतात. अनेक योगी श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या, आणि विषयांविखी । वैराग्याची निकी । पुरवणी मानसीं की । जिती आथी ।। या ओवीप्रमाणे वागतात. मनाने विषय त्यागलेले हे लोक वैराग्याचा आनंद सहजपणे घेतात. इंद्रियांना अधीन करणे अवघड असले तरीही प्रयत्नाने ते शक्य आहे. कोठेही धावणाऱ्या मनाला हळूहळू नियंत्रित करीत गेल्यास त्याचे स्थिरत्व वाढते. सुखदु:खाचे मूळ हे मनच होय. मनाने ठरवले तर ते दु:खातही सुख मानण्याची स्वभाववृत्ती निर्माण करू शकते. मनाचे स्थिरत्व हा सर्वच क्षेत्रातील यशाचा आधारस्तंभ असतो. मनाच्या स्थिर होण्यामुळे मिळणारे यश टिकावू व आनंददायी असते. मन स्थीर व सकारात्मक असेल तर जीवनातील चिंता, भय, ताणतणाव, रोग, अपयश हे बऱ्याच प्रमाणात कमी होतात. आपल्या मनात काय चालले आहे, हे आपणालाच कळू शकते. त्यामुळे अयोग्य किंवा व्यर्थ विचार सुरु होताच, त्याला तत्काळ थांबवायला हवे. थोडा वेळ म्हणत विचार चालू ठेवला तर त्या विषयाची गोडी वाढून, तो विषय मिळवावा वाटू लागतो. त्यामुळे अयोग्य विचाराला तत्काळ आवर घालणे योग्य असते.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. २७ मार्च २०२५
विक्रम संवत् २०८०-८१
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - फाल्गुन
कृ. त्रयोदशी (२३.०३)
ऋतु - वसंत
नक्षत्र - शततारका (२४.३३)
योग - साध्य (०९.२४)
करण - गर (१२.२७)

दिनविशेष - चांगला दिवस, शिवरात्री, मधुकृष्ण त्रयोदशी

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : मित्रांच्या सहकार्याने कामे पूर्ण होतील. सामाजिक कार्यांमुळे सुयश आणि सन्मान मिळू शकेल. उद्योगधंदा चांगला चालेल.वैवाहिक जीवनात भावनात्मक समस्या राहू शकतात.

**वृषभ** : कामकाजाची गती मध्यम राहील.लहान:मोठया अडचणींचा सामना करावा लागेल. थकित पैसे मिळण्यास अडथळे येतील. थकवा जाणवेल.पूजा:पाठात मन रमेल.

**मिथुन** : नवीन कामकाजांचे योग प्रबळ आहेत.कौटूंबिक समस्या राहू शकतात. आर्थिक परिस्थितीत सुधार होण्याची शक्यता आहे. व्यवसायात प्रगती होईल. प्रवास सुखात होईल.

**कर्क:** बुद्धि आणि मनोबलाने सुख:संपन्नतेची परिस्थिती बनेल.आळस सोडून द्या. कायदेशीर प्रकरणे सुधारतील. उद्योगधंदा फायदेशीर राहिल.

**सिंह** : काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली महत्वकांक्षा पूर्ण होईल.

**कन्या:** कौटूंबिक सुख आणि आर्थिक अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहिल.

**तुळ** : अगोदर केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसण्यास सुरूवात होईल. बुद्धीमत्तेवर अडचणींवर मात कराल. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांची मदत मिळेल.

**वृश्चिक:** व्यापाराच्या विस्तारासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. धैर्य व सहनशिलता ठेवा. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**धनु:** यश मिळाल्याने उत्साह वाढेल. श्रेष्ठ लोकांच्या भेटी होतील. नवीन योजनेमुळे फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मकर:** मानसिक तनावापासून सुटका मिळेल.उद्योगधंदा ठीक चालेल.योजनेनूसार कामे केल्यास लाभ होऊ शकेल. वैवाहिक जीवन आंनदी राहिल.

**कुंभ** : कौटुंबिक वातावरण उत्साहपूर्वक राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. आर्थिक योग चांगले आहेत. चांगल्या व्यक्तिंचा संबध येईल.

**मीन** : मुलांच्या कामा संदर्भात चांगली बातमी मिळेल. चैनीच्या वस्तु खरेदी करण्याचा योग आहे. प्रयत्नामुळे अडचणी दूर होतील. दुसऱ्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका.

# शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी महाविद्यालयातच मिळणार दाखले

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती

### पालकांची धावाधाव होणार कमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

दहावी व बारावीच्या परीक्षा आता संपल्या आहेत. या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेशाकरीता आवश्यक विविध प्रकारचे दाखले महाविद्यालय स्तरावरच दाखले वितरण करण्यात येणार आहेत. दरम्यान, यासाठी कॉलेजनिहाय शिबिरे आयोजित करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी तातडीने दाखले मिळतील आणि पालकांचीही धावपळ कमी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली.



दरवर्षी दहावी व बारावीची परीक्षा संपल्यानंतर प्रवेशाच्या वेळी विविध प्रकारच्या दाखल्यांकरीता सेतू व महासुविधा केंद्रात पालक व विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होती. एकाचवेळी गर्दी होत असल्याने अनकेदा विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना दाखले मिळविताना अनेक अडचणीस सामोरे जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुलभ पध्दतीने आवश्यक दाखले मिळावेत यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

गावपातळीवर तलाठी यांच्याकडून या उपक्रमासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. पुढील आठवडयापासून या उपक्रमाची सुरुवात होणार आहे. दहावी व बारावीच्या परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची माहितीही प्रशासनाकडून संकलीत करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना प्रवेशाकरीता जात, उत्पन्न, रहिवासी, अल्प भूधारक अशा विविध प्रकारच्या दाखल्यांची आवश्यकता असते. या सर्व दाखल्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती पालक व विद्‌यार्थ्यांना देण्यात येत आहे. शिबिरातच दाखल्यांसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया पुर्ण करुन त्यांना दाखले वितरण करण्याची मोहिम घेण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यात तहसील व अप्पर तहसील कार्यालयाच्या परिसरात सेतू सुविधा केंद्र आहेत. याशिवाय जिल्ह्यात एक हजारापेक्षा जास्त आपले सुविधा केंद्र आहेत. या सुविधा केंद्राचे योगदान या शिबिरात घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची अतिरिक्त शुल्क घेतली जाणार नाही; याचीही दक्षता घेण्यात येत आहे. जर कोणी पैशांची मागणी केलीच तर क्यूआर कोडवर नागरिक व विद्यार्थ्यांना प्रशासनाकडे तक्रार करता येणार असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.



## लोंढे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त हरिपाठाची १०० पुस्तके भाविकांना भेट

**सोलापूर, दि. २६ मार्च-**

निराळे वस्ती येथील केशव लोंढे यांच्या मातोश्री कै. रुक्मणीबाई लोंढे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त हभप सुधाकर महाराज इंगळे यांच्या हस्ते हरिपाठाचे १०० पुस्तके भाविकांना भेट देण्यात आले.. कै. रुक्मणीबाई लोंढे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सुधाकर महाराज इंगळे यांचे कीर्तन आयोजित केले होते. आपुलिया हिता जो असे जागता धन्य मातापिता तयाचिया या संत चरणावर त्यांनी मातापिताची सेवा केल्यावर जिवनाला धन्यता मिळते. हे महत्व त्यांनी आपल्या किर्तनातून सांगितले. यावेळी विठ्ठल ताकभाते, त्रिबंक शिंदे, शिवाजी रणदिवे किर्तनाला उपस्थित होते व तसेच या धार्मिक कार्यक्रमात ज्ञानेश्वर अप्पा सपाटे, हणमंतु बैसुळके, मल्हारी देडे, नागनाथ जाधव, भुषण, प्रकाश रणदिवे, संजय लोंढे, अक्कु इंगळे, कस्तुराताई पवार, गोदाबाई लोंढे, शाकुताई कांबळे, बब्रुवान कांबळे, विठ्ठल वाघमारे, अरुण लोंढे, संजय केसरे, रेणुका शिंदे, तानाजी लोहार, पुणाजी बोराडे, नंदा घुले, आदी उपस्थित होते.

## नागपूर येथे १२ एप्रिलला बुरुड समाजाची राष्ट्रीय परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ मार्च-**

बुरुड व बांबूशी संबंधित समाजाची राष्ट्रीय परिषद दि १२ एप्रिल रोजी नागपूर येथील महात्मा फुले सांस्कृतिक सभागृहात होणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय बांबू कम्युनिटी असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष के. वेंकट रामुडू यांनी दिली. या राष्ट्रीय परिषदेनिमित्त श्री. रामुडू हे दोन दिवसांसाठी मंगळवारी दुपारी सोलापुरात आले आहेत. त्यावेळी त्यांच्या समवेत असोसिशनचे संघटक सचिव पत्रकार दशरथ वडतिले व शारदादेवी हे उपस्थित होते. या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून आमदार हरिश पिंपळे (मूर्तिजापूर), आमदार किशोर जोरगेवार (चंद्रपूर) व शिवसेनेचे नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे व कर्नाटकचे माजी आमदार एच.डी. बसवराज हे उपस्थित राहणार असल्याचे के वेंकट रामुडू यांनी सांगितले. या परिषदेत बुरुड समाजाचे आरक्षण, त्या समाजाला मिळणाऱ्या सवलती व त्याचा आढावा, शासनाचे बांबू धोरण या सर्वत्र कमी दरात बांबू उपलब्ध व्हावा आणि बाबूंच्या वस्तूंना कायम बाजारपेठ मिळावी आदी मागण्या व विषयासंदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. असे वेंकट रामुडू यांनी सांगितले. तसेच विदर्भ बुरुड समाजाच्यावतीने दुसऱ्यादिवशी दि.१३ एप्रिल रोजी त्याचठिकाणी वधू-वर पालक परिचय मेळावा होणार आहे. या राज्यव्यापी मेळाव्यात आमदार पिंपळे व आमदार जोरगेवार यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी विदर्भ बुरुड समाजाचे अध्यक्ष हरिष दिकोंडवार व मेळाव्याचे संयोजक बंडूजी गयनेवार हे प्रयत्नशील आहेत.

# १ एप्रिलपासून रेशन दुकानदारांचा संप

### रेशन दुकानदार संघटनेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

स्वस्त धान्य दुकानदार धान्य वाटप करत नाहीत, दुकान वेळेवर उघडत नाहीत अशा एक ना अनेक तक्रारी अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे असतात. आता मात्र चक्क रेशन दुकानदारांनीच परिमंडळ अधिकारी ब विभाग अनिल गवळी यांच्या विरोधात तक्रारीचे शस्त्र उगारले आहे. वारंवार या अधिकाऱ्यांकडून त्रास होत असल्याचा आरोप करुन अशा अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई किंवा त्यांची बदली करावी, अशी एका निवेदनाद्वारे मागणी केली. अन्यथा दि. १ एप्रिल पासून सोलापूर शहरातील धान्य वितरण बंद ठेवू, असे अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे



यांच्याकडे सोलापूर जिल्हा संघटनेच्या माध्यमातून दिलेल्या निवेदनात इशारा दिला आहे.

या निवेदनात नमूद केले आहे की, परिमंडळ अधिकारी व पुरवठा निरीक्षक हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील गरजू शिधा पत्रिकाधारकांचे नाव कमी-जास्त करतात, दुबार व नवीन शिधापत्रिका देणे, अशा मूलभूत गरजा पुरवणारे त्याचप्रमाणे ग्राहकांना वेळेत व काटेकोरपणे धान्य वाटप करणाऱ्या रेशन दुकानदारांना त्यांचा त्रास होत असल्याचा आरोप केला आहे. सोलापूर जिल्हा रास्त भाव दुकानदार संघटनेच्या अंतर्गत परिमंडळ ब विभागातील ८२ रास्त भाव धान्य दुकानदार असून, शासनाच्या नियमाप्रमाणे रास्त भाव धान्य दुकानात ते नियमितपणे धान्य वाटप करतात. त्याचप्रमाणे शासनाच्या प्रत्येक उपक्रम ई केवायसी, आधारसिडींग, मोबाईल सिडींग,आयुष्यमान कार्ड अशा वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी होतात. परंतु दैनंदिन जीवनात हा व्यवसाय करत असताना काही असंतुष्ट तक्रारदार बिनबुडाच्या आरोप करत नेहमीच काही ठराविक दुकानदारांचे तक्रारी वरिष्ठ कार्यालयाकडे करत असतात. त्या अनुषंगाने परिमंडळ अधिकाऱ्याकडून तपासणीचे पत्र व त्यावर दुकानदारांना नोटीसाचे भीती दाखवून रेशन दुकानदाराकडून सतत पैशाची मागणी करत केली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. माहे नोव्हेंबर पासून दुकानदारांना धान्य वाटपाचे कमिशन न मिळाल्याने आधीच मेथाकुटीस आले आहेत. आता जिल्हा संघटनेने अधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रारी अर्ज दिल्याने अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

आता अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे हे गवळी यांच्यावर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मिळकत कर थकबाकीपोटी एमआयडीसीतील ६ गोडाऊन सील

### सोलापूर महापालिका प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

मिळकत कराच्या थकबाकीपोटी महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने एम आयडीसी परिसरातील ६ गोडाऊन आणि मुरारजी पेठ परिसरातील एक गाळा सील केला.



महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकत कर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या विविध पथकाद्वारे ही मोहीम राबविण्यात येत आहे. मार्च अखेरपर्यंत थकबाकी वसुलीचे उद्दिष्ट मालमत्ता कर विभागाला देण्यात आल्याने पेठ निहाय पथके लावून वसुली मोहीम सुरू करण्यात आली आहे. एक लाखावरील थकबाकी असलेल्या मिळकतदारांची यादी तयार करण्यात आली असून यानुसार प्रत्येक मिळकतदारांकडे जाऊन वसुली आणि थकबाकी न भरणाऱ्या मिळकतदारांवर कारवाई करण्यात येत आहे.

दरम्यान, आज एमआयडीसी परिसरातील नारायण बी. सी. पीठ्ठा यांच्याकडे कराची १८ लाख १० हजार ९०१ रुपयांच्या थकबाकी पोटी त्यांचे ४ गोडाऊन सील करण्यात आले. याच परिसरातील राजेंद्रप्रसाद मारता यांच्याकडे १ लाख १० हजार ७९३ रुपयांच्या थकबाकीपोटी २ गोडाऊन सील करण्यात आले. तसेच मुरारजी पेठ परिसरातील अर्जुन नारायण करणे यांच्याकडे १ लाख १४ हजार ७९७ रुपयांच्या थकबाकी पोटी एक दुकान गाळा सील करण्यात आला.

या कारवाईमुळे आज दिवसभरात अनेक थकबाकी मिळकतदारांनी थकबाकी महापालिकेत येऊन जमा केली.

# नागरी औद्योगिक बँकेसाठी एकरकमी परतफेड योजना लागू करण्याचे सहकार मंत्र्यांचे आश्वासन

### मुख्यमंत्री फडणवीस धावले कर्जदारांच्या मदतीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

विसर्जित झालेल्या सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँकेसाठी एकरकमी परतफेड योजना लागू करण्याचे आश्वासन राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याबाबत केलेल्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्योग बँकेच्या कर्जदारांना दिलासा देण्यासाठी धावून आले.

५ नोव्हेंबर २०११ साली सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक विसर्जित झाली आहे. या तारखेपूर्वी ज्या कर्जदारांची कर्जखाती थकीत झाली आहेत अशा कर्जदारांना विशेष एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू करण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत होती. ही बँक विसर्जनात असल्याने व बँकेचे बँकिंग लायसन रद्द झाल्याने केवळ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदी या संस्थेस लागू होतात. नियम ४९ च्या तरतुदीमधून सूट देऊन सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँकेस मलकापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक किंवा दि लक्ष्मी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक यांच्याप्रमाणे एकरकमी परतफेड योजना लागू करावी अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ कार्यवाही करत शेरा मारून सकारात्मक कार्यवाहीच्या सूचना दिल्या होत्या. यानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची याप्रकरणी दोनदा भेट घेऊन मागणीचे पत्र दिले. यावर सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी मंगळवारी सहकार आयुक्तांना शिष्टमंडळाच्या उपस्थितीत फोन करून सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँकेच्या कर्जदारांना एकरकमी परतफेड योजना राबवण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासित केले. त्यामुळे बँकेच्या कर्जदारांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी यंत्रमाग बचाव समितीचे प्रमुख चक्रपाणी गज्जम, सत्यनारायण गुर्रम, सदानंद गुंडेटी, मनोहर सिंगम, व्यंकटेश बुरा, नितीन चौगुले आदी उपस्थित होते.

# आंतरजातीय विवाह अनुदान वितरण; सुट्टीच्या दिवशीही कामकाज

### समाजकल्याण विभागाकडून पीएफएमएस प्रणालीद्वारे 31 मार्चपूर्वी अनुदान मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च -**


आंतरजातीय विवाह करणाऱ्या २६८ जोडप्यांना केंद्र आणि राज्य शासनाकडून देण्यात येणारे प्रोत्साहनपर अनुदान देण्यासाठी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या कार्यालयाकडून शनिवार व रविवार सुट्टीच्या दिवशीही कामकाज करण्यात आल्याने जोडप्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

शासनाने आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी एक कोटी ६१ लाख रुपयांचा निधी समाजकल्याण विभागाला दिल्याने तीन वर्षांपासून अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या जोडप्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र अनुदान ३१ मार्चपूर्वी वितरित करणे गरजेचे असल्याने समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांनी कार्यालय सुरू ठेऊन जोडप्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. कागदपत्र प्रस्ताव पडताळणी करून बिल मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहे. ३१ मार्चपूर्वी पीएफएमएस प्रणालीद्वारे अनुदान बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

दोन वर्षापासून आंतरजातीय विवाह अनुदान मिळाले नव्हते. सध्या मार्च महिना असल्याने थकित अनुदान प्राप्त झाल्याने व ३१ मार्चपूर्वी अनुदान वाटप करणे बंधनकारक असल्याने समाजकल्याण विभाग लाभार्थ्यांना संपर्क करून कागदपत्र पडताळणी करीत आहे. शनिवार व रविवार सुट्टी असतानाही जोडप्यांच्या उपस्थितीत कागदपत्रांची प्रस्तावासह पडताळणी करण्यात आली आहे. लवकरच पीएफएमएस प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात येणार आहे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो.
९९६००५३५२१

### अलक:- (९०) संघ बंदी

४ फेब्रुवारी १९४८ ला महात्मा गांधींच्या हत्येनंतर केवळ संशयानी सर्वप्रथम संघावर बंदी घातली. १२ जुलै १९४९ ला बंदी उठवली. त्यानंतर आपल्या विचाराचा आपल्या बाजूने आवाज उठवणारा एक राजकीय पक्ष हवाच, अन्यथा हे राजकारणी आपल्याला संपवतील, हा विचार पक्का झाल्यावर श्री गुरुजी व श्री बाळासाहेब देवरस यांच्या प्रयत्नामुळे ऑक्टोबर १९५१ मध्ये भारतीय जनसंघ स्थापन झाला. या राजकीय पक्षात शामाप्रसाद मुखर्जी- लालकृष्ण अडवाणी- अटल बिहारी बाजपेयी- दीनदयाल उपाध्याय- नानाजी देशमुख असे लोक होते त्यानंतर २५ जून १९७५ ला इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली. व जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात ठडनी सहभाग नोंदवला म्हणून ४ जुलै १९७५ ला संघावर दुसरी बंदी लादली. तेव्हा भारतभरात लाखो संघ स्वयंसेवक जेलमध्ये होते. आणीबाणी हटवल्यानंतर भारतीय जनसंघ जनता पार्टीत विलीन झाला व जनता पार्टी सत्तेवर आली. या नवीन सरकारने मार्च २०२२ ला संघावरची बंदी उठवली. परंतु त्यानंतर १९८० मध्ये जनता पार्टी तुटली व भारतीय जनता पक्ष (इगझ) या नावाने पूर्वीचा जनसंघ उदयाला आला. त्यानंतर विश्व हिंदू परिषदेने अयोध्या आंदोलन केले व त्यांनी सोमनाथ अयोध्या रथयात्रा काढली. त्यांनी मंदिराचे कुलूप उघडले. शिलापूजन केले. खूप लोकांचा सहभाग सहकार्य व प्रेम मिळाले. नंतर १९८४ मध्ये भाजपाला लोकसभेत फक्त दोन जागा मिळाल्या होत्या परंतु बाबरी ढाच्या फोडला म्हणून १९९२ मध्ये परत तिसऱ्या वेळेस संघावर बंदी घातली. परंतु ती १९९३ मध्येच उठवली. पुढे २००२ सालापासून १५ ऑगस्ट २६ जानेवारीला संघ कार्यालयावर तिरंगा ध्वज व भगवा ध्वज असे दोन्ही ध्वज फडकू लागले. भारत माता की जय

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### पत्रकारांनी वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करुन घ्यावी : डॉ. जानकर

**मंगळवेढा, दि. २६ मार्च-**

पत्रकारांना एखादा गंभीर आजार झाल्यावरच ते जागृत होतात. हे टाळण्यासाठी त्यांनी नित्य आरोग्य तपासणीवर लक्ष द्यावे असे आवाहन मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षिका डॉ.सुलोचना जानकर यांनी केले. मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात पत्रकारांसाठी आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी शिबीरात त्या बोलत होत्या. रुग्णालयाने पत्रकारांसाठी प्रथमच आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केल्याने पत्रकारामधून समाधान व्यक्त होत आहे. यावेळी रक्तातील साखरेचे प्रमाण, बीपी, दंत, मौखीक आरोग्य तपासणी, इसीजी आदी तपासण्या करण्यात आल्या. डॉ.सुलोचना जानकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. पत्रकारांचे आयुष्यमान भारत स्वास्थ्य खातेही उघडण्यात आले. यावेळी जिल्हा शल्यचिकीत्सक सोलापूर डॉ. सुहास माने, निवासी वैद्यकीय अधिकारी श्रीकांत कुलकर्णी, दंत चिकीत्सक डॉ.प्रणव कदम, आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ.ऋचा वैद्य, डॉ.निखील जोशी, डॉ.यादव, आर.बी.एस.के. वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रविण माने, डॉ.स्नेहा गंदगे, आरोग्य सेविका खरात,शिंदे, अवघडे, कोंडा, डॉ.मासाळ, मोरे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी पत्रकार दिगंबर भगरे, शिवाजी पुजारी, ज्ञानेश्वर भगरे, बाळासाहेब नागणे, मनोज अवधूत, राजेंद्रकुमार जाधव, प्रतिक भगरे उपस्थित होते.



### मोहोळ तहसीलसमोर शिवसेना उबाठाचे धरणे आंदोलन

**मोहोळ, दि. २६ मार्च-**

महायुती सरकारने निवडणूकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने मोहोळ तहसिलसमोर शिवसेना ऊबाठाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. निवडणुकीपूर्वी भाजपा राष्ट्रवादी (अजित पवार गट) व शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या महायुतीच्या वतीने जनतेला आश्वासने दिली होती यात शेतकऱ्यांना कर्ज माफी, सरसकट विज बिल माफ करणे शेती मालाला हमी भाव ऊसाचे बिल एकरकमी देणे बेरोजगारांच्या हाताला काम देणे यासारखी अश्वासने देण्यात आली होती परंतु या आश्वासनांची पूर्तता झाली नाही उलट राज्यातील तरुणांच्या हाताला काम नाही राज्यात गुन्हेगारी वाढत आहे यावर शासनाचा दबाव नाही भ्रष्टचार वाढत आहे शासन या सर्व बाबीवर असमर्थ ठरले आहे या समस्या कडे लक्ष वेधण्यासाठी मोहोळ तहसिल कार्यालयासमोर उपजिल्हा प्रमुख काकासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली धरणे आंदोलन करण्यात आले यावेळी या आंदोलनात तालुका प्रमुख अशोक भोसले महीला आघाडीच्या नेत्या सीमा पाटील, तुकाराम माने, सत्यवान देशमुख, बाळासाहेब वाघमोडे, मनोज नागणे, विक्रांत देशमुख, संदीप चवरे, शहाजी केदार, दिलिप टेकाळे, प्रभाकर हावळे उपस्थित होते.




### डॉ. सुतारांच्या ज्ञानाचा पंढरपुरकरांनी उपयोग करुन घ्यावा : उमेश परिचारक

**पंढरपूर, दि. २६ मार्च -**

डॉ. बसवराज सुतार यांच्या हृदयस्पंदन हार्ट केयर हॉस्पिटलमधे अद्ययावत सुविधांसह अत्यल्प दरात उत्तम दर्जाची आरोग्यसेवा मिळत असल्याने पंढरपूरकरांची उणीव भरून निघाली असल्याचे मत उमेश परिचारक यांनी व्यक्त केले. हॉस्पिटलच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट, नगरसेवक इब्राहिम भोरी, नगरसेवक अमोल डोके, नगरसेवक राजू सर्वगोड, अर्बन बँकेचे संचालक गणेश सिंघन, राजू खोबरे उपस्थित होते. यावेळी मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. वर्षभरात पंढरपुरकरांनी अलोट प्रेम दिल्याचे सांगून अजून अधिक अत्याधुनिक सेवा देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे डॉ. सुतार यांनी सांगितले. कला सधनाचे अध्यक्ष श्रीकांत महाजन बडवे यांनी सुतार डॉक्टरांचा वैद्यकीय क्षेत्रातील सुवर्ण पदकापर्यंतचा खडतर प्रवास वर्णन केला. डॉ. वि.अ. वोहरा यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेंद्र कांबळे, ओम सुतार, ईरण्णा सुतार, राजेंद्र माळी, राजकुमार आटकळे, राजकुमार शहा, कोमल पांढरे, तंजिला शेख आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीकांत बडवे महाजन यांनी केले तर आभार डॉ. उमाश्री दावणगीरे-सुतार यांनी मानले.



### सुळवस्ती शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**पिलीव, दि. २६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुळवस्तीच्या विदयार्थयानी जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले. यामध्ये पहीलीमधील सृष्टी सूळ हिने १३६ गुण संपादन करीत जिल्हा गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक मिळविला, तर तिसरीमधील शिवम कुंडलिक शिंदे याने २६० गुण मिळवित जिल्हा गुणवत्ता यादीत सहावा क्रमांक पटकाविला, आदिती सूळ हिने २५२ गुण संपादन करीत जिल्हा गुणवत्ता यादीत १० वा क्रमांक मिळविला, स्वरांजली गोरड हिने २४८ गूण मिळवित केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला, स्वरा झिमल हिने २४२ गुण मिळवित केंद्र गुणवत्ता यादीत तिसरा क्रमांक पटकाविला.

# शेतकऱ्यांची यंदाही तारेवरची कसरत

**उजनीतील पाणी पातळी खालावली**

**पिके वाचवण्याचे संकट**



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२६ मार्च**

उजनी धरण हे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात फायदेशीर धरण मानले जाते.गेल्या वर्षी घाटमाथ्यावर पडलेल्या पावसाने धरण शंभर टक्के भरले होते.मात्र पाणी वितरणाच्या ढिसाळ नियोजनामुळे यंदा मार्च महिन्यातच धरणातील पाणी पातळी ३० टक्क्यांवर आली आहे. थोड्याच दिवसात धरण उणे पातळीत जाईल.आणि उजनी काठच्या शेतकऱ्यांना यंदाही पिके वाचवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागेल. प्रत्येक वर्षी प्रत्येक निवडणुकीत राजकीय पुढारी आम्ही पाण्याचे नियोजन करू असे सांगत असतात मात्र इतिहासाची पुनरावृत्ती करत यंदाही उजनी काठावर अवलंबून असणाऱ्या करमाळा, इंदापूर व कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना धोका झाला असल्याचे बोलले जात आहे.पावसाळ्यात १११ टीएमसी पाणीसाठा असलेले धारण केवळ तीनच महिन्यात ३३ टक्क्यांवर आले आहे या पुढील तीन महिन्यात हे पाणी नियोजित करणे डोकेदुखी बनणार आहे.सोलापूर शहरासाठी फेब्रुवारी दरम्यान पिण्यासाठी पाणी सोडण्यात आले तर फेब्रुवारी मार्च महिन्यात प्रारंभी खाली नदी पत्रात पाणी सोडण्यात आले. त्यातच सीन माढा बोगदा, दहीगाव उपसा सिंचन, मुख्य कॅनल द्वारे पाणी आवर्तने सोडण्यात येत आहेत. धरणातील पाणी साठा लवकरच उणे पातळीकडे जाईल व उजनी धरण काठावरील शेतकऱ्यांची ऊस,केळी व विविध फळबागा ही पिके करपून जाण्याचा धोका संभवतो आहे.म्हणून प्रशासनाने वेळीच पाण्याचे नियोजन करून शेतकर्यांवर येऊ घातलेले संकट



### उपळाई खुर्द येथे जिजाऊ रथयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ मार्च-**

मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने मराठा जोडो अभियानांतर्गत राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या रथ यात्रेचे मंगळवारी माढा तालुक्यातील उपळाई खुर्द येथे आगमन झाले. यावेळी मोठ्या उत्साहात उपळाई खुर्दच्या नागरिकांनी रथयात्रेचे स्वागत केले. जिजाऊंच्या रथयात्रेचे स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या सोलापूर जिल्हा युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी यांच्या सह गावातील महिला व पुरुषांनी जिजाऊंच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. याप्रसंगी सौरभ खेडेकर यांचा सन्मान विनंती कुलकर्णी व गावातील सर्व प्रतिष्ठित ग्रामस्थांच्या वतीने सत्कार सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित सचिन जगताप, दिनेश जगदाळे, माजी सरपंच सुनीता कुलकर्णी, मनीषा कुलकर्णी, श्रद्धा कुलकर्णी, कांचन कदम, मंगल कदम, सुलभा कदम, निकिता सुतार, रेणुका राऊत, उपसरपंच सुनील राऊत, नागनाथ कदम, लहू बोराडे, अमोल यादव, राजीव मोहिते, सतीश पाटील, सुरेश पाटील,पांडुरंग राऊत, शिवप्रसाद कांबळे उपस्थित होते.

## शनि अमावस्यानिमित्त धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ मार्च-**

तालुक्यातील घोळसगाव येथील स्वयंजागृत नवसाला पावणारा सर्वधर्मीय श्रद्धास्थान शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान शनी अमावस्या यात्रा महोत्सवानिमित्त शुक्रवार दि. २८ व २९ मार्च रोजी विवध धार्मिक, सामाजिक कर्यक्रम आयोजित केले आहेत.



जय भारत माता सेवा समिती राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात शनी अमावास्या यात्रा महोत्सव कार्यक्रम नेहमी भक्ती भावनेने मोठ्या उत्साहात साजरी केल्या जातात.राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराजानी भक्तांना संसाराच्या व्यापातून थोडाकाळ विश्रांती मिळावा आणि भक्ताने आपले जिवन सार्थक करून भक्ती मार्गाकडे वळावे, यासाठी आंध्रा,कर्नाटका, महाराष्ट्रा, अशा अनेक राज्यासह संपूर्ण देशभरात सुमारे साडेपाच हजारोहून अधिक शिवलिंगाची स्थापना केले आहेत.त्या पैकी घोळसगाव येथील शनेश्वर देवस्थान हे नवसाला पावणारा स्वयं जागृत सर्व धर्मीय श्रद्धास्थान देवस्थान आहे. प्रत्येक शनी अमावस्या यात्रेस तुळजापूर, उमरगा, आंळद व अक्कलकोट तालुक्यातील भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. यामुळे यंदा यात्रा कमिटीचे वतीने शनी अमावास्या यात्रेची जयत्त तयारी करण्यात आले आहेत.

शुक्रवारी दि. २८ मार्च रोजी दिवसभरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले असून रात्रभर भजन,भारुड,गीगी पदा आदी भरगच्च धार्मिक कार्यक्रम आयोजित केलेल्या आहेत. शनिवार दि. २९ मार्च पहाटे श्री चे महापूजा,म्हारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार असून सकाळी सात वाजता घोळसगाव ग्राम प्रदिक्षण करीत श्रीचे भव्य पालखी मिरवणूक विविध वाद्य समवेत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यत निघणार आहे. यानंतर राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज दर्शन सोहळा, महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम होणार असून भाविक भक्तांनी सद्गुरूचा दर्शन आणि महाप्रसादचा आवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन एका पत्रकाद्वारे यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## पिलीव परीसरावर अवकाळी पावसाचे संकट

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरावर गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसाचे संकट आहे. गेल्या दोन दिवसांपासून तापमानात प्रचंड बदल झाला असुन गेल्या दोन रात्री पावसाचे बारीक थेंब पडत आहेत. आज दुपारपासूनच ढगाळ वातावरण असुन वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस येण्यासारखे आज वातावरण आहे. गेल्या दोन दिवसांपासून प्रचंड उकाडा जाणवत आहे. रात्री उकाडा जास्त आहे. तर दिवसभर कडक असह्य होणारे ऊन आहे. सध्या कडक उन्हाळा सुरू असुन अवकाळी पाऊस हा नुकसानीचाच पाऊस असल्याचे बोलले जात आहे. सध्या अनेक शेतकऱ्यांनच्या शेतात गव्हाचे पिक अंतीम टप्पयात आहे. शेतकरी सध्या गहू, हरभरा काढणीत गुंतले आहेत त्यातच अवकाळी पावसाच्या भितीमुळे सध्या शेतकरी चिंतेत आहेत.तर आंब्याच्या बागा सध्या बहरात आहेत तसेच शेवगा ,केळीच्या बागा पण या भागात बऱ्यापैकी आहेत.पण या बागायतदारांना सुद्धा सध्या अवकाळी पावसाची प्रचंड भिती आहे. कारण हा अवकाळी पाऊस फायदयाचा तर नाहीच पण नुकसानीचाच आहे. असे शेतकऱ्यांनमधून बोलले जात आहे. तर अवकाळी पाऊस झाल्यामुळे उन्हाची तिव्रता व उकाडा यामुळे जमीनीतील पाणयाची पातळीसुदधा कमी होते. त्यामुळे सध्या पिलीव परीसरावर अवकाळी पावसाचे संकट उभे आहे.




### टीबीमुक्त गाव पुरस्काराने मुंगशी गाव सन्मानीत

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २५ मार्च -**

बार्शी तालुक्यातील तडवळे प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येणाऱ्या मुंगशी (वा.) गावास टीबी मुक्त गाव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आयुष्यमान आरोग्य उपकेंद्र दहिटणे अंतर्गत मुंगशी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत ही निवड करण्यात आली. या पुरस्काराचे वितरण सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मिनाक्षी बनसोडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी वैद्यकिय अधिकारी डॉ अमृता गाटे, डॉ. प्रशांत पलंगे उपस्थित होते. या मोहीमेत सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी घरोघर जाऊन क्षयरोगाचे निदान करणे यासाठी आवश्यक ती तपासणी करून गावातील लोकांच्या मनातील गैरसमज दूर करणेबद्दल जनजागृती करण्यात आली. दहिटणे उपकेंद्राच्या आरोग्य समुदाय अधिकारी डॉ.अमृता गाटे, आरोग्य सहाय्यीका सुंदर जाधव, सहाय्यक रोहीत मोरे, सेवक, प्रकाश खेडकर, सेविका कान्होपात्रा आमले, आशा स्वयंसेविका स्वाती क्षीरसागर, सुरेखा मडके आदींनी ही मोहीम यशस्वीरित्या पार पाडली.

## राष्ट्रीय एकात्मतेसाठी जन्मभूमी प्रतिष्ठानचे कार्य कौतुकास्पद

**भालेकर यांचे गौरवोद्गार**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ मार्च-**

निरपेक्ष भावनेने गावावरच्या प्रेमापोटी एकत्र आलेल्या भूमिपुत्रांनी महानगरात राहूनही गावाबद्दलचं प्रेम जोपासला असून जन्मभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिवालय सभामंडप उभारणीपासून ते रोजा इफ्तार कार्यक्रमापर्यंत केलेले सर्व उपक्रम राष्ट्रीय एकात्मता वाढवणारे आहेत, असे गौरवोद्गार पिंपळगावचे माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर यांनी काढले. पिंपळगाव येथे रमजान महिन्यानिमित्त सुरु असलेल्या उपवासांचे निमित्त साधून उपवास सांगताप्रसंगी गावातील मुस्लिम बांधवांसाठी आयोजित रोजा इफ्तार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त अभियंता सर्जेराव शिंदे, भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे, जन्मभूमी प्रतिष्ठानचे संस्थापक नानासाहेब धस, सचिव स्वप्नील धस, उपसरपंच अण्णासाहेब धस, विजयसिंह पाटील, पैलवान सचिन धस, हनुमंत जगदाळे, दादा चिपडे, शिवा भोळे, धनु वाघमोडे, दादा कसबे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी रोझेकरी बांधवांचा शाल व टोपी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व रोजीकरांना व उपस्थितांना फलाहार देण्यात आला. यावेळी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त विशाल धस यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोहेल शेख, अण्णासाहेब पाटील, राहुल धस, सुरज चंदनशिवे, मंथन पाटील आदींनी परिश्रम घेतले.




### अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत बिले पब्लिक स्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा**
**करमाळा दि. २६ मार्च-**

भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती इंग्रजी माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत जयप्रकाश बिले पब्लिक स्कूल झरे ता. करमाळाचे जिल्ह्यात २ व केंद्रात १० विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत

तसेच विघ्नेश कादगे (इ.२ री) जिल्ह्यात तिसरा, जान्हवी शहा (इ. ४थी) जिल्ह्यात दुसरी,प्रणाली समाधान मारकड (इ.१ ली) केंद्रात पहिली, शांभवी सुर्वे (इ.१ ली) केंद्रात दुसरी, शिव गुळवे (इ.२री) केंद्रात पहिला, ध्रुव पासवान (इ.२ री) केंद्रात दुसरा, स्वयंम विनीत गादिया(इ.२ री) केंद्रात तिसरा, निर्मित साळुंके (इ.३री) केंद्रात पहिला, दर्श रणदिवे (इ.३ री) केंद्रात दुसरा, उत्कर्ष मंजरतकर (इ.३री) केंद्रात तिसरा, श्रावणी शिंदे (इ. ४ थी) केंद्रात पहिली, श्रेयस पवार (इ.४थी) केंद्रात दुसरा आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना नीलिमा आढाव, रेश्मा बैरागी, किशोरी चावरे, रूपाली शिंदे या सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश बिले, सचिव युवराज बिले, संचालिका स्वाती बिले व मुख्याध्यापिका अमृता परदेशी यांनी केले.

## 'त्या' वादग्रस्त गीतगायकावर माळशिरस पोलीस ठाण्यात गुन्हा

**अकलूज, वेळापूर, माळशिरस, नातेपुते आदी पोलीस ठाण्यात शिवसेनेचे निवेदन**



**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २५ मार्च-**

शिवसेना शिंदे गट माळशिरस तालुका यांच्या वतीने कॉमेडियन कुणाल कामरावर माळशिरस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, दरम्यान, शिंदे गटाचा अनेक कार्यकर्त्यांनी नातेपुते, वेळापूर, अकलूज या पोलीस ठाण्यातही निवेदन दिले.

निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले की, कॉमेडियन कुणाल कामरा याने माजी मुख्यमंत्री विद्यमान उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांचे बद्दल, आक्षेपार्ह अपशब्द वापरून तमाम महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या व शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या आहेत. आपल्या स्तरावरून आशा समाजकंटकांवर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी, असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला.

याप्रसंगी माळशिरस तालुका प्रमुख सतिश सपकाळ, ओबीसी महासंघाचे अध्यक्ष भिमराव भुसनर,माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब सपताळे, शिवसैनिक महादेव तुपसौंदर, तानाजी भोसले, रावसाहेब कोकाटे, सुनील साठे,अनिल दडस, आशोक शिंदे, रणजित गायकवाड, अमोल साठे, महेंद्र साठे, नातेपुते शहर प्रमुख निखिल पलंगे, उपशहरप्रमुख भैया लांडगे, माळशिरस शाखाप्रमुख महादेव जगताप, शिवाजी नाईकनवरे, राहुल साठे, मिलींद साठे, हनुमंत साठे, देवानंद लोखंडे, राहुल गायकवाड, विशाल गायकवाड, बाळासाहेब वाघमारे उपस्थित होते.

## 'शब्दांबर' काव्यसंग्रहात नवरसांचा परिपोष अन् विविधअंगी भावदर्शन

**डॉ. सबनीस यांचे गौरवोद्गार**

**जे.टी. जाधव यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ मार्च-**

'मानवी षडरिपूंचा वेध घेत नवरसांचा परिपोष करत कवी जे. टी. जाधव यांनी शब्दांबर या काव्यसंग्रहात विविधअंगी मानवी भावभावनांचे विलोभनीय दर्शन घडवले आहे,' असे गौरवोद्गार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी काढले.

येथे यशवंतराव चव्हाण सभागृहात मराठीचे व्यासंगी अध्यापक जे. टी. उर्फ जयद्रथ तुकाराम जाधव यांच्या शब्दांबर या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते. यावेळी माजी सनदी अधिकारी व गझलकार डॉ. दिलीप पांढरपट्टे, जेष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास, बार्शीचे आमदार दिलीप सोपल, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, खजिनदार जयकुमार शितोळे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष पां.न. निपाणीकर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष शाखा बार्शी सोमेश्वर घाणेगावकर, मायबोली सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी, कवी कालिदास मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र इकारे, माजी न्यायाधीश नागराज शिंदे, शिक्षक नेते अंबादास शिंदे, संगीतरत्न डॉ. अबोली सुलाखे, माजी सनदी अधिकारी दिनकरराव जगदाळे, संयोजक सचिन अपसिंगकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविकामध्ये पत्रकार सचिन अपसिंगकर यांनी जे. टी. जाधव यांनी मराठी भाषेचा व्यासंग करत, आदर्श विद्यार्थी घडवत, सामाजिक चळवळीतून काम करत, पत्रकारितेच्या माध्यमातून टिपलेल्या जीवनाच्या अनेक पैलूंचे दर्शन शब्दांबरमध्ये झाले असून मराठी भाषेची बार्शीतील साहित्य परंपरा जिवंत ठेवण्यासाठी या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले असल्याचे सांगितले.

यावेळी कवी जे. टी. जाधव यांनी कवितेने माझे जगणे समृद्ध केले. नरहरी कुरुंदकर, सुहासिनी इर्लेकर यांच्यासारख्या शिक्षकांचा सहवास विद्यार्थीदशेत लाभला, मराठी साहित्याबद्दलची ओढ वाढली, जीवनाला भिडताना पाहिलेल्या विविध माणसांमुळे कविता लिहिण्याची प्रेरणा झाली. गझल हा आवडता काव्य प्रकार असून छंदबद्ध व वृत्तबद्ध कविताही लिहिल्याचे सांगितले. यावेळी बोलताना आमदार सोपल यांनी जे.टी. जाधव हे एक चांगला माणूस म्हणून घडले आहेत. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब काव्यसंग्रहात उमटले आहे असे सांगितले. यावेळी माजी शिक्षण अधिकारी विष्णू कांबळे, माजी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, कवयित्री सुमन चंद्रशेखर, कवयित्री शुभांगी काळे, श्रीधर कांबळे, प्रा. अशोक वाघमारे, प्रा. डी.डी. मस्के, डॉ. टी.एस. मोरे, सुरेश हालमे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार नीता देव यांनी व्यक्त केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कुसमोड परिसरात पुन्हा बिबट्याचे दर्शन

### नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड-काळमवाडी रस्त्यालगत मंगळवारी रात्री बिबट्या दिसला. नागरिकांनी प्रत्यक्ष बिबट्या पाहील्यामुळे यापूर्वी कुसमोड, काळमवाडी व पिलीव शिव यादरम्यान या अगोदरही सदरचा बिबट्याचा सतत वावर असल्याचे पाहवयास



मिळत आहे. गत वर्षीही याठिकाणी बिबट्याने अनेक जनावरांवर वारंवार हल्ला केला होता. यामध्ये अनेक जनावरे मृत्यूमुखी पडली होती. वनविभागाने त्यावेळेस बिबट्या पकडणयासाठी अनेक वेळा प्रयत्न केला होता पण तो अयशस्वी झाला होता. आता पुन्हा याच भागात बिबट्या दिसल्याने नागरिकामध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

> याविषयी वनविभागाच्या कोंबडे यांना विचारले असता आम्हाला माहीती सम जल्यावर सकाळी आम्ही त्याठिकाणी सर्व अधिकारी जाऊन आलो आहे. पण जागा कठीण असल्याने आम्हाला ठसे दिसुन आले नाहीत. आम्ही सध्या लक्ष ठेवून आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### लिटिल वंडर्स स्कूलचे रंगोत्सव कला स्पर्धेत यश

**सांगोला, दि. २६ मार्च-**

आंतरराष्ट्रीय रंगोत्सव कला स्पर्धेकडून सांगोल्यातील लिटील वंडर्स पब्लिक स्कूलला 'ग्लोबल स्कूल' पुरस्काराने गौरवण्यात आले. सदर स्पर्धेचे आयोजन दि.२६ जानेवारी रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये स्कूलचे प्रियांश सरगर, आर्यांश कोळेकर यांचा अनुक्रमे तिसरा व चौथा क्रमांक तसेच रुही शिंदे, रिया बेंगलोरकर यांना 'स्पेकटयाक्युलर परफॉर्मन्स वार्ड' तर आराधना माने, अर्निका मेटकरी, बिनिश तांबोळी, सान्वी मस्के, आदिश्री जाधव यांना इंटर-नॅशनल मेडल व अमृता यादव, श्रीशा देवकते या विद्यार्थीनींना सरप्राइज गिफ्ट मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे स्नेहल लोखंडे यांनी अभिनंदन केले.



### स्नेहालय स्कूलच्या दळवी दाम्पंत्यास ज्योती सावित्री पुरस्कार

**करमाळा, दि. २६ मार्च-**

ओम महिला कला क्रीडा सांस्कृतिक सामाजिक शैक्षणिक प्रसारक मंडळ करमाळा यांचे अंतर्गत विविध सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. मैतरणी गं मैतरणी नारी सन्मान पुरस्कार देण्यात येत असतो. ८ मार्च महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांत कार्यरत आणि सेवेत असणाऱ्या मान्यवर महिलांचा गुणगौरव सोहळा दरवर्षी देत आहेत यावर्षी ज्योती सावित्री हा पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या दांम्पत्य ज्योती सावित्री सन्मान पुरस्कार स्नेहालय न्यू इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष जयंत दळवी व मुख्याध्यापिका धनश्री दळवी यांना दिला आहे. केमिस्ट भवन येथे संपन्न झाला आहे. यावेळी गिरिजा मस्के, शितल करेपाटील, डॉ. कविता कांबळे, डॉ. वर्षा करंजकर, डॉ. अपर्णा भोसले यांच्या उपस्थितीत हा गौरवसोहळा संपन्न झाला आहे. कार्यक्रमाचे आयोजन ओम मंडाळाच्या अध्यक्षा अंजली श्रीवास्तव यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.



### तांबोळी परिवाराकडून इफ्तार पार्टी

**वळसंग, दि. २६ मार्च-**

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे माजी ग्रामपंचायत सदस्य मोहन तांबोळी यांच्याकडून इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडले. यावेळी पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील, सहाय्यक अभियंता प्रमोद आठवले,अविनाश मणीखांबे, सरपंच जगदीश अंटद, ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, श्रावण फुटके, विनोद सुरपुरे, श्रीशैल भुसणगी, सिद्धेश्वर मोरे, विश्वनाथ मोटगी, दीपक गायकवाड, अजय काळे, पोलीस हवालदार लक्ष्मण घोडके, योगेश चनशेट्टी, शिवानंद चिंचोळी, मनोज थळांगे, डॉ. पंडित हिरेमठ, सिध्दाराम वाघमारे, विरेश बागलाकोटी, सिध्दाराम चौगुले, दिनकर नारायणकर, स्वामिनाथ कोडले, मल्लिनाथ ढब्बे, पोलीस उमेश गायकवाड, समीर शेख, इरफान शेख, खालिद मनियार, शाहरुख खुदाले, सचिन कांबळे, गोटु गायकवाड, उमर शेख, सलीम फुलारी, जुबेर फुलारी, सद्दाम नुरेवाले, जाफर भोंगे, अरबाज फुलारी, महेश व्हनकडे, अस्फाख मशालकर, इम्रान मुल्ला, रफिक पटेल, पत्रकार कल्लय्या स्वामी उपस्थित होते.



### 'आदर्श'च्या ४ विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड

**कुर्डूवाडी, दि. २६ मार्च-**

सन २०२४ -२५ मध्ये घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत आदर्श पब्किल स्कूलच्या चार विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड झाली आहे. इयत्ता पाचवीमधील वृंदा सोनवणे, काव्या देशमुख, मंथन कांबळे, देवांश छापेकर नवोदयसाठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक पूनम बारबोले, बालिका कोरके, अनिता थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव, विस्तार अधिकारी घाडगे, केंद्रप्रमुख उबाळे, संस्थेचे संस्थापक अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, मुख्याध्यापिका सय्यद, विभाग प्रमुख मुलाणी यांनी अभिनंदन केले.

## रविवारपासून 'म्हैसाळ'च्या पाण्याचे उन्हाळी आवर्तन

### आ. समाधान आवताडे; कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२६ मार्च-**

मंगळवेढा वितरिका १, मंगळवेढा वितरिका २ आणि उमदी डीवाय वितरिका गावांना येत्या ३० मार्च पासून उन्हाळी आवर्तन सुरू करण्याचा निर्णय आ. समाधान आवताडे यांच्या कालवा सल्लागार समितच्या बैठकीत घेण्यात आला.

म्हैसाळ योजनेचे पाणी उपसा करणारे पंप जुने आणि वारंवार नादुरुस्त होत असल्यामुळे त्याचा परिणाम पाण्याच्या वेगावर होत असून मंगळवेढा तालुक्याला पुरेशा दाबाने पाणी येत नाही. पुरेशा दाबाने पाणी यावे, यासाठी ४०० क्युसेक वेगाने पाणी वितरित होणे गरजेचे असून पंप हाऊस दुरुस्त करणे आवश्यक आहे या दुरुस्तीसाठी १ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. तो निधी उपलब्ध करून देण्यात यावा. उमदी वितरिकेवरील गावांना आजपर्यंत कमी प्रमाणात पाणी मिळाले असून या पुढील काळात हे खपवून घेतले जाणार नसून पाईपलाईनच्या कामांमध्ये भ्रष्टाचार करण्यात



आला असून यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात यावी व सदर कामाची चौकशी करावी. तसेच दोषी ठेकेदारांना काळया यादीत समाविष्ट करावे अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी कालवा सल्लागार समितीमध्ये केली यावेळी त्यांनी उन्हाळी पाण्याचे आवर्तन ३० मार्चपासून सोडणार असल्याचा निर्णय झाल्याचेही सांगितले. नुकतीच मंत्रालयामध्ये यंदाच्या उन्हाळी हंगामासंदर्भात सांगली आणि सातारा पाटबंधारे कालवा सल्लागार समितीची बैठक जलसंपदा मंत्री राधाकृष्णजी विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत टेंभू, कृष्णा कोयना सिंचन प्रकल्पांतर्गत ताकारी व म्हैसाळ, आरफळ कालवा व कृष्णा कालवा यासंदर्भात चर्चा झाली.

बैठकीस उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, ग्रामविकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंदआबा पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आ. सुरेश खाडे, आ. गोपीचंद पडळकर, आ. विश्वजीत कदम, आ. रोहित पाटील, आ. सुहास बाबर, आ. सदाभाऊ खोत, आमदार अरुण लाड कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपुले उपस्थित होते.



## सुळेवाडी येथे लोकसहभागातून पाणीपुरवठा विहिरीच्या कामाचे भूमीपूजन

**तभा वृतसेवा,**
**पिलीव दि २६ मार्च-**

माळशिरस तालुक्याला सध्या पाणीपुरवठा करणाऱ्या विहीरीतून आठवडयातून फक्त एकदा पाणीपुरवठा केला जात आहे. या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी नागरिकांनी लोकवर्गणीतून तलावाच्या बुडीत क्षेत्रातील जागेवर विहीर पाडणयाचा निर्णय घेतला आहे. विहीर पाडण्यासाठी माळशिरस पंचायत समिती जलसंधारण विभागाकडून परवानगी देण्यात आली आहे. या विहिरीच्या कामाचा भूमीपूजन शुभारंभ आ. उत्तमराव जानकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अजय सकट, नाथा सोलंकर, विक्रम सुळे, बाजीराव सुळे, भानुदास सुळे, नामदेव सोलंकर, अण्णा नामदेव सोलंकर, नामदेव सुळे, भगवान सुळे, महादेव सुळे, सुखदेव झिंबल, पांडुरंग अनुसे, मेघराज सुळे,विश्वंभर सुळे, राजू सुळे टेलर, राजू सुळे, विठ्ठल सुळे, अशोक सुळे उपस्थित होते. सूत्रसंचालन भानुदास सुळे यांनी केले तर आभार विक्रम सुळे यांनी मानले.

## अक्कलकोट येथे होणार नवीन विद्युत उपविभाग

### १२ नवीन स्टाफ; सव्वा कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२६ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील मोठ्या प्रमाणात असलेले कृषी, व्यावसायिक आणि घरगुती वापरासाठी मोठ्या प्रमाणावर विजेचा वापर होतो त्याचे सर्व नियंत्रण एकाच उपयोगामार्फत आजपर्यंत होत होता. त्याच्या कामकाजात सुधारणा व्हावे आणि सर्वांना सुरळीत सेवा मिळावे आणि आजपर्यंतच्या विजेच्या कारभाराबाबत येत असलेल्या तक्रारी दूर व्हाव्यात यासाठी गेले कित्येक वर्षापासून असलेली मागणी लक्षात घेऊन अक्कलकोटच्या उपविभागाचे अक्कलकोट उपविभाग एक आणि अक्कलकोट उपविभाग दोन असे विभाजन करण्यास मंजुरी मिळाल्याची माहिती आफ सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे. यावेळच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात या विजेच्या प्रश्नावर आवाज उठवून सदर समस्या कमी कराव्यात यासाठी आग्रही मागणी केली होती. त्याची दखल घेतली गेली आहे.

बारामती परिमंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या सोलापूर विभागातून पूर्ण अक्कलकोट तालुक्यासाठी एकच उपाय करून आजपर्यंत कारभार केला जात होता. विद्युत वितरण कंपनीचा वाढता व्याप लक्षात घेता आता लोकांना अधिक चांगली सेवा मिळावी यासाठी सध्याच्या एकूण नऊ शाखे पैकी अक्कलकोट उपविभाग एक यात चार शाखा तर अक्कलकोट उपविभाग दोन यात पाच शाखा असे विभाजन करण्यात आलेला आहे. उपविभाग एक यात अक्कलकोट ग्रामीण शाखा, अक्कलकोट शहर शाखा,वागदरी शाखा व हन्नूर शाखा यांचा समावेश आहे. तर नव्याने निर्मित उपविभाग दोन यात मैंदर्गी, दुधनी, करजगी, नागणसूर व तडवळ शाखा यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या नवनिर्मित विद्युत उपविभाग दोन यात बारा पदांची नव्याने निर्मिती करण्यात आलेली आहे. ज्यात वितरण विभागाशी संबंधित उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता आणि सहाय्यक अभियंता याची प्रत्येकी एक पदे आणि उच्चस्तर लिपिक (२)आणि निम्न लिपिक (४), सहाय्यक लेखापाल (१) मुख्य तंत्रज्ञ (१)आणि शिपाई (१) अशा एकूण बारा नवीन पदांच्या निर्मितीस मंजूर देण्यात आलेले असून त्याच्या दरवर्षीच्या १,२५,०९,६०४ तसेच १,७९,५०० रुपयाच्या प्रशासकीय भाराचा खर्च असे एकूण प्रतीवर्षीच्या १ कोटी २६ लाख,८९ हजार १०४ रुपयांच्या खर्चास मंजुरी देण्यात आलेले आहे. या दोन विभागांच्या निर्मितीमुळे एकाच विभागावर पडणारा भार कमी होऊन वीज वितरण कंपनीच्या ग्राहकांची प्रलंबित कामे वेळेवर होऊन त्यांना होणाऱ्या त्रासापासून सुटका होणार आहे. अक्कलकोट तालुक्याच्या विजेच्या वापराच्या दृष्टिकोनातून कामांमध्ये सुसूत्रता यावी यासाठी एका नव्या उपविभागाची निर्मिती होणे आवश्यक होते त्याची मंजुरी मिळाल्याने त्याचा खूप मोठा लाभ नागरिकांना होणार आहे.

> अक्कलकोट तालुक्यातील विजेच्या वापर करणाऱ्या ग्राहकांना गेल्या कित्येक वर्षांपासून त्यांची कामे वेळेवर होत नसल्याने गैरसोयीला तोंड द्यावे लागत होते. यासाठी कामात आणि प्रशासनात सुसूत्रता यावी आणि वेळेवर कामे मार्गी लागावीत यासाठी विभाजन करून एकाचे दोन उपविभागात निर्मिती करण्यात आले आहे. अक्कलकोटच्या वीज वितरण प्रणालीसाठी हा निर्णय अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. सदर निर्णयास अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिलेली आहे. .
>
> **- सचिन कल्याणशेट्टी,** आमदार



## आगामी सण, उत्सव काळात सलोखा राखा; सपोनी महारुद्र परजणे यांचे आवाहन

### नातेपुते पोलीस स्टेशनतर्फे शांतता समितीची बैठक

तभा वृत्तसेवा,
नातेपुते, दि.२६ मार्च-

आगामी मराठी नववर्ष गुढीपाडवा, रमजान ईद, शिखर शिंगणापूर यात्रा, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले जयंती, महावीर जयंती या काळात नातेपुते परिसरातील सर्व नागरिकांनी सामाजिक सलोखा राखून शांतता व सुव्यवस्थेचे पालन करावे असे आवाहन सपोनि महारुद्र परजणे यांनी केले.

नातेपुते पोलीस स्टेशनच्यावतीने हद्दीतील सक्षम सक्रिय पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक घेण्यात आली. सपोनी परजणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस उपनगराध्यक्ष अतुल पाटील, रिपाईचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष एन. के. साळवे, निजाम काझी, युवराज वाघमारे, सर्व पोलीस पाटील, पत्रकार, सर्व जयंती समितीचे अध्यक्ष उपस्थित होते. सपोनि परजणे म्हणाले की, येणाऱ्या महिन्यामध्ये गुढीपाडवा, रमजान ईद, शिखर शिंगणापूर यात्रा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, भगवान महावीर जयंती, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, महात्मा फुले जयंती, संत झुलेलाल जयंती, संत बसवेश्वर जयंती असे अनेक सण उत्सव येत आहेत. या अनुषंगाने सर्व नागरिकांनी सामाजिक सलोखा निर्माण करावा. शांतता सुव्यवस्थेचे पालन करावे. नातेपुते हे शांतता प्रिय गाव आहे कोणीही मोबाईल सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरू नये, मोबाईलचा दुरुपयोग करू नये, अफवांवर विश्वास ठेवू नका सर्व नागरिकांनी जागृत राहावे असे आवाहन केले. यावेळी रिपाईचे एन के साळवे, निजाम काझी उपनजराध्यक्ष पाटील, प्रमोद शिंदे, विलास भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पिरळे गावचे पोलीस पाटील औदुंबर बुधवले यांनी केले. तर आभार समिर सोरटे यांनी मानले.

## १९५२ पासून आहेरगावकर जपतात लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव परंपरा

### यंदाही १८ ते ३१ मार्च १४ दिवसांचा प्रतिकात्मक वनवास

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२६ मार्च-**

माढा तालुक्यातील आहेरगावात १९५२ पासून लक्ष्मणशक्ती मुक्तोत्सव सोहळ्याची परंपरा जोपासली जात आहे. कोरोनाचा अपवाद वगळता अजून एकदाही या गावात लक्ष्मणशक्ती महोत्सवात खंड पडलेला नाही. यामध्ये सहभागी होणारी गावातील मंडळी चैत्र पाडव्याच्या अगोदर चौदा दिवसाच्या वनवासाला अर्थात गाव सोडून फिरस्तीला जातात. हि परंपरा आजही येथे जपली जात आहे.

जातीभेदांच्या भिंतींपलिकडे जात वनवासाचा चौदा दिवसांचा कालावधी पुर्ण करुन लक्ष्मणशक्तीमुक्ती उत्सव परंपरा आजही ग्रामीण भागात टिकुन आहे. गावातील जी मंडळी वनवासासाठी गावाबाहेर पडतात त्या मध्ये एंड्राँईड मोबाईल वापरणाऱ्या पदवीधारक युवकांपासून ते गावातील अंगठाबहाद्दर ज्येष्ठ नागरिकापर्यंतची मंडळी असतात. आपसातील जातीभेदाच्या भिंती पलिकडे जावुन व्रतवैकल्याचे वनवासी जीवन एकोप्याने उपभोगत ते सहभागी झालेले दिसतात. दरम्यान आहेरगाव येथे वनवासाला निघताना सवाद्य मिरवणूकीने गावच्या वेशीपर्यंत या मंडळींना गावकऱ्यांकडून वनवासासाठी निरोप दिला जातो. तसेच वनवास संपल्यानंतर परत गावच्या वेशीपासून सवाद्य मिरवणूकीने जोरदार स्वागत केले जाते. ही मंडळी गावामध्ये आल्यावर सायंकाळी सहा वाजता रामकथा ग्रंथवाचनास सुरुवात होऊन संपुर्ण रात्रभर ग्रंथांचे वाचन केले जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी आरती, महाप्रसाद कार्यक्रम होवून या लक्ष्मणशक्ती मुक्तोत्सवाची सांगता केली जाते. धर्माधर्मात तेढ, जातीय दंगलींच्या पार्श्वभूमीवर अनेक गावांमधून अशा प्रकारे जातीपातींच्या भिंती पलीकडे जावून लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सवाची परंपरा आजही जोपासली जाते हे विशेष कौतूकास्पद असून स्वार्थी राजकारण्यांनी याचे अवलोकन करुन खरोखर सामाजिक सलोखा जोपासणारा हा एक स्तुत्य उपक्रम आहे हे लक्षात घेतले पाहिजे. दरम्यान ही परंपरा जोपासली जात असताना मागील काही काळापर्यंत चैत्र पाडव्याच्या तोंडावर विविध तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी गोणपाटाचे (टोपड्यापासून ते अंगरख्यापर्यंत ) कपडे धारण केलेले, गळ्यामध्ये टाळ आणि राम, लक्ष्मण, सीतामाई आणि हनुमानाचे एकत्रित चित्र असलेले फोटोफ्रेम आणि मुखी रामनामाचा अखंड जप करणारी मंडळी टोळक्या, टोळक्याने फिरस्ती करताना दृष्टीस पडत असत. या मंडळींना लक्ष्मणशक्ती महोत्सवाचे उपासक असे संबोधले जात असत. सध्या हे प्रमाण जरी कमी झालेले दिसत असले तरी बऱ्याच ग्रामीण भागातील मंडळींकडून अजूनही लक्ष्मणशक्ती महोत्सवाची परंपरा जोपासली जात असल्याचे दिसत आहे.



> **धाराशीवपासून श्वानाचाही सहभाग**
>
> आहेरगावातील गावकऱ्यांच्या सोबत धाराशिव पासून एक श्वान सहभागी झाले आहे. ते दिवसभर त्यांच्यासह भ्रमंती करून मुक्कामाच्या ठिकाणी त्यांच्या सोबतच वास्तव्य करीत आहे. हे श्वान त्यांच्या बरोबरच पंढरपूरात देखील दाखल झाले. या श्वानाने देखील चंद्रभागा स्नान, नगरप्रदक्षिणा करीत त्यांच्या सोबतच वनवास परिक्रमेत पुढे मार्गक्रमण केले.

> **चौदा दिवसांचा असतो वनवासाचा कालावधी**
>
> आहेरगावातून निघाल्यानंतर कैवल्यमठ (कुर्डु ), भगवंत मंदिर (बार्शी), निलकंठेश्वर मंदिर (पांगरी), (सिध्दोबा ) बामलिंग वडगाव, तुळजापूर, नागनाथ मंदिर (वडवळ) या मार्गे बुधवारी पंढरपूरात दाखल झाले आहेत. येथे चंद्रभागा नदीस्नान, विठ्ठल दर्शनानंतर महाळुंग, नरसिंहपूर आदी ठिकाणी मुक्काम करुन वनवासाचा चौदा दिवसांचा कालावधी पुर्ण करीत ही मंडळी सोमवारी (ता.३१) आहेरगावी पोहचणार आहेत.

> **यंदाच्या वनवास परिक्रमेत हे आहेत सहभागी**
>
> भागवत करंडे, आकाश जगताप, रामचंद्र जगताप, नानासाहेब लोंढे, विजय करंडे, महादेव नांदे, शिवाजी जगताप, हरि बंडगर, समाधान भुसनर, ज्योतीराम घाडगे,नवनाथ करंडे आणि पांडुरंग जगताप आदी बारा गावकरी १८ ते ३१ मार्च या चौदा दिवसांच्या वनवासाला बाहेर पडलेली आहेत. सोमवारी (ता.३१) आपल्या गावी पोहोचणार आहेत.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त जात पडताळणी मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने १ ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत 'समता पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे.

या कालावधीत ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम २०२५ -२६ मधील सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विशेष जात वैधता प्रमाणपत्र मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

मोहिमेंतर्गत,तालुका व महाविद्यालय निहाय विद्यार्थ्यांची संख्यात्मक माहिती संकलित करण्यात येणार आहे.तसेच सीईटी परीक्षेस बसणाऱ्या व डिप्लोमा तृतीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अर्ज भरावेत यासाठी वेबिनारचे आयोजन करण्यात येणार आहे.

समान संधी केंद्राच्या माध्यमातून अर्ज जमा करून तत्काळ कार्यवाही केली जाणार असून,विद्यार्थ्यांनी स्वतः च्या महाविद्यालयात पूर्ण अर्ज सादर करून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करावे व या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धाराशिव यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### वारकऱ्यांना ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाटप

**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

तालुक्यातील मोर्डा येथे मंगळवार दि.१८ मार्च ते सोमवार दि.२४ मार्च या कालावधीत एकनाथ शष्टी निमित्ताने श्री जानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताह सोहळा दरम्यान येथील हभप. बाबुराव माळी महाराज व अरुण पवार यांच्या वतीने विविध मान्यवरांच्या उपस्थितीत वारकऱ्यांना २५ ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाटप करण्यात आले. दि.२४ मार्च रोजी काल्याचे किर्तन व काला वाटप हभप. बापुराव माळी यांच्या सुश्राव्य किर्तनाने व महाप्रसादाच्या वाटपाने अतिशय धार्मिक वातावरणात अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. यावेळी मोर्डा ग्रामस्थ उपस्थित होते.



### सूरज मिसाळ याचा सत्कार

**लोहारा, दि.२६ मार्च -**

लोहारा शहरातील शंकरराव जावळे पाटील महाविद्यालयातील सूरज मिसाळ, ह्या विद्यार्थीची अग्निवीर (सैन्यभरती) दलात निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेषेराव जावळे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुरज मिसाळ यांनी या अग्निविर सैन्य भरतीसाठी कठोर परिश्रम व अभ्यासात सातत्य, जिद्द असल्याने मी या भरती झालो आहे. अशी भावना व्यक्त केली आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शेषेराव जावळे पाटील यांनी सुरज यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी प्रा.डॉ. मनोज सोमवंशी, डॉ. विनोद आचार्य डॉ. भैरवनाथ मोटे, डॉ. रामेश्वर धप्पाधुळे प्रा. दत्ता कोटरंगे, डॉ. पार्वती माने, डॉ. सुर्यकांत बिराजदार, डॉ. शिरीष देशमुख, प्रविण पाटील, प्रकाश राठोड, संजय फुगटे, परमेश्वर कदम यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### मधुकर शेळके यांचा राजीनामा

**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

आम आदमी पक्षाचे धाराशिवचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर शेळके यांनी २६ मार्च रोजी त्यांच्या पदाचा आणि पक्ष सदस्याचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याच्या मागणीचे पत्र आम आदमी पार्टीचे जिल्हा अध्यक्ष राहुल मोकाटे यांच्याकडे पाठवला आहे. तसेच पत्रात शहराध्यक्ष किरण यादव यांचा देखील आम आदमी पार्टीच्या तुळजापूर शहराध्यक्ष पदाचा व पक्षाचा राजीनामाचा देत असल्याचा उल्लेख केला आहे. पक्षांमध्ये नेहमीच उल्लेखनीय कार्य करून तुळजापूर शहरात आम आदमी पक्षाची मेड रवणाऱ्या जिल्हा उपाध्यक्ष आणि शहराध्यक्षानी एकत्र मिळून राजीनामा दिल्याने तुळजापूर तालुक्यात पक्षाचे मोठे नुकसान झाले असल्याची चर्चा सुरू झाली आहे.





### शिक्षकरत्न पुरस्काराने सोमवंशी सन्मानित

**जळकोट, दि.२६ मार्च -**

अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, मुंबई संचलित व कोल्हापूर जिल्हा साने गुरुजी कथामाला, कोल्हापुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५७ व्या अधिवेशनात कोल्हापूर येथे जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम यांना राष्ट्रीय शिक्षकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. माणिकराव साळुंखे, माजी कुलगुरू शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, अखिल भारतीय साने गुरुजी कथामालाचे अध्यक्ष शामराव कराळे, लालासाहेब पाटील, शामराव पाटील, मोहनराव मोहाडीकर, सुनील पुजारी यांच्या उपस्थितीमध्ये कोल्हापूर येथील डॉ. आप्पासाहेब उर्फ सा.रे. पाटील सभागृहामध्ये प्रदान करण्यात आला.

### डॉ. आदित्य पतकराव यांना निवेदन

**कळंब, दि.२६ मार्च -**

धाराशिव ते छत्रपती संभाजी नगर व्हाया बीड रेल्वे मार्गावर कळंब रेल्वे स्थानक करणे आणि कळंब रोड ( तडवळे कसबे) येथे सर्व एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्या बाबत कळंब रेल्वे कृती समितीच्या वतीने महाराष्ट्र, मध्यप्रदेश व कर्नाटक राज्याचे प्रादेशिक रेल्वे सल्लागार डॉ आदीत्य पतकराव (पुणे) अंबाजोगाई दौऱ्यावर आले असताना त्यांना अंबाजोगाई येथे भेटून निवेदन देण्यात आले. व यावेळी डॉ. रामकृष्ण लोंढे व डॉ. अमीत पाटील यांनी सदरील रेल्वे मार्ग कळंब करांच्या सोईच्या दृष्टीने आखण्यात यावा. तसेच कळंब रोड येथे लातूर-मुंबई सह ईतर सर्व एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्यासंदर्भात सविस्तर चर्चा केली.

# सोलार पंप बसविण्यासाठी कंपन्या निवडीचे अधिकार शेतकऱ्यांना द्या : आ. कैलास पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

पीएम कुसुम व मागेल त्याला सोलार या योजने अंतर्गत सोलार पंप बसविले जात आहेत. पण पुरवठादार कंपनी निवडण्याचे अधिकार शेतकऱ्यांना असले पाहिजेत अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात लक्षवेधीच्या माध्यमातुन करण्यात आली. त्यावर मंत्री मेघना बोर्डीकर यांनी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून धोरण ठरवू असे उत्तर दिले.

यावेळी आ. पाटील म्हणाले, पीएम कुसुम व मागेल त्याला सोलार या योजना महत्वाकांक्षी आहेत. मात्र यातील एक अडचण आता समोर येत असून त्याकडे आमदार पाटील यांनी सरकारचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांना ठराविक पुरवठादार कंपन्याचे पर्याय असून त्यातीलच एखादी कंपनी निवडावी लागते. धाराशिव जिल्ह्यात अशा ४५ कंपन्याकडून पंप बसविण्यात येत आहेत. या सर्व कंपन्या परराज्यातील आहेत. त्यामुळे त्यांनी एक-एक वर्ष होऊन देखील पंप बसविलेले नाहीत. त्या कंपन्या शेतकऱ्यांकडूनच अर्धी कामे करून घेत असल्याच आमदार पाटील यांनी सांगितले. त्यामुळे या ठराविक पुरवठादार कंपन्या ऐवजी जर खुल्या बाजारातुन कोणत्या कंपनीकडून काम करून घ्यायचे हे अधिकार संबंधित शेतकऱ्यांना असले पाहिजेत. जेणेकरून पुढील काळात काही पंपाची दुरुस्ती करायची असेल तर त्याची सोय करणे सोपं होणार आहे, आता कंपन्या दुरुस्तीची करत नसल्याचे समोर आले आहे. आकडेवारीवरून



देखील शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात येत आहे. म्हणजे सात लाख पाच हजार शेतकऱ्यांनी हिस्सा भरला आहे, त्यात पाच लाख २३ हजार शेतकऱ्यांनी कंपनी निवडली आहे. पण एक लाख ८२ हजार शेतकऱ्यांनी पुरवठादार कंपनीची निवड केलेली नाही. याचा अर्थ त्यांना यातील कोणतीही कंपनी कडून काम करायचे नाही हे सिद्ध झालं आहे. कारण या कंपन्या कुठल्या त्याबद्दल शेतकऱ्यांना अजिबात कल्पना नाही. शेतकऱ्यांना थेट खात्यावर पैसे टाकून कोणत्या कंपणीकडून काम करायचे हे त्या शेतकऱ्यांना ठरविण्याचे अधिकार सरकार देणार का? तसेच जे पारंपारीक वीज कनेक्शन आहेत त्यांना सोलार मध्ये यायचं असेल तर तस केल जाईल का असा सवाल आ. पाटील यांनी सरकारला केला.

त्यावर मंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की सोलार पंप बसविण्याचे काम मार्च अखेर पूर्ण होईल. पुरवठादार कंपन्या निवडण्याचे अधिकार शेतकऱ्यांना देण्याबाबत मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करूनच धोरण ठरवता येईल असं उत्तर त्यांनी दिले.

## तुळजाभवानी चैत्री यात्रा पूर्वनियोजन बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीची चैत्री पौर्णिमा यात्रा महोत्सव दि.११ ते १५ एप्रिल या कालावधीत सुरु होणार असून सदर यात्रेस येणाऱ्या भाविकांना सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात व यात्रा महोत्सव सुरळीतपणे संपन्न व्हावा या दृष्टीकोनातून तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने २६ मार्च रोजी मंदिर प्रशासकीय कार्यालयात उपविभागीय जिल्हाधिकारी तथा मंदिर विश्वस्त अरुणा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली यात्रेची पूर्वनियोजनाची बैठक घेण्यात आली.

तहसीलदार तथा मंदिर विश्वस्त अरविंद बोळंगे, न.प. मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यात्रा काळामध्ये गर्दी न होता भाविकांना सुरळीत दर्शन आणि शहरात येणाऱ्या भाविकांना सर्व सोयी सुविधेसाठी प्रत्येक विभागांना दिलेली जबाबदारी चोख पार पाडण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी मंहत वाकोजी बुवा, मंहत हमरोजी बुवा, सिद्धेश्वर इंतुले, अनिल चव्हाण, ओमकार काटकर, विश्वास कदम, जयसिंग पाटील, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, धनंजय लोंढे, वैभव पाठक, जगदीश पाटील आदीसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## कळंब तालुक्यातील दोन अट्टल आरोपी जिल्ह्यातून हद्दपार

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२६ मार्च -**

कळंब पोलीस स्टेशन अंतर्गत विविध गुन्ह्यात गुन्हेगार असलेले अमोल नाना काळे (रा. कन्हेरवाडी) पाटी व तानाजी हरी काळे (रा. ईटकुर) येथील अट्टल गुन्हेगार यांना धाराशिव जिल्ह्यातुन हद्दपारीची नोटीस काढण्यात आली आहे. कायद्याचा कोणताही आदर नकरता वाटेल तेव्हा विविध प्रकारचे गुन्हे करत होते. त्याअनुशंघाने पोलीस स्टेशन कळंब येथे वेगवेगळया कलमान्वये गुन्हे दाखल होते. त्यामुळे परिसरात व सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या अनुषंगाने संजय पाटील उपविभागीय दंडाधिकारी उपविभाग कळंब यांनी सदरील गुन्हेगारांना धाराशिव जिल्ह्यातून पुढील तीन महिन्याकरिता हद्दपार करण्यात आलेले आहे.



या आदेशात असे म्हटले आहे मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये विविध केलेल्या शक्तीचा वापर करून उपविभागीय दंडाधिकारी संजय पाटील या आदेशाच्या तारखेपासून दोन दिवसाच्या आत रेल्वे, रस्ते मार्गाने धाराशिव जिल्ह्याच्या हद्दीतून निघून जाईल किंवा त्याला घालवून दिले जाईल व त्या तारखेपासून तीन महिने धाराशिव जिल्ह्याच्या क्षेत्रात यांनी उपविभागीय दंडाधिकारी उपविभाग कळंब महाराष्ट्र शासनाच्या परवानगी शिवाय प्रवेश करू नये व परत येऊ नये असे आदेशाच्या कालावधीत राज्यात इतरत्र राहील तेथील नजीकच्या पोलीस स्टेशनला त्यांनी महिन्यातून एकदा त्याने राहण्याचे ठिकाण संपूर्ण पत्ता व त्यात बदल झाला की नाही ही माहिती द्यावी व महाराष्ट्र राज्याबाहेर निघून जाण्याच्या दहा दिवसाच्या आत संबंधित पोलीस स्टेशनला माहिती पोस्टाने व इतर मार्गाने दिली पाहिजे व महाराष्ट्र राज्यात आल्यानंतर दहा दिवसाच्या आत राहत असलेल्या भागाचे नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती दिली पाहिजे असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

तसेच आणखी पाच गुन्हेगारांनाही संजय पवार उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग कळंब यांच्या मार्गदर्शनाखाली हद्दपार करण्यात येणार आहे.

## जिल्हा मजूर संघाच्या निवडणुकीत नारायण नन्नवरे यांच्या विजयाची हॅट्रिक



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

धाराशिव जिल्हा मजूर सहकारी संघाच्या निवडणुकीची धामधूम जिल्ह्यात सुरू असून संघाच्या या निवडणुकीत तुळजापूर तालुका सर्वसाधारण मतदार संघातून भाजपचे उमेदवार नारायण पांडुरंग नन्नवरे हे बिनविरोध निवडून आले आहेत.

मंगळवारी दि.२५ उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा शेवटचा दिवस होता. या दिवशी विरोधी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार शरद जगदाळे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे नारायण नन्नवरे यांची बिनविरोध निवड झाली. तुळजापूर तालुका सर्वसाधारण मतदार संघातून एकूण तीन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

त्यातील ज्ञानेश्वर सरडे यांचा उमेदवारी अर्ज छाननी मध्ये बाद करण्यात आला होता. मजुर संघाचे विद्यमान चेअरमन नारायण नन्नवरे हे तुळजापूर तालुका सर्वसाधारण मतदार संघातून सलग तीन वेळा बिनविरोध निवडून आले आहेत.

त्यांच्या या निवडीचे मोठ्या जल्लोषात फटाके फोडून व गुलालाची उधळण करून स्वागत करण्यात आले.

यावेळी सज्जन जाधव, श्रीकांत भोजने, शिवाजी गायकवाड, साहेबराव घुगे, जिलानी कुरेशी, इब्राहिम मकाजी, प्रसाद पानपुडे अजिंक्य नन्नवरे, अरुण पवार यांनी नन्नवरे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## उद्योजक किशोर धारूरकर यांना आदर्श समाज भूषण पुरस्कार जाहीर

**वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

अखिल सोनार समाज प्रतिष्ठान तर्फे धाराशिव येथील उद्योजक प्राची केमिकल्स प्रोप्रायटर किशोर धारूरकर यांना आदर्श समाज भूषण पुरस्कार जाहीर श्री क्षेत्र पंढरपूर येथे दि.२८ मार्च रोजी अखिल सोनार समाज प्रतिष्ठान अंबाजोगाई जिल्हा बीड व सोनार हक्क परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव येथील उद्योजक किशोर दत्तात्रेय धारूरकर यांना आदर्श समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



महाराष्ट्र शासनातर्फे दि.२६ मार्च रोजी जिल्हा उद्योग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

त्यांचे सर्व सोनार समाज बांधवांच्या वतीने व मित्रपरिवार च्या वतीने कौतुक होत आहे.

## चार गाव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत तेरला शुद्ध पाणी पुरवठा सुरु



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२६ मार्च -**

गेल्या अनेक वर्षांपासून धरण उशाला अन कोरड घशाला अशी परिस्थिती तेर व चार गाव पाणी पुरवठा योजनेची होती. कित्येक वर्षांपासून बंद असलेल्या तेरसह चार गावातील पाणीपुरवठा योजनेचे पाणी अखेर सोमवारी सायंकाळी दि.२४ तेरसाठी उपलब्ध करून देण्यात आली.

ग्रामस्थासाठी शुद्ध पाणी पुरवठा चालु करण्यात आल्याने समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी उपसरपंच श्रीमंत फंड, माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, विठ्ठल लामतुरे, धनंजय आंधळे, नामदेव कांबळे, ग्राम पंचायत कर्मचारी उपस्थित होते.

प्राधिकरणाकडे तोट्यात असलेली ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झाल्यानंतर जिल्हा परिषदेने चार गावची सुकाणू समिती स्थापन केली. परंतु, योजना सुरू होण्यासाठी संकटाचा सामना करावा लागत होता.

ही योजना सुरू व्हावी व तेरला शुद्ध पाणी मिळावे म्हणून अनेक वर्षापासून ग्रामस्थांना अपेक्षा होती. अखेरीस २४ मार्च रोजी तेरसाठी शुध्द पाणी पुरवठा चालू करण्यात आला. दरम्यान, ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायतच्या सदस्याचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

यावेळी उपसरपंच श्रीमंत फंड, ग्राम पंचायत समिती सदस्य वापू नाईकवाडी, अजित कदम, नवनाथ पसारे, तानाजी पिंपळे, सचिन देवकते, खरेदी विक्री संघाचे संचालक गणेश फंड, किशार काळे, प्रविण साळुंखे, अमोल कसबे, रमेश लकडे, केशव सलगर यांची उपस्थिती होती.

## श्री संत गोरोबा काका मंदिराच्या कामासंदर्भात अमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

तेर येथील श्री संत गोरोबा काका यांचे समाधी मंदिरात महाद्वाराचे दक्षिण दिशेला चालू असलेले काम वास्तुशास्त्रानुसार पुर्व दिशेला करणे अन्यथा दि.२ एप्रिल रोजी कुंभार समाजाच्या वतीने व तेर ग्रामस्थांच्या वतीने महादेव खटावकर अमरण उपोषण कलर असल्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी विनंती दिली आहे.

## जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची ३ एप्रिल रोजी बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीतील त्रैमासिक सभा ३ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात होणार आहे. या बैठकीत भ्रष्टाचारासंदर्भातील तक्रारींवर चर्चा होणार आहे.

९० दिवसांत कार्यवाही न झाल्यास, तक्रारदार जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे पुराव्यासह तक्रार करू शकतो.

तक्रार दाखल करताना, आधीच्या टप्प्यांतील अर्ज व पुराव्यांची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

## दिव्यांग विद्यार्थ्यांचा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याद्वारे १३ ऑक्टोबर २०१० रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, दिव्यांग विद्यार्थ्यांना क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी मिळावी यासाठी जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ३ डिसेंबर, आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनाच्या उपलक्ष्याने या स्पर्धा दरवर्षी आयोजित केल्या जातात. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेतून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळते.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात २१, २२ आणि २३ मार्च २०२५ रोजी



नागपूर येथील रेशम बाग येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. धाराशिव जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केले.

जिल्ह्यातील विविध शाळांनी एकूण ५४ पदकांची कमाई केली, ज्यात १३ सुवर्ण, ६ रजत आणि ४ कांस्य पदके समाविष्ट आहेत.

खास करून, धाराशिव जिल्ह्यातील सास्तूर निवासी अपंग शाळा, ब्रिलीयंट अपंग प्रशिक्षण केंद्र बेंबळी, नवजीवन अपंग प्रशिक्षण केंद्र खानापूर, आणि कै. उध्दवरावजी पाटील अस्थिव्यंग निवासी विद्यालय या शाळांनी मोठ्या यशाची गाथा लिहिली.

त्याचप्रमाणे, मतिमंद विद्यार्थ्यांच्या शाळांमध्ये देखील उत्तम कामगिरी दिसली. स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह, शाळा आळणी, तुळजाभवानी मतिमंद मुलांचे बालगृह, शाळा एकुरगावाडी आणि सिध्दराम म्हेत्रे मतिमंद निवासी शाळा अंबेवाडी यांचा यशस्वी सहभाग होता.

या विजेत्या खेळाडूंना आणि त्यांच्या शिक्षकांना जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनिल खमितकर यांनी अभिनंदन व सत्कार केला. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या या यशामुळे त्यांच्या आत्मविश्वासात वृद्धी झाली असून, ते समाजात एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून पुढे येत आहेत.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वैष्णवी यादव, श्रेया धुमाळ, अक्षरा तोडकर यांची नवोदय विद्यालयासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२६ मार्च -**

कळंब शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हासेगाव केज आहे.

या शाळेचा जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हासेगाव केज येथील वैष्णवी प्रदीप यादव, श्रेया पांडुरंग धुमाळ, अक्षरा वैभव तोडकर यांची निवड झाली आहे. या निवडीमुळे हसेगाव शाळेतील गेल्या वर्षी ३ विद्यार्थी व चालू वर्षीही ३ विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र ठरले आहेत. वरील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन राजाभाऊ गुंजाळ, प्रशांत घुटे, शिवराज मेनकुदळे, विकास खारके, लक्ष्मी कोकाटे, चौधरी व सर्व शिक्षक मुख्याध्यापक रामेश्वर जगदाळे यांनी केले.

या यशाबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.






https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

### धाराशिवमध्ये जागतिक क्षयरोग दिन साजरा

**धाराशिव, दि.२६ मार्च -**

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-२, रामनगर, धाराशिव येथे २४ मार्च रोजी विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात क्षयरोग निर्मूलन प्रतिज्ञा घेऊन झाली. यावेळी क्षयरोग निदान, मोफत औषधोपचार तसेच रुग्णांना मिळणाऱ्या आर्थिक लाभांविषयी माहिती देण्यात आली. नागरी भागातील नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. गुंड, डॉ. लोखंडे, तालुका कार्यालय पर्यवेक्षक व्हटकर, टी.बी. कार्यालय पर्यवेक्षक राजेंद्र पवार, तसेच सर्व आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

### जिल्ह्यात २१ वी पशुगणना यशस्वीपणे पूर्ण

**धाराशिव, दि.२६ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यात २५ नोव्हेंबर ते ३१ मार्च या कालावधीत राबविण्यात आली. २१ वी पशुगणना २१ मार्च रोजी १०० टक्के पूर्ण करण्यात आली आहे. पशुसंवर्धन विभागाने नियुक्त केलेल्या ११० प्रगणक आणि २४ पर्यवेक्षकांच्या मदतीने हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. या पशुगणनेअंतर्गत जिल्ह्यातील ८९८ गावे आणि शहरी प्रभागांतील सर्व पशुपालक व शेतकऱ्यांकडील पशुधनाची नोंदणी पूर्ण करण्यात आली. प्रगणकांनी घरोघरी भेट देत ही गणना पूर्ण केली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. २१ वी पशुगणना यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व पशुपालक, शेतकरी आणि नागरिकांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

### गिग वर्कर्स आणि ग्रीगेटर यांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी

**धाराशिव, दि.२६ मार्च -**

केंद्र सरकारने गिग वर्कर्स,प्लॅटफॉर्म वर्कर्स आणि ॲग्रिगेटर्ससाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे.गिग आणि प्लॅटफॉर्म वर्कर्समध्ये शेअरिंग वाहनसेवा, अन्न व किराणा पुरवठा, लॉजिस्टिक्स, हेल्थकेअर, ट्रॅव्हल, मीडिया आणि इतर ऑनलाइन सेवा पुरवठादारांचा समावेश होतो. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिंत्रा, स्विगी, झोमॅटो यांसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या कामगारांनी १ एप्रिलपर्यंत eshram.gov.in या पोर्टलवर नोंदणी करावी. तसेच, डिजिटल मध्यस्थी करणाऱ्या सर्व सेवा पुरवठादारांनी (ॲग्रिगेटर्स) ३१ मार्च २०२५ पूर्वी register.eshram.gov.in//user/platform-worker-registration या संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे.

## तुळजापुर तालुक्यात अवैध धंदे ते ड्रग्ज तस्करांनी जो धुमाकुळ...

# अभय कुणाचे? ड्रग्ज तस्करांना अभय देणारा आका कोण?

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२६ मार्च -**

तुळजापुर तालुक्यात अवैध धंदे ते ड्रग्ज तस्करांनी जो धुमाकुळ घातला आहे. त्याला अभय कुणाचे? ड्रग्ज तस्करांना अभय देणारा आका कोण? याच्या मुळापर्यंत जावुन पोलिसांनी आई भवानीचा तुळजापुर तालुका अवैध धंदे व ड्रग्ज मुक्त करणे गरजेचे आहे. तुळजापुर व नळदुर्ग शहर हे सध्या ड्रग्ज या आंमली पदार्थाचा अड्डा बनल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे या दोन्ही शहरातुन अवैध धंद्यासह ड्रग्ज कायमचे हद्दपार व्हावे यासाठी पोलिसांबरोबरच नागरीकांनीही सतर्क राहुन प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्यथा या दोन्ही शहरातील युवा पिढीचे अस्तित्व धोक्यात आहे.

तुळजापुर तालुक्यात आज प्रत्येक गावात अवैध धंदे खुलेआम सुरु आहेत. नळदुर्ग शहरात मटका एजंटानी धुमाकुळ घातला आहे या मटका एजंटाना कायद्याचा कुठलाच धाक राहिला नसल्याचे दिसुन येत आहे. आज बसस्टॅन्ड परीसरात मटका एजंटानी खुलेआम जी दुकाने थाटली आहेत. यावरून या मंडळींच्या पाठीशी असा कोणता मोठा आका आहे हे समजत नाही. यापुर्वी मटका सुरु होता. मात्र तो लपुन छपुन चालत असे मात्र आज बसस्टॅन्डला चिकटुन मटका एजंटानी आपली दुकाने थाटली आहेत. या दुकानात मटका एजंटानी कुलर, पंखे लावण्याबरोबरच गाद्याही टाकल्या आहेत. इतके खुलेआम सुरु असताना त्यांच्याकडे कुणाचेच



लक्ष का जात नाही हे समजत नाही. वास्तविक पाहता अवैध धंदे इतके खुलेआम सुरु राहावेत हा पोलिसांचा अपमान आहे? त्यामुळे पोलिसांनी परवाच झालेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत दिलेल्या आश्वासनानुसार नळदुर्ग शहरातील मटका बंद करणे गरजेचे आहे.

तुळजापुर तालुक्यात एमडी ड्रग्ज सारख्या जीवघेण्या आंमली पदार्थाची मोठया प्रमाणात विक्री होण्याची घटना उघडकीस आल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. पोलिसांनी याप्रकरणी अतिशय चांगल्या प्रकारे कारवाई करून जवळपास २५ आरोपिंच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. यातील आरोपींची नावे पाहता यामध्ये ज्या आरोपिंचा समावेश आहे. त्यामध्ये राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचा नव्हे स्वताला नेते म्हणवुन मिरविणाऱ्यांचा चा समावेश आहे. या ड्रग्जमुळे युवापिढी अक्षरशा बरबाद झाली आहे. या ड्रग्जमुळे अनेकांची घरे उध्वस्त झाली आहेत. तुळजापुर शहरातील कांही मंडळींनी या ड्रग्जमधुन मिळालेल्या अफाट पैशातुन नागरीकांना अन्नधान्यांचे कीट वाटप करुन स्वताला समाजसेवक म्हणवुन घेण्याचा खटाटोप केला आहे. अशी फालतुगिरी करणाऱ्या मंडळींना कोणत्याच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी आपल्या पक्षात थारा देऊ नये. अवैध धंदे व ड्रग्ज प्रकरणात कुणीही राजकारण करू नये. यामध्ये ज्यांचा सहभाग असेल त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई व्हावी यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे.

समजसेवेचा मुखडा घालुन असे समजविघातक कार्य करणाऱ्या मंडळींना नागरीकांनी लाथाडले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने या मंडळींना त्यांच्या पापाची शिक्षा मिळाल्यासारखे होणार आहे.

एमडी ड्रग्ज प्रकरण पोलिसांनी व्यवस्थित हाताळले आहे. याच्या मुळात जाऊन पोलिसांनी ज्या आरोपिंवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे असे कृत्य करून समाजामध्ये उथळ माथ्याने फिरत होते. त्यांचा बुरखा फाडला आहे. याच पद्धतीने पोलिसांनी नळदुर्ग शहरातील मटका व जळकोट येथील चक्री जुगार बंद करण्यासाठी कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## तुळजापूर शहरात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

बेलस्टार मायक्रोफायनान्स लिमिटेड, हॅन्ड इन हॅन्ड इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५ मार्च मंगळवार रोजी येथील अयोध्या नगर हडको भागातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर विद्याधाम प्रायमरी स्कूल येथे संपन्न झाले. तुळजाभवानी देवीच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

सदर शिबिरामध्ये गावातील १०४ लोकांनी लाभ घेतला, सर्दी, खोकला, ताप, पोटाचे विकार, महिलांचे आरोग्य आणि इतर सामान्य अशा विविध आजारावर तपासणी, मार्गदर्शन व मोफत औषध उपचार करण्यात आले. डॉ. शहनवाज झाहीर यांनी रुग्णांची तपासणी केली

यावेळी बेलस्टार मायक्रो फायनान्स क्षेत्रीय समन्वयक अब्दुल करीम मणियार हॅन्ड इन हॅन्ड इंडिया महाराष्ट्र राज्य समन्वयक परमेश्वर कांबळे, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य आनंद कंदले, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष सचिन ताकमोघे, गुलचंद व्यवहारे, संदीप गंगणे, धैर्यशील दरेकर, दिनेश क्षीरसागर, नंदकुमार हाजगुडे, गुरुप्रसाद भूमकर राम चोपदार, प्रबोधनी भूमकर, काजल पवार, सिद्धेश्वर पाटील, अनिल गायकवाड जिल्हा समन्वयक राहुल देशमुख बेलस्टार मायक्रो फायनान्स सी.आर.एम. अतुल राऊत, तालुका व्यवस्थापक सुरेखा पवार, नीलंबरी ढवळे, अनुराधा चव्हाण, फार्मासिस्ट नितीन पवार लॅब असिस्टंट सारंग देशमुख आदींची उपस्थिती होती.

## आता स्वस्त धान्य दुकानात विक्रीस उपलब्ध होणार जिल्ह्यातील बचत गटांच्या उत्पादित वस्तू



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मार्च -**

जिल्ह्यातील बचत गटांच्या उत्पादित वस्तूंना जिल्ह्यातच एक बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पुढाकार घेतला आहे. आता लवकरच जिल्ह्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानात जिल्ह्यातील बचत गटांच्या महिलांनी तयार केलेल्या उत्पादित वस्तू व साहित्य विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

२५ मार्च रोजी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यातील आठही तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विलास जाधव व जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी पुजार यावेळी म्हणाले की, बचतगटांच्या महिला ह्या दर्जेदार उत्पादन करतात. मात्र त्यांच्या उत्पादित वस्तू व साहित्याची विक्री ही केवळ मेळावे व कार्यक्रमाच्या माध्यमातून लावण्यात येणाऱ्या स्टॉलवरूनच करण्यात येते. मात्र स्वस्त धान्य दुकानातून त्यांच्या वस्तूला वर्षभर बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे त्यांच्या वस्तू व साहित्याची विक्री स्वस्त धान्य दुकानातून होणार असल्यामुळे आणखी वस्तू व साहित्य निर्मिती करण्यास बचतगटांना प्रोत्साहन मिळेल.

बचत गटांच्या उत्पादित वस्तूंवर ग्राहकांचा विश्वास असल्यामुळे त्यांच्या वस्तू व साहित्याची विक्री स्वस्त धान्य दुकानातून मोठ्या प्रमाणात विक्री होण्यास मदत होईल. स्वस्त धान्य दुकानदारांना सुद्धा त्यांचे कमिशन बचत गट देणार आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदार संघटनांच्या प्रतिनिधींनी सुद्धा बचत गटांच्या वस्तू व साहित्याची विक्री करण्यास चांगला प्रतिसाद दिला.

त्यामुळे लवकरच जिल्ह्यातील बचत गटांच्या उत्पादित वस्तू स्वस्त धान्य दुकानातून मिळण्यास मदत होणार आहे. चांगला उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

## विद्याधाम शाळेत विज्ञान प्रदर्शन स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मार्च -**

येथील विद्याधाम प्रायमरी स्कूल मध्ये विज्ञान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शन स्पर्धेचे बक्षीस वितरण दि.२५ सप्टेंबर रोजी करण्यात आले. प्रथमता तुळजाभवानी देवीच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.




शाळेच्या मुख्याध्यापिका प्रबोधिनी भूमकर यांनी प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन करताना सांगितले की, शाळेतील लहान चिमुकल्यांनी खूप सुंदर सुंदर असे विज्ञान प्रोजेक्ट तयार केले होते. यामध्ये नर्सरीचे विद्यार्थी नक्ष सुत्रावे, अनिमेष गडाम, एलकेजीचे शिवांश वझे, राजवीर दाणे, युकेजीचे धनश्री वेदपाठक आशिका नवगिरे, जागृती पठाडे, आणि फर्स्ट स्टँडर्डचे शार्विका चिंचोलीकर, दर्शन कोकाटे, सुरभी जाधव, काव्य जाधव आणि राजवीर कदम या विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय असे बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी रुग्ण कल्याण समितीचे सदस्य आनंद कंदले, सचिन ताकमोघे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संदीप गंगणे, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे, भाजप शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, भाजपचे युवा नेते दिनेश क्षीरसागर, भाजप शहराध्यक्ष राम चोपदार, अनिल गायकवाड राहुल देशमुख, सुरेखा पवार, निलंबरी कांबळे, शालव्ह रोकडे, हे मान्यवर उपस्थित होते.

## मुरूम स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२६ मार्च -**

मुरूम शहरातील बसस्थानक समोरील लिंगायत समाज स्मशानभूमीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने दोन दिवसात स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करून स्वच्छता करावी.अशी मागणी शहरातील लिंगायत समाज बांधव व महात्मा बसवेश्वर युवक मंडळाच्यावतीने निवेदनाद्वारे पालिका प्रशासनाला करण्यात आली आहे. दरम्यान याप्रकरणी काही मंडळी दोन समाजात द्वेष निर्माण करत आहेत. त्यामुळे भविष्यात मोठा वाद होण्याची शक्यता वर्तवली जात असून प्रशासनाने याबाबत वेळीच निर्णय घेणे गरजेचे आहे.

मुरूम शहरातील बस स्थानकसमोर सर्वे नं १३१/१ मध्ये ५९ आर इतकी लिंगायत समाज समशानभूमीची जागा आहे.सध्या या जागेत इतर समाजातील अनेकांनी अतिक्रमण करून दुकाने थाटले आहेत. यात गावठी दारू विक्री, मटका, मटण चिकण विक्री दुकाने व्यवसाय सुरू आहेत. त्यामुळे लिंगायत समाजाच्या भावना दुखावल्या जात आहेत. त्यामुळे सदरील अतिक्रमण हटवण्यासाठी लिंगायत समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. यासाठी अतिक्रमणमुक्त स्मशानभूमी करण्यात यावी. म्हणून यापूर्वी पालिका प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते.

मात्र या मागणीकडे दुर्लक्ष होत असून दिवसेंदिवस या जागेत अतिक्रमण वाढत चालले आहे. याबाबत महात्मा बसवेश्वर युवक मंडळाने आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या दोन दिवसात लिंगायत स्मशानभूमी अतिक्रमण मुक्त करून स्वच्छ करावे. अन्यथा पालिकेवर मोर्चा काढण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.


### करमाळा नगरपरिषद, करमाळा

जा.क्र./विद्युत विभाग/३८७/२०२५ दिनांक २६/०३/२०२५

**जाहीर निविदा प्रसिध्दीकरण**

करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर
जाहिर निविदा प्रसिध्दीकरण सूचना

करमाळा नगरपरिषदेकडील विद्युत विभागासाठी सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) अंतर्गत करावयाच्या खालील कामांसाठी जाहीर निविदा अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक दरपत्रक मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | कोरी निविदा फी |
|---|---|---|---|---|
| 1 | करमाळा शहरातील रोड लाईटचे अद्यावतीकरण करणेसाठी (हाय मास्ट वरील LED दिवे व रोड लाईटसाठी वापरण्यात आलेले LED दिवे वगळून). | 988756 | 10000 | 1000 |

१) जाहिर निविदा फॉर्म विक्री न.पा. कार्यालयात दि. 27/03/2025 पासून ते दि. 02/04/2025 सायं. 6.00 वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.
२) जाहिर निविदा फॉर्म स्वीकृती दि. 03/04/2025 रोजी सायं. 4.00 वाजेपर्यंत.
३) जाहिर निविदा उघडण्याचा दिनांक 04/04/2025 रोजी सकाळी 11.00 वा.
४) सर्व पात्र इच्छुक निविदाधारकांनी निविदा फॉर्म घेणेसाठी न.पा. च्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपलब्ध आहेत.

**शर्ती व अटी-**
१) कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नामंजूर करणेचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
२) निविदा धारकांनी निविदा फॉर्म लिफाफे दि. 03/04/2025 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत करमाळा नगरपरिषद कार्यालयात जमा करावयाची आहेत.
३) कोणत्याही बाबींसाठी काही तंटा निर्माण झाल्यास याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहिल.

सही
(सचिन तपसे)
मुख्याधिकारी/प्रशासक
करमाळा नगरपरिषद


## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते नवोदय पात्र विद्यार्थ्यांचा हासेगावमध्ये सत्कार

### वैष्णवी यादव, अक्षरा तोडकर, श्रेया धुमाळ, समर्थ तोडकर यांचा झाला सन्मान...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२६ मार्च -**

१८ जानेवारी रोजी झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश पात्र परीक्षा मध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चे प्राचार्य दयानंद जटनुरे, शिक्षणाधिकारी (प्रा) अशोक पाटील, उपविभागीय अधिकारी संजय पाटील, गटविकास अधिकारी रावसाहेब चकोर, शिक्षक संघाचे उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, गट शिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, विस्तार अधिकारी सुशील फुलारी, प्रभारी उपशिक्षणाधिकारी संतोष माळी, विस्तार अधिकारी जंगम, मुख्याध्यापक रामेश्वर जगदाळे यांच्या हस्ते वैष्णवी प्रदिप यादव, अक्षरा वैभव तोडकर, श्रेया पांडुरंग धुमाळ व समर्थ अशोक तोडकर यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ धाराशिवच्या वतीने जिल्हाभर राबवत असलेल्या गुढी पाडवा प्रवेश वाढवा अभियान अंतर्गत पहिलीच्या विद्यार्थांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. दि.५ मार्च महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने निर्णयातील तरतुदी प्रमाणे पहिली व दुसरी विद्यार्थ्यांचे चावडी वाचन घेण्यात आले. शासन निर्णयात अपेक्षित क्षमता प्राप्त शाळा असल्याने प्रगत शाळा म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हसेगांव के स्वयंघोषित करण्यात आले. याप्रसंगी शाळेत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या भोजन कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले की सर्व सोयींनी युक्त अशी हसेगावची शाळा आहे . यामुळे शाळेचा सर्वांगीण विकास झाला आहे. जिल्ह्याच्या या टीमने शाळेच्या परिसराची पाहणी केली यावेळी परसबाग, विद्यार्थांच्या जेवणाची व्यवस्था, क्रीडांगण इ.सर्व भौतिक सुविधांची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले. नवोदय पात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे राजाभाऊ गुंजाळ, प्रशांत घुटे, लक्ष्मी कोकाटे, शिवराज मेनकुदळे, विकास खारके, उषा चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.

## तेरमध्ये निराधारांसाठी डीबीटीद्वारे ऑनलाईन नोंदणीसाठी ३ दिवसीय शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२६ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे श्रावणबाळ सेवा राज्य निवृती वेतन योजना व संजय गांधी निराधार योजना तसेच सर्व विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांची नोंदनी ऑनलाईन डीबीटी प्रनालीवरती करण्यासाठी तलाठी कार्यालय उद्या दि.२६ पासुन तहसील कार्यालय यांच्या आदेशानुसार ३ दिवसीय शिबीरचे आयोजन करण्यात आले आहे.

आवश्यक असनारे सर्व कागदपत्रे सोबत घेऊन यावे व जास्तीत जास्त निराधारांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन तलाठी प्रशांत देशमुख यांच्यावतीने करण्यात आले आहे.

निराधार लाभार्थी यांना केंद्र व राज्या शासनाच्या शासनाच्या सूचनेनुसार बँकाखात्याला आधार डीबीडी करणे गरजेचे आहे तसेच लाभार्थ्यांना यापुढील सर्व पैसे हे डीबीटी प्रणालीद्वारे हस्तांतरीत करण्यात येणार आहे. यासाठी मागील पाच ते सहा महिन्यांपासून संजय गांधी विभाग यांच्याकडून सर्व लाभार्थी यांना आवाहन करण्यात आले होते व डीबीटी साठीही अनेक लाभार्थी यांना नोटीस देण्यात आल्या.

काही लाभार्थी यांनी या सर्व गोष्टी करूनही मानधन जमा झाले नाही तसेच काही लाभार्थी यांचे एक महिन्याचे तर काही लाभार्थी यांचे दोन महिन्याचे मानधन जमा झाले आहे.

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नीता मोरे यांच्या कथासंग्रहाचे महाराष्ट्र शासनस्तरावर प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२६ मार्च -**

येथील लाल बहादुर शास्त्री माध्यमिक विद्यालय उदगीर येथील सहशिक्षिका नीता मोहनराव मोरे यांच्या 'हळवा कोपरा' या कथासंग्रहाची निवड महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणेच्या वतीने समग्र शिक्षा अंतर्गत शालेय ग्रंथालयासाठी करण्यात आली.

पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या मुख्यालयात या कथासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. प्रस्तुत कथासंग्रहाच्या ४१५०० प्रति छापून महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत या कथासंग्रहाचे वितरण केले जात आहे. समग्र शिक्षा २०२४-२५ योजनेच्या ग्रंथालय अनुदानातून शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या ग्रंथालयांसाठी पुस्तकांचे मोफत वितरण तालुका गटसाधन केंद्रमार्फत केले जात आहे. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, माधव मठवाले, अनिता मुळखेडे यांच्या हस्ते नीता मोरे यांचा शाल श्रीफळ पुष्पहार व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य शंकरराव लासुने, शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हूरदळे, कृष्णा मरावार, किरण नेमट, गटशिक्षणाधिकारी शफी शेख, विस्तार आदि उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### आर्ट ऑफ लिव्हिंगचे शिबिर उत्साहात संपन्न

**शिरूर अनंतपाळ, दि.२६ मार्च -**

शिरूर अनंतपाळ शहरातील अनंतपाळ नुतन विद्यालय येथे आर्ट ऑफ लिव्हिंग शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिरात शहरातील व परिसरातील अनेक नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सहा दिवसाच्या शिबिरात योगाविषयी, प्राणायामसंबंधी सविस्तर माहिती दिली घेली त्याचबरोबर आहार, विहार संदर्भात सखोल मार्गदर्शन केले गेले. यावेळी ज्यांनी या शिबिरात मार्गदर्शन केले असे आर्ट ऑफ लिव्हिंगचे लातूरचे योगगुरू मकरंद जाधव यांचा उपस्थित शिबीरार्थी यांच्या वतीने बस्वराज मठपती यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ओमप्रकाश गलबले, राजकुमार अचवले, विजयकुमार संभाळे, गंगाधर चाकोते, सन्मुख तांबोळकर, तानाजी सोनटक्के, विजयकुमार शिरशे, मनोज बिराजदार, बळी लोहार, विद्यासागर वाले, राजू व्यंजने तसेच शिबीरार्थी उपस्थित होते.

### दूर्वा भदाडेची जवाहर नवोदयसाठी ठरली पात्र

**अहमदपूर, दि.२६ मार्च -**

केंद्र शासनाच्या जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा १८ जानेवारी रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून डॉ. हरिवंशराय बच्चन प्राथमिक विद्यालय अहमदपूर शाळेची इयत्ता पाचव्या वर्गाची विद्यार्थिनी दूर्वा सुधाकर भदाडे हिची जवाहर नवोदय विद्यालय लातूरकरिता निवड झाली आहे. विशेष म्हणजे शहरी भागातून निवड झाल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. दुर्वा ही डॉ. हरिवंशराय बच्चन प्राथमिक विद्यालय अहमदपूर शाळेची विद्यार्थिनी असून ती आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद तसेच मार्गदर्शक गणेश जाधव यांना देते. या यशाबद्दल डॉ. हरिवंश राय बच्चन प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा केंद्रीय चित्रपट प्रमाणन बोर्डाचे सदस्य निवृत्ती यादव, संस्था सचिव प्रभाताई भदाडे, मुख्याध्यापक व्यंकटेश भदाडे तसेच शाळेतून, मित्र-मैत्रिणी तसेच नातेवाईक व परिसरातील नागरिकांमार्फत अभिनंदन व कौतुक केले जात आहे.



### महात्मा बसवेश्वर महाविद्यायलयात राष्ट्रीय सेवा शिबिर संपन्न

**औसा, दि.२६ मार्च -**

महापुरुषांनी प्राणांची आहूती देऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे, त्यांच्या कार्याची प्रेरणा तरुणांनी सदैव समोर ठेवून राष्ट्र निर्माण करिता भरीव योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किसनाथ कुडके यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हैप्पी व्हिलेज, हासेगाव (ता.औसा जि. लातूर) यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिरातील बौद्धिक सत्रात बोलत होते. कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवक-स्वयंसेविका आणि हॅपी व्हिलेज येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

काही गावातील सरपंच, उपसरपंच व सदस्यांचा समावेश... वेळेत जात वैधता सादर न केल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय...

# निलंगा तालुक्यातील २७३ ग्राम पंचायत सदस्य अपात्र

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२६ मार्च -**

ग्रामपंचायतीच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या सरपंच उपसरपंच व सदस्यांनी मुदतीत जात वैधता सादर न केल्यामुळे तालुक्यातील २७३ सदस्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मार्च अखेरच्या टप्प्यात हा निर्णय घेतल्यामुळे व्यवहार करण्यासाठी व गावगाडा हाकणाऱ्या लोकप्रतिनिधी समोर मोठा पेच निर्माण झाला आहे. या आपात्र सदस्यांना आता न्यायालयात दाद मागावी लागणार आहे.

तालुक्यातील दुसऱ्या टप्प्यात एक जानेवारी २०२१ ते १० जुलै २०२३ या कालावधीत निवडणूक होऊन झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत राखीव जागेवर उमेदवारांनी उमेदवारी दाखल करून ते निवडून आले होते. शिवाय एक वर्षाच्या आत जात वैधता सादर करू असे हमीपत्र त्यांनी दिली होती. यामध्ये मसलगा, कलांडी निटूर, खडकउमरगा, वाडी शेडोळ, कासारसीरसी, कासार बालकुंदा, लांबोटा, गुराळ, वांजरवाडा, बामणी, टाकळी, सरवडी, पिरूपटेलवाडी, हंचनाळ, गिरकचाळ, शिरोळ, वळसांगवी, हाडगा, कोकळगाव, मळेगाव-जवरी, केळगाव, नदीवाडी, वाक्सा, सावरी, ताडमुगळी, बडूर, आंध्रा, जाजणूर, वडगाव, येळनूर, लिंबाळा, दापका, शेंद, बेंडगा, जामगा, हाडोळी, नदीहत्तरगा, मुगाव, शेळगी, हासोरी-खु, सांगवी-जे, हत्तरगा-हालसी, अंबुलगा-विश्वनाथ, झरी, चिलवंतवाडी, मिरगनहळ्ळी, अनसरवाडा, औंढा, शिराढोण, धानोरा, मसलगा,

सिंधीजवळगा, हरीजवळगा, सोनखेड, चिंचोली-भंगार, तांबरवाडी, उमरगा-हाडगा, गुंजरगा, दादगी, तुपडी, सिंदखेड, शिवणी-कोतल, कलांडी, मन्नथपुर, हंगरगा-सिरसी, मानेजवळगा, भूतमुगळी, बोटकुळ, माकणी, चांदोरी, चिंचोली-सयाखान, हालसी-तुगाव, काटेजवळगा, रामलिंग-मुदगड, राठोड, तळीखेड, तांबाळा, निटूर, पानचिंचोली, अंबुलगा-बुद्रुक, तळखेड, बोरसुरी, तांबाळा, हलगरा यासह अन्य गावातील जवळपास २७३ सदस्याचे सदस्यत्व जिल्हाधिकारी यांनी अपात्र ठरवले आहेत.




यामध्ये काही सरपंच, उपसरपंच व सदस्याचा समावेश आहे. निवडून आलेल्या सदस्यांनी एक वर्षाच्या आत जात वैधता सादर करून म्हणून हमीपत्र दिले होते. त्यानंतर सादर तहसीलदार यांनी नोटिसा पाठवून राखीव जागेवर निवडून आलेल्या सदस्याच्या सुनावण्या घेतल्या होत्या.

संबंधित सदस्याने जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केला असून याबाबत कोणताही निर्णय जात पडताळणी समितीने दिलेला नाही. संबंधित अर्जदाराने अनेक वेळा त्रुटीची पूर्तता करून जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव केलेले आहेत. परंतु जात पडताळणी समितीकडूनच त्यांनी दिलेल्या प्रस्तावावर कोणताही निर्णय दिलेला नाही. अनेक वेळा हेलपाटे करूनही अर्जदारांना निर्णय दिला जात नाही.

शिवाय जात पडताळणी समितीकडे मोठ्या प्रमाणात प्रस्ताव दाखल झाल्यामुळे व अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्याचे कारणे अधिकारी सांगत असले तरी जात वैधता सादर करण्याची जबाबदारी संबंधित सदस्यावर असल्यामुळे पूर्वलक्षी प्रभावाने त्यांची सदस्यत्वाची निवड जिल्हाधिकाऱ्याने अपात्र केल्यामुळे आता या सदस्यांना न्यायालयात दाद मागावी लागणार आहे.

### लातूर व्यापारी धर्मशाळा करणार २५ मोफत डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी मिरागी नेत्रालयाला आर्थिक सहकार्य

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२६ मार्च -**

लातूर व्यापारी धर्मशाळाद्वारा मिरागि नेत्रालयाला २५ तिरळेपणा, मोतीबिंदू व डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहकार्य करणार असल्याची माहिती नँब, लातूरचे अध्यक्ष डॉ. विजय राठी यांनी दिली आहे.

लातूर व्यापारी धर्मशाळाद्वारा सामाजिक बांधिलकी म्हणून काही कार्यक्षेत्रातील सेवाभावी संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याच्या भावनेतून नँब संचलित मिरागी नेत्रालयासाठी आर्थिक सहकार्य करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

मिरागी नेत्रालय ही संस्था डोळ्यांच्या सर्व उपचारासाठी अविरत सेवा करीत आहे. अनेक मोफत शिबिर व शस्त्रक्रिया मिरागीने केल्या आहेत. खासकरून मुलांचे तिरळेपणाचे ऑपरेशन, मोतीबिंदू व अनेक डोळ्याच्या शस्त्रक्रिया एक तर मोफत किंवा अतिशय अल्प दरात केल्या जातात. या सर्वांची दखल घेऊन लातूर व्यापारी धर्मशाळा ह्या संस्थेने संस्थेस २५ ऑपरेशन करण्यासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. याचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, फोटो व दारिद्र्यरेषेखालील सर्टिफिकेट असणे गरजेचे आहे. ही योजना फक्त ऑपरेशनसाठी असेल. बाकी खर्च पेशंटला करावा लागेल. या योजनेसाठी १ एप्रिल पासून नोंदणी करून तपासून घ्यावे. मीरागी नेत्रालय हे गीतांजली मार्केट, लातूर येथे आहे. तपासणीसाठी वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ०६ वाजेपर्यंत आहे.

या सहकार्यासाठी अरविंद सोनवणे, लक्ष्मीरमण लाहोटी, रमेश राठी, दिनेश इनानी, हेमंत बोरा, ललित शहा, रमेश बियाणी आणि ईश्वरप्रसाद डागा आदींचे मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे.

### निलंगा तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय स्थलांतरीत

**निलंगा, दि.२६ मार्च**

निलंगा तालुका सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हे कार्यालय मागील २५ वर्षापासून शेटकार बिल्डींग पहिला मजला, दत्तानगर निलंगा येथे कार्यरत आहे. सदरील कार्यालय १ एप्रिलपासून डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर अर्बन को-ऑप बँक लि. निलंगा शिवाजी चौक, लातूर रोड येथे स्थलांतरीत होणार आहे.

## चाकूर तालुक्यातील २४ गावांच्या दुर्लक्षित रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी पालकमंत्र्यांना साकडे

भाजपा युवा मोर्चा उपाध्यक्ष रमेश पाटील यांची निवेदनाद्वारे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२६ मार्च -**

चाकूर तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर उदगीर तालुक्यातील २४ गावे चाकूर तालुक्यात समाविष्ट झाली. मात्र हे गावे तालुक्यात समाविष्ट होऊनही त्याठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुलभचत समस्या सोडविण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी मंगळवारी दि.२५ मार्च रोजी विधानभवन मुंबई येथे लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना निवेदन देऊन साकडे घातले आहे.

तालुक्यातील या २४ गावातील रस्त्यांची दुरवस्था मोठ्या प्रमाणात असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे चाकूर बाजारपेठ उत्पादित झालेला माल न अनता ना इलाजास्तव उदगीर किंवा लातूरला शेतकरी घेऊन जात आहेत.त्यामुळे या रस्त्यांबाबत त्वरित उपाययोजना कराव्यात असे निवेदनात पाटील यांनी मागणी केली आहे.

यामध्ये येरोळमोड-कबनसांगवी रस्ता (प्रजिमा ३३): या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण अद्याप झालेले नाही. सद्यस्थितीत हा रस्ता अत्यंत खराब झाल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. महांडोळ-हेर रस्ता: हा रस्ता दुर्लक्षित राहिल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात हा रस्ता अधिकच खराब होत असल्याने प्रवास अत्यंत धोकादायक ठरत आहे.रोहिणा-हेर रस्ता: सदर रस्ता अत्यंत खराब स्थितीत असून तो त्वरित दुरुस्त होणे आवश्यक आहे. या मुख्य रस्त्यांमुळे शेजारील अनेक गावांना वाहतूकीस नाहक त्रास होत आहे.



त्यामुळे वरील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या दृष्टीने तातडीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी अशी मागणीवजा विनंती पाटील यांनी आपल्या निवेदनात केली आहे.

## रखडलेली पाणीपुरवठा योजना सुरु करण्यासाठी निटूर ग्रामस्थ आक्रमक

महिला सरपंचासह ग्रामस्थ करणार गुरुवारी आंदोलन...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२६ मार्च -**

जल जीवन मिशन अंतर्गत तीन वर्षांपासून सुरु असलेली तालुक्यातील निटूरची पाणी पुरवठा योजना अद्याप ही सुरु झाली नाही. त्यामुळे काम करत असलेला संबंधित कंत्राटदार व त्यावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय नियोजनाच्या विरोधात निटूरच्या महिला सरपंच व ग्रामस्थ गुरुवारी दि.२७ मार्च रोजी तीव्र आंदोलन करणार असून त्या संदर्भात नुकतेच जिल्हाधिकारी व संबंधित विभागाच्या मुख्य कार्यालयाला निवेदन पत्र देण्यात आल्याचे ग्रामपंचायतच्या वतीने सांगण्यात आले आहे.

ग्रामीण भागात प्रत्येक घराला व नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी केंद्र सरकारने जलजीवन मिशन अंतर्गत सर्वत्र पाणी पुरवठ्याचे कामे मोठ्या प्रमाणावर दिली. मात्र शासनाच्या उद्देशालाच मुटमाती देण्याचे काम सध्या या योजनेतील कंत्राटदार करताना दिसत आहेत.

निटूर (ता. निलंगा) येथे गेल्या तीन वर्षांपासून पाणी पुरवठ्याचे काम सुरु आहे. परंतु अद्यापही गावातील अनेक भागात नळाचे कनेकशन नाहीत की अर्ध्या गावामध्ये अद्याप ही पाणी आले नाही.

त्यामुळे केवळ काम सुरु असल्याचा दिखावा करणे व वेळ मारून जाणे असा प्रकार सध्या निटूरमध्ये या गुत्तेदाराकडून पहायला मिळत आहे. निटूरसाठी मसलगा धरणाहुन दहा कोटी रुपये खर्चून शासनाने ही योजना मंजूर केली आहे.

मात्र ही योजना वेळेत पूर्ण होत नसल्याने निटूरच्या सरपंचासह ग्रामस्थ आक्रमक झाले असून निटूरमध्ये केंव्हाही मोठे आंदोलन करणार असल्याचे सांगण्यात आले. सध्या उन्हाळ्याच्या तीव्र झळा लागत असून गावात पाणी टंचाई जाणवत आहे.

शासनाने दहा कोटी रुपये देवून ही केवळ गुत्तेदार व त्यावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्याच्या हलगर्जी पणामुळे गावचे हाल होत आहेत. त्यामुळे ही योजना चालू व्हावी, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत. गावात पाइपलाईन खोदल्यामुळे सर्वच रस्त्याची दुर्दशा झाली आहे. मात्र संबंधित गुत्तेदार ते ही दुरुस्त करताना दिसत नाही.

दरम्यान संबंधित कामावर अभियंत्याची नेमणूक आहे. परंतु तेही कधी कामावर फिरकत नसल्याने ग्रामस्तामध्ये नाराजी आहे.

त्यामुळे या सर्व तुघलकी कारभारा विरोधात महिला सरपंचासह ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थ गुरुवारी २७ रोजी आंदोलन करणार आहेत.

# बावची येथे आढळला आदिलशाही कालीन सुमारे ३५० वर्ष जुना ताम्रपट

हा ताम्रपट तत्कालीन राजकीय, सामाजिक, भौगोलिक परिस्थिती व इतिहास समजण्यास उपयुक्त...

**तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.२६ मार्च -**

बावची येथे श्री प्रकाश जाधव यांच्या संग्रही ४ पत्र्यांचा मोडी ताम्रपट त्याच्या घराण्याचा आहे. जेंव्हा केंद्रीय पुरातत्त्व चे सर्वेक्षण मध्ये तो त्यांनी डॉ. नंदकिशोर विजपुरिया व सचिन पवार यांना दाखवला. पुढे चालून त्यावर जिल्ह्यातीलच संशोधक कृष्णा गुडदे यांनी संशोधन करून त्याचा खुलासा केला आहे.

या ताम्रपटच्या पहिल्या पानावर विजापूरचा आली आदिल शाह (दुसरा कारकीर्द इ.स. १६५६ ते १६७२) व तालुका बर्दापुरच्या काजी यांचे शिक्के तर आनंदराव गोविंद देशपांडे व व्यंकटराव देशमुख परगणा बर्दापुर यांच्या सह्या आहेत. विषय असा की मौजे बावची चे संभाजी नागोजी कासार (जैन) हे पाटील होते मात्र ५-७ वर्ष झाले सरकार दरबारी त्यांच्या कडून महसूल जमा झाला नव्हता. लावणी पडली होती, गाव परागंदा झाला होता. त्यामुळे जमीनदार याने कासार पाटील यास विजापूर दरबारी हजर केले. त्यावर बादशाहनी गावची उस्तवारी (हिशोब) करून महसूल जमा करावयास सांगितला. ठरवून दिल्या प्रमाणे ११०० होन चार महिन्यात द्यायचे कबूल करून कासार पाटील गावी आले. शेतसारा वसूल करण्यासाठी पाटलाने गावावर पट्टी बसविली. मात्र लोक हाताशी लागेनात. तेंव्हा व्याकूळ होऊन ते देशमुख व देशपांडे यांच्याकडे गळा पडले. (मदती साठी विवंचना केली). जमीनदार यांच्या गळा पडले. जमीनदार बोलले की आम्हाला काही तुमच्या वतनाची गरज नाही तुम्ही दुसऱ्या कोणास तरी देणे. मग पाटील पेचात पडले. परत एक वेळ जमीनदार याने पाटलास दरबारात हजर केले. त्यावेळेस बादशाह हे पाटलास अदबयात (वाईट, टाकून, कठोर बोलणे) करू लागले. पाटलांस ते त्रास सहन झाले नाही. तो पैसा त्याच्यावर पडला. त्यांनी त्यांच्या भाऊबंदास बाजिंद होऊन विवंचना केली की या संकट समई आम्हास सामील व्हा, भाऊबंद बोलले की आम्हास वतनाची गरज नाही, तुम्हीतुम्हास कळेल तसे करणे. तेंव्हा कासार पाटील यांची आपली पाटीलकी विक्रीस घातली. इतक्यात त्यांना वर्तमान कळले की राजश्री सबाजी जाधव यांना वतनाची गरज आहे. सबाजी जाधव हे बादशाह पाशी मनसदारी करीत होते. तेंव्हा कासार पाटील जाऊन त्यांच्या गळा पडले.



या वेळेस गोष्ट आमच्या जीवावर आली आहे, आम्हास जीवनदान द्या. यावर राजश्री सबाजी जाधव बोलले की जमीनदार यासाठी तयार असल्यास आम्ही अंगीकार करू. विद्यमान जमीनदार बोलले की हा पैसा चौगा वतनदार यांनी वाटून घ्यावा. त्यापैकी २५० होन घेऊन संभाजी नागोजी कासार पाटील यांनी राजश्री सबाजी जाधव यांना पाटीलकी विकली. बाकी कुलकर्णीपण, भाटपण, महारकी ही वतने ३ रुके प्रमाणे विकली.

यातच गावाचे सर्व मानपान विकून टाकली. त्यात कुलकर्णी पण, भाट पण, बीजामथा चावर, लखमादवीचा पसा, होलीचा माण, पाव पट से, रवल दाम, भवानी मान, रयाची घोंगडी, धनगराचा मागास घोंघाड, कोष्ट्याच्या मागास, पाल्याच तेल, पाल्यायचा गुल, सवासानीचा मान, रायाची मोली, हळद, राबता महार हे वतन व मानपान विकून टाकले.

त्यावर साक्ष गहाण घेतल्या. या मजहर वर साक्ष मध्ये बरदापूर (बर्दापूर) चे खंडोजी पाटील, गरसोड (गरसुळी) चे संभाजी पाटील, बिरगाव (बिटरगाव) चे येकाजी पाटील, वाकली (वाकडी) चे भुजंगराव पाटील, फुमसान (सुमठाणा) चे दरकोजी पाटील, बोरगाव (दर्जी बोरगाव)चे भगाजी पाटील, सेर (सेरा) चे हाणमंतराव पाटील, समसाना (समसापूर) चे पिराजी पाटील, मौजे निकव (निवाडा) चे सटवाजी पाटील, घनसरगावचे राणोजी पाटील यांची नावे आहेत. बावचीच्या बलुतेदार मध्ये साक्ष संभाजी सुतार, सटवाजी लव्हार, माणकोजी परीट, सिवाजी वारीक, राणोजी कुंभार, रायाजी चांभार यांची नावे आली आहेत. बावचीचे इतर पाटील (मोकदम) मध्ये येशवंतराव,



दवलतराव, माणकोजी, नारायेणराव, हायेबतराव यांची नावे आली आहेत. तर नाईक मंडळींत सटवा नाईक, दवल नाईक, कस नाईक यांची नावे आली आहेत. अशा प्रकारे तत्कालीन ग्रामनामे, व्यक्तिनामे, तत्कालीन परिस्थिती यांवर प्रकाश टाकणारा हा ऐतिहासिक ताम्रपट खुप महत्वाचा आहे, असे यावेळी कृष्णा गुडदे यांनी सांगितले.

कृष्णा गुडदे यांस यावेळी वाचनासाठी राधिका दाते तर संशोधन साठी डॉ. नंदकिशोर विजपुरिया व सचिन पवार यांचे सहकार्य झाले आहे.

## तालुका मार्गदर्शकपदी फुलारी



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२६ मार्च -**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार, शिवसेना नेते तथा खासदार, एस.टी. कामगार सेना महाराष्ट्र अध्यक्ष अरविंद सावंत, शिवसेना नेते सुनिल प्रभु, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर, जिल्हा संपर्क प्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण, यांच्या सुचनेनुसार शिवसेना लातूर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, उपजिल्हा प्रमुख भारत सांगवीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत 'शिवनेरी' शिवसेना कार्यालयात तालुक्यातील पदाधीकाऱ्यांची निवड करण्यात आली.

यावेळी अनिकेत फुलारी यांची शिवसेना अहमदपूर तालुका संघटकपदी व महाराष्ट्र एस.टी. अहमदपूर आगार कामगार सेनेच्या प्रमुख मार्गदर्शकपदी नियुक्ती जाहीर करुन शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख भारत सांगवीकर, जिल्हा कार्यालय प्रमुख सुभाष गुंडीले, तालुका प्रमुख दत्ता हेंगणे, नगरसेवक संदीप चौधरी, उपतालुका प्रमुख गणेश माने, संतोष आदटराव, शिवसेना सहसचिव पद्माकर पेंढारकर, माजी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक माऊली देवकत्ते, उपशहर प्रमुख शिवा भारती, टो सेना तालुका अध्यक्ष तथा उपशहर प्रमुख शिवकुमार बेद्रे, सोमनाथ आढाव, कृष्णा रोकडे, भगवान कदम, व्यंकट सुरकुटे यांची उपस्थिती होती.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २६ मार्च, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ९ एप्रिल, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही.

तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### पालिकेच्या उपायुक्तपदी केंद्रे रुजू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
महानगरपालिकेत उपायुक्त म्हणून कैलास रमेश केंद्रे हे रुजू झाले.



मंगळवारी (दि.२५) त्यांनी पदभार स्वीकारला.

मूळचे जळकोट तालुक्यातील बोरगाव येथील रहिवासी रमेश केंद्रे यांची २०१५ मध्ये शासकीय सेवेत नियुक्ती झाली. यापूर्वी त्यांनी माढा नगरपंचायत येथे अडीच वर्षे काम केले. त्यानंतर सांगोला नगरपरिषदेत साडेतीन वर्षे कार्यभार सांभाळला.

मागील अडीच वर्षांपासून ते आळंदी येथे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते. आळंदी येथून पदोन्नती झाल्याने त्यांची लातूर महानगरपालिकेत उपायुक्तपदी पदस्थापना झाली आहे. मंगळवारी केंद्रे यांनी पदभार स्वीकारला. आयुक्त बाबासाहेब मनोहरे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

### दयानंद विधी महाविद्यालयात अभिरूप न्यायालय स्पर्धेचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
दयानंद विधी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील अभिरूप न्यायालय स्पर्धा पार पडली. या स्पर्धेस प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे, ॲड. अनिकेत उज्ज्वल निकम यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी न्यायमूर्ती डिगे यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे महत्त्व आणि वकिलाची भूमिका समजावून सांगितली. या स्पर्धेच्या समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून क्रिमिनल लॉयर ॲड. अनिकेत निकम उपस्थित होते. वकील म्हणून वावरत असताना आपण आपल्या पध्दतीने या समाजाला आणखीन कसे सुदृढ करू शकू हा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव ॲड. श्रीकांत उटगे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. पूनम नाथानी यांची उपस्थिती होती.

### लातूर व्यापारी धर्मशाळा करणार तिरळेपणावरील शस्त्रक्रियेस मदत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
व्यापारी धर्मशाळाद्वारा मिरागि नेत्रालयाला २५ तिरळेपणा, मोतीबिंदू व डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहकार्य करणार असल्याची माहिती नँब, लातूरचे अध्यक्ष डॉ. विजय राठी यांनी दिली आहे. लातूर व्यापारी धर्मशाळाद्वारा सामाजिक बांधिलकी म्हणून काही कार्यक्षेत्रातील सेवाभावी संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याच्या भावनेतून नँब संचलित मिरागी नेत्रालयासाठी आर्थिक सहकार्य करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

मिरागी नेत्रालय ही संस्था डोळ्यांच्या सर्व उपचारासाठी अविरत सेवा करीत आहे. अनेक मोफत शिबिर व शस्त्रक्रिया मिरागीने केल्या आहेत. खासकरून मुलांचे तिरळेपणाचे ऑपरेशन, मोतीबिंदू व अनेक डोळ्याच्या शस्त्रक्रिया एक तर मोफत किंवा अतिशय अल्प दरात केल्या जातात. या सर्वांची दखल घेऊन लातूर व्यापारी धर्मशाळा ह्या संस्थेने संस्थेस २५ ऑपरेशन करण्यासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. याचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, फोटो व दारिद्र्यरेषेखालील सर्टिफिकेट असणे गरजेचे आहे.

### भरपाई देण्याची व्यापाऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
यशवंतराव चव्हाण कॉम्प्लेक्स खुले करण्यात यावे, या मागणीसाठी यशवंतराव व्यापारी संकुल असोसिएशनने मंगळवारी आक्रमक भूमिका घेत मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच तहसीलदारांची भेट घेऊन न्यायालयात धाव घेण्याचा इशारा दिला होता. कॉम्प्लेक्समधील सर्व व्यापारी एकत्र आले होते. असोसिएशनचे अध्यक्ष मनोज सूर्यवंशी, ॲड. रविकिरण गिरी, ॲड. निखिल मुंजाने, मुकेश रांदड, रामदास भोसले, विठ्ठल बेंबडे, अरुण बिराजदार, गोपी तापडिया, विजय जगदाळे, सुनील शेळके, व्यंकट माने, नागनाथ कोळी, व्ही.पी. पाटील, के.के. शिंदे, एजाज मणियार, सुधीर देवकते, विजयकुमार डागा आदींनी व्यापारी संकुल खुले करण्याची मागणी केली.

# अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत मंगळवारी महानगरपालिकेत बैठक घेण्यात आली. यावेळी लोखंडे यांनी मनपाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेत समाधान व्यक्त केले.

या बैठकीस मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य लेखा परीक्षक कांचन तावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना लोखंडे यांनी लाडपागे कमिटीच्या




शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती देण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. वारसांची कागदपत्र हस्तगत करण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करून एक महिन्यात सर्व प्रकरणे निकाली काढावी असे निर्देश दिले.मनपाकडे कार्यरत असणाऱ्या सर्व सफाई कामगारांची वेळोवेळी आरोग्य तपासणी केली जावी. त्यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे.सफाई कामगारांच्या सुरक्षिततेसाठी हॅन्ड ग्लोव्हज, गम बूट, मास्क, टोपी या सुरक्षा साधनांचा पुरवठा करावा. शहरातील सर्व रुग्णालयांना बायो मेडिकल वेस्ट स्वतंत्रपणे संकलित करण्यास सांगावे. सफाई कामगारांची मुले शाळेत जातात का? याची तपासणी करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी बोलताना लोखंडे यांनी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई घरकुल योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास सांगितले. या योजनेचा संबंधितांना लाभ मिळवून द्यावा. दलित वस्ती योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या निधीतुन गुणवत्तापूर्ण व्हावी,अशी अपेक्षाही लोखंडे यांनी व्यक्त केली. प्रारंभी आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी लोखंडे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शासनाच्या सर्व योजनांची लातूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचेही मनोहरे यांनी लोखंडे यांना अवगत केले. या बैठकीस सर्व सहाय्यक आयुक्त आणि अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती.

# 'शाहू' मध्ये परिसंवाद संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
भारत देश हा प्राचीन सांस्कृतिक परंपरेसाठी प्रसिद्ध आहे . येथील 'ताज महाल' हे जगाच्या आश्चर्यातील एक आहे. मराठवाड्यातील वेरूळ, अजंठा येथील लेण्या देशात नव्हे तर जगात प्रसिद्ध झाली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गड किल्ले आरमार यावरून ते केवळ लढवय्येच नव्हते तर ते आरमार तज्ज्ञ, कला व स्थापत्यशास्त्रज्ज्ञ, वास्तुशास्त्रज्ज्ञ होते. असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ सोमनाथ रोडे यांनी केले. ते राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या 'शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमानेप्राचीन व मध्ययुगीन भारतीय लेणी कला व स्थापत्य यांचा सामाजिक प्रभाव या परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

अध्यक्षस्थानी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील होते. मंचावर भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेचे माजी वरिष्ठ सल्लागार डॉ. अरुणचंद्र पाठक, सहसचिव इंजि. गोपाळ शिंदे, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, इतिहास विभागप्रमुख डॉ. अर्चना टाक यांची उपस्थिती होती. डॉ. सोमनाथ रोडे पुढे म्हणाले की, समाज जीवनावर स्थापत्य कलेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात होताना दिसतो आहे. तसेच नव संशोधकांने असे मत त्यांनी मांडले. ऐतिहासिक कागदपत्रे आदीवर संशोधन करावे. अध्यक्षीय समारोप प्रसंगी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव पाटील म्हणाले की, इतिहास तज्ज्ञांनी पूर्वगृहदुषित इतिहासाचे पुनर्लेखन त्याची नव्याने मांडणी करावी की जेणेकरून सत्य समोर येऊन समाजाचे प्रबोधन होईल असा आशावाद या प्रसंगी व्यक्त केला.

स्वागत पर मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांनी महाविद्यालयाचा गुणात्मक वाढीचा चढता आलेख प्रस्तुत करून हे महाविद्यालय केवळ डॉक्टर, इंजिनिअरच बनविणारेच नसून ते सीए, प्रशासन सेवेतील अधिकारी निर्माण करणारे हे महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांसाठी त्याच्या सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने वेगवेगळे उपक्रम घेतले जातात ७ पदवीचे, १४ पदव्युत्तरचे ,११ संशोधन सेंटर तर २२ स्किल बेस सर्टिफिकेट कोर्स या महाविद्यालयात राबविले जातात म्हणाले. एन. एस. एस, एन. सी. सी, क्रीडा विभागाचे देशपातळीवर प्रतिनिधित्व करत आहेत.

तसेच महाविद्यालयालात विविध स्तरावर पुरस्काराने गौरविले आहे या गुणात्मक वाढीमुळेच पीएम उषा योजने अंतर्गत महाविद्यालयाला पाच कोटीचे अनुदान प्राप्त झाले आहे. असा महाविदयालयाचा चढता आलेख प्रभावी भाषेत सांगितला. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांच्यासह इतरांनी केले.

# 'ते' संकुल खुले करण्याची तहसील प्रशासनावर नामुष्की



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
तहसील प्रशासनाने बेकायदेशिररित्या सोमवारी टाळे ठोकलेले यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल अखेर यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल असोसिएशनच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे मंगळवारी खुले करण्याची नामुष्की तहसील प्रशासनावर आली.

सोमवारी सकाळी आठ वाजता गाळेधारकांना कसलीही पूर्वकल्पना न देता तहसीलदारांनी यशवंतराव चव्हाण संकुलच्या सर्व गाळ्यांना टाळे ठोकले होते. महसूल विभागाचे महापालिकेकडून दोन कोटींपेक्षा अधिक रुपये अकृषी कर येणे आहे. वारंवार पत्र देऊन पालिका त्याचा भरणा करत नाही. त्यामुळे पालिकेच्या मालमत्तांना टाळे ठोकण्याचा आम्हाला अधिकार आहे, असे तहसीलदारांचे म्हणणे होते. सोमवारी सकाळी ११ वाजता या संकुलातील सर्व गाळेधारक एकत्र आले. त्यांनी पालिका आयुक्तांची भेट घेतली. तहसील कार्यालयाने लावलेला कर हा अवाजवी आहे आणि कार्यवाही तहसील कार्यालयाने केली आहे. तेव्हा आपण तहसीलच्या अधिकाऱ्यांना बोलावे, असे सांगून आयुक्तांनी जबाबदारी झटकली.

यानंतर गाळेधारकांनी तहसीलदार सौदागर तांदळे यांची भेट घेतली. आम्ही केलेली कारवाई योग्य असून आम्ही लावलेला कर हा नियमानुसारच लावला आहे. जानेवारीपासून आम्ही पालिकेला पत्रव्यवहार करत आहोत. जोपर्यंत पालिका कर भरत नाही, तोपर्यंत आम्ही टाळे काढणार नाही, अशी भूमिका तहसीलदारांनी घेतली. एक तर तुम्ही आम्हाला नोटीस न देता आमच्या गाळ्यांना टाळे ठोकले. तुम्ही न्याय दंडाधिकारी असून आमच्या सोबत अन्याय केला आहे. पालिका तुमचे देणे आहे तर तुम्ही पालिकेला टाळे ठोकायला पाहिजे, आम्ही पालिकेचे सर्व कर वेळच्यावेळी भरणा केला आहे, असे गाळेधारकांनी सांगितले. दरम्यान, गाळेधारकांनी जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची भेट घेतली व सर्व कायदेशीर बाबी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. आमचे आर्थिक नुकसान झाले आहे.

त्याची भरपाई आपणास करून द्यावी लागेल, आपल्या कार्यवाहीच्या विरोधात न्यायालयात दाद मागू, असे निवेदनही दिले. गाळेधारकांच्या मागणीचा विचार करून उपविभागीय अधिकाऱ्यांनी मंगळवारी दुपारी तहसीलदारांना पत्र दिले. त्या पत्राच्या अनुषंगाने तहसीलदारांनी सदर संकुलाचे टाळे काढण्याचे लेखी आदेश दिले. यानंतर संकुलातील गाळ्यांचे टाळे काढण्यात आले.

### पैशाचे कारण; दांड्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
पैशाच्या कारणावरून एकाला दांड्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना लातुरात सोमवारी घडली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी सुलतान अली कुरेशी यांना इम्रान इलीआज कुरेशी योन ऑटोचे आणि इतर पैसे घेण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून दांड्याने मारहाण केली.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहनाचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
१४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयातील पदांबाबत राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद न केल्याच्या निषेधार्थ लातूर जिल्ह्यातील खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक समन्वय संघाच्यावतीने मंगळवारी (दि.२५) दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून सामूहिक आत्मदहनाचा प्रयत्न करण्यात आला. तसेच जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.




शिक्षक समन्वय संघाने महाएल्गार आंदोलन केल्यामुळे शासन निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ५२ हजार पदांना नागपूरच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधीची तरतूद होणे अपेक्षित होते. परंतु, निधीची तरतूद करण्यात आली नाही. समाज घडवणाऱ्या शिक्षकांना 'चला पुढे जाऊया' या संकल्पनेतून २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात तरतूद होणे अपेक्षित होते.

शिक्षकांची अपेक्षा पूर्ण न झाल्याने शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यातूनच बीड जिल्ह्यातील धनंजय नागरगोजे या शिक्षकाने आत्महत्या केली. शिवाय, नैराश्येतून इतर चार शिक्षकांचा मृत्यू झाला. शासन ५२ हजार शिक्षकांची फसवणूक करीत आहे. त्यामुळे आमच्यासमोर मृत्यूशिवाय पर्याय नाही, असे सांगत जिल्हाधिकारी कार्यालसमोर निदर्शने करून आत्मदहनाचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने अनर्थ टळला.

या आंदोलनात जिल्हा शिक्षक समन्वय संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. नितीन सेलूकर, गिरीधर तेलंगे, बलभीम जगताप, बळवंत शिंदे, गंगाधर डिगोळे, सुवर्णा हलकुडे, सुनंदा पाटील, कमल काळजापुरे, शीतल रोकडे, कोमल डोणगावे आदी शिक्षक सहभागी होते.

# माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांची भाजपत घरवापसी?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
लातूरचे भाजपचे माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर भाजपच्या स्थानिक नेत्यांवर आरोप करीत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान काँग्रेस पक्षात प्रवेश करत भाजपच्या नेत्यांवर शरसंधान साधले होते.

दरम्यान, गेल्या चार दिवसांपूर्वी त्यांनी फेसबुक प्रोफाईलवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचा कमळ असलेला फोटो शेअर केला आहे. याबाबत त्यांच्याशी संपर्क साधला असता, आपण काँग्रेस पक्षाला 'रामराम' केल्याची प्रतिक्रिया दिली आहे. मात्र, भाजप प्रवेशाबाबत त्यांनी 'वेट ॲण्ड वॉच'ची भूमिका घेतली असली तरी ते लवकरच भाजपत घरवापसी करणार असल्याची चर्चा सुरू आहे.

सुधाकर श्रृंगारे यांना राजकारणाचा गंध नव्हता. ते एक प्रसिध्द उद्योजक म्हणून ओळखले जात होते. २०१७ ला ते भाजपकडून चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ जिल्हा परिषद गटातून विजयी झाले. यानंतर त्यांनी खऱ्या अर्थाने राजकारणात प्रवेश केला. २०१९ ला भाजपने तत्कालीन खासदार डॉ. सुनील गायकवाड यांची उमेदवारी कापत सुधाकर श्रृंगारे यांना



लोकसभेची उमेदवारी दिली होती. त्यांनी पावणेतीन लाखांपेक्षा अधिक मताधिक्याने विजय मिळवला. २०१९ ते २०२४ या कालावधीत त्यांचा पाच वर्षांचा कारभार चांगला गाजला. दरम्यान, श्रृंगारे यांच्या कारभारावर भाजपमध्ये अंतर्गत नाराजी वाढली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने पुन्हा श्रृंगारे यांना उमेदवारी दिली. मात्र, काँग्रेसचे डॉ. शिवाजी काळगे यांच्याकडून त्यांना दारुण पराभव पत्करावा लागला. हा पराभव श्रृंगारे यांच्या एवढा जिव्हारी लागला की, त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान काँग्रेस पक्षात प्रवेश केला व मतदारसंघातील विविध ठिकाणी जाऊन त्यांनी प्रचार सभेत भाजपवर सडकून टीका केली. मात्र, याचा कसलाही परिणाम विधानसभा निवडणुकीत झाला नाही. लातूर शहर मतदारसंघ वगळता सर्व ठिकाणी काँग्रेसला अपयश आले. विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळाल्यानंतर महायुती भक्कम झाली. केंद्रात व राज्यात दोन्ही ठिकाणी महायुतीचे सरकार आले. त्यामुळे श्रृंगारे यांना आपली चूक कळली असावी. त्यामुळेच त्यांनी आपण काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली असल्याचे सांगितले आहे. पुढे आपण काय करणार यासंबंधी त्यांनी अद्याप सुतोवाच केलेले नाही. लवकरच आपल्याला कळेल, अशा शब्दांत त्यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी चार दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचा कमळ असलेला फोटो फेसबुक प्रोफाईलवर शेअर केल्याने श्रृंगारे हे लवकरच भाजपत घरवापसी करतील अशी चर्चा सुरू झाली आहे.

### शिक्षणमंत्री भुसे यांच्याशी शैक्षणिक संवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, अजितसिंह पाटील यांनी मुंबई येथे राज्याचे शैक्षणिक मंत्री भुसे यांची सदिच्छा भेट घेउन नवे शैक्षणिक धोरण, शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण, पायाभुत साक्षरता व संख्याज्ञान एफ एल एन), पहिली पासुन सीबीएसई पॅटर्न व कॉफीमुक्त परिक्षा अभियान या शासन उपक्रमाबददल चर्चात्मक संवाद साधुन शासनाचे अभिनंदन केले.

राज्यात नव्या शैक्षणिक धोरणाची पायाभरणी होत असताना जेएसपीएमने मागील काही वर्षापासुन आपल्या संस्थेतील विविध विद्याशाखा मधुन पायाभुत साक्षरता आदी विषयी या भेटी संवाद झाला.

# ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास देवस्थानतर्फे मेघडंबरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ मार्च -**
लातूरचे श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यासह कर्नाटक राज्यातही प्रसिध्द आहे. लातूरचे ग्रामदैवत म्हणून या देवस्थानची ओळख आहे.

या देवस्थानचे दर्शन घेण्यासाठी वर्षभर भाविकांची गर्दी असते. विशेषत: सोमवारी तर भाविक मोठ्या संख्येने येतात. देवस्थानतर्फे या मंदिराचे रूप बदलण्याचे काम सुरू असून याचे पारंपारिक स्वरूप जतन करण्याचा प्रयत्न होत आहे. याचाच एक भाग म्हणून देवस्थानतर्फे श्री सिध्देश्वराच्या मुख्य गाभाऱ्यात मेघडंबरी सिंहासन प्रस्थापित करण्यात आले आहे. यामुळे श्री सिध्देश्वरांचे विलोभनिय दर्शन भाविकांना होऊ लागले आहे.

लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानतर्फे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या देवस्थानचा उल्लेख अनेक पुराण व ग्रंथांमध्ये आहे. त्यामुळे हे देवस्थान प्राचीन असल्याचे सांगितले जाते. या देवस्थानाचे मंदिरही भव्य आणि सुरेख आहे. त्याचे मूळ स्वरूप जतन करण्याचे काम देवस्थानतर्फे गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. देवस्थानच्या लगतच असलेल्या कुंडासही मूळ स्वरूप देण्याचे काम पुरातत्व विभागातर्फे करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून देवस्थानच्यावतीने ग्रामदैवत श्री सिध्देश्वराच्या गाभाऱ्यात



मेघडंबरी सिंहासन प्रस्थापित करण्यात आले आहे. कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यात असलेल्या कुमठा येथील वासुदेव श्यामबा यांच्या कलेतून ही मेघडंबरी साकारली आहे. सोमवारी ही मेघडंबरी ग्रामदैवत श्री सिध्देश्वराला अर्पण करण्यात आली आहे. या मेघडंबरीमुळे ग्रामदैवताचे विलोभनिय आणि देखण्या रुपाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.